# आनंदलहरी

## सत्कर्मी रति वाढो

।। श्री गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ।।

# सत्कर्मी रति वाढो

प.पू. श्री. दत्तमहाराजांची प्रवचने


संकलन

श्री. गोपाळ गोडसे

संपादन

डॉ.सौ.माधुरी पणशीकर



प्रकाशक

श्री भगवती प्रकाशन

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन


प्रकाशन दिवस
१२ जुलै १९९५.
बुधवार, आषाढ पौर्णिमा,
गुरुपौर्णिमा, शके १९१७.

मुखपृष्ठ
आमोद दामले


मुद्रक
के.जोशी आणि कंपनी
१७४५/२, सदाशिव पेठ,
पुणे-३०.फोन-४७१४०९

प्रकाशक
श्री भगवती प्रकाशन
६/१,साईविहार कर्वेनगर, पुणे-५२.
फोन-३६९०६०

किंमत रु.१७|—







प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

सर्व

प्रका
१२
बुधव
गुरुप

मुखप
आमो

मुद्रक
के.जो
१७४
पुणे-

प्रकाश
श्री भ
६/१,स
फोन-


किंमत


जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञानअंधार निरसी।
जीवात्मया परमात्मयासी। ऐक्यता कारी।।
विघडले देव आणि भक्त। जीव शिवपणें द्वैत।
तया देवभक्ता येकांत। करी तो सद्‌गुरु।।


जेथें सारासार विचार। तेथ होय जगोध्दार।
नवविधाभक्तीचा आधार। बहुत जनांसी।।
म्हणोनी नवविधा भजन। जेथे प्रतिष्ठिलें साधन।
हें सद्‌गुरूचें लक्षण। श्रोतीं वोळखावे।।

तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।
नानासाधनें समर्था। सद्‌गुरूपासीं।।
अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान। बाह्य निष्ठेचे भजन।
तेथे बहु भक्त जन। विश्रांति पावती।।

## श्री सद्‌गुरु मांदियाळी


पू. लोकनाथतीर्थ स्वामी


पू. दीक्षित स्वामी


पू. गुळवणी महाराज


पू. धुंडिराज महाराज

।। सदैव माझे मन वाणी शुध्द । करो तुझे नाम पवित्र सिध्द ।।

ओम् नमो जी श्रीगुरुराया। म्हणोनि सद्भावें लागें पायां।
तवं मीपण गेलें वायां। घेऊनियां तूंपणा॥

नवल पायांचें कठिणपण। वज्रें न तुटे लिंगदेह जाण।
त्याचेंही केलें चूर्ण। अवलीळा चरण लागतां॥

ओम् नमो श्रीगुरु शिवशिवा। नमनें जीवत्व जीवा।
नुरविसी, तेथें देहभावा। कैसेनि रिघावा होईल॥

जीवें घेऊनि जीवा। देहत्व मोडूनि देहभावा।
याहीवरी करविसी सेवा। हें लाघव देवा नवल तुझें॥

एवं स्वस्वरूप द्यावयासी। उदारत्व तुजपासीं।
हें न ये गा आणिकांसी। हृषीकेशी कृपाळुवा॥

तो तूं परम उदार ऐसा। राया रंका समभावें सरिसा।
भावो तेथ भरंवसा। तू आपैसा आतुडसी॥

## अनुक्रम


| | |
|---|---|
| १.अवधूतांचा उपदेश | १ |
| २.सुसंस्कारित बुद्धि | २५ |
| ३.क्रीडा भगवतीची | ५१ |
| ४.धर्मे प्रीतिं... | ६८ |
| ५.भूतां परस्परे पडो... | ९० |

## ।।श्री गणेश दत्त गुरुभ्यो नमः।।

भारतीय तत्त्वज्ञानात विचारांचे निरनिराळे प्रवाह दिसतात. द्वैती, अद्वैती, भक्तीमार्गी, निरीश्वरवादी विचारांनी समृद्ध असलेल्या ह्या तत्वज्ञानाचे मंथन अनेक शास्त्री, पंडित, विचारवंत वेळोवेळी करत आले आणि त्यांना वैचारिक दृष्ट्या मान्य झालेल्या तत्त्वप्रणालीचे त्यांनी समर्थनही केले. पण एक नक्की की कुठल्याही विचारप्रणालीचा पुरस्कार करणाऱ्या ज्ञानी पुरुषाने नैतिकतेची, सदाचार संपन्नतेचीच शिकवणूक आपल्या समाजाला दिली. आणि नुसतीच शिकवणूक दिली नाही तर त्याप्रमाणे आचरण करुन 'आचार्य' ह्या विशेष गौरवसंपन्न मान्यतेलाही ते पोहोचले.

प.पू. दत्तमहाराजांची प्रवचने वाचतांना ह्या नीतीच्या, सदाचाराच्या, विवेकाच्या प्रकाशात त्यांचे जीवन उजळून गेले असून आपल्यासारख्या सामान्यांचीही वाटचाल अशाच उदात्त तत्वांच्या प्रकाशात व्हावी ही त्यांची मनीषा शब्दाशब्दातून उमटत रहाते. प्रस्तुत पुस्तकातील प्रवचनांचा विचार करतांना 'सत्कर्मी रति वाढो' हा विचार केंद्रस्थानी दिसतो. प.पू. महाराज,'सतत सत्कर्म करावे' ही गोष्ट आपल्या मनावर ठसवत असतात. अर्थातच इथे 'सत्कर्म' कोणते असा एक प्रश्न उभा रहातो. यालाही त्यांनी समर्पक उत्तर दिलेले आहे. ते म्हणतात,'आपल्या बुद्धीने सत्कर्म, असत्कर्म ठरविता येत नाही. आपल्याला चांगलं कर्म कोणचं, वाईट कर्म कोणचं हे कळायला बुद्धि शुद्ध झाली पाहिजे. बुद्धि संस्कृत पाहिजे' आणि मग श्रीमद शंकराचार्यांनी दिलेला 'संस्कार' शब्दाचा ते अर्थ सांगतात.

बुद्धीच्या संदर्भात नेहमीच एक प्रश्न आपल्याला पडतो. तो हा की बुद्धीचे नेमके स्वरुप काय? सर्वच जर ईश्वरदत्त असेल तर बुद्धीही ईश्वरदत्तच आहे. यालाही प.पू.महाराजांनी स्पष्ट शब्दात उत्तर दिले आहे. ' ईश्वरदत्त बुद्धि आणि आपण केलेल्या कर्माप्रमाणे मिळणारी बुद्धि असे दोन प्रकार बुद्धीचे आहेत.' ईश्वराच्या कृपेने बुद्धीमध्ये बदल होतो तसाच संतांच्या संगतीनेही होतो हे संतसंगतीचे महात्म्य आहे. असे सांगून सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी केलेल्या 'घोरात् कष्टात्' ह्या स्तोत्रात सद्‌बुद्धि ईश्वराने द्यावी म्हणून कशी प्रार्थना केली आहे याचे विश्लेषण त्यांनी केले आहे.ह्या सद्‌बुद्धीचे नाते राष्ट्रोन्नतीच्या विचारांशी जोडले जाते. 'भूता परस्परे पडो। मैत्र जीवांचे।' ह्या ओळीचे स्पष्टीकरण करतांना, परस्परांमध्ये सौहार्द उत्पन्न झाले तर त्यातून राष्ट्रकल्याण साधले जाईल, शत्रू आपल्यावर मग आक्रमण करु शकणार नाही हे विचार मांडले जातात.

आपली प्रत्येक कृती धर्माचरणी असली पाहिजे हे ही प.पू. महाराज परत परत सांगतात. अर्थातच फलावर नजर ठेवून ही कृती करायची नाही. हे स्पष्ट करतांना त्यांना धर्मराजाची गोष्ट आठवते. वनवासात द्रौपदीच्या मनातही धर्माचरणाचे हेच फळ का असा संदेह निर्माण झाल्याबर धर्मराजांनी दृढ आत्मविश्वासपूर्ण शब्दात तिला उत्तर दिले,' फल मिळण्यासाठी मी धर्माचरण करीतच नाही. ईश्वराची आज्ञा म्हणून धर्माचरण करतो आहे.' त्याच्या ह्या धर्मनिष्ठेचे फल पुढे त्यांना मिळाले तसेच ते च्यवनपत्नी 'सुकन्या' हिलाही मिळाले.

प.पू. महाराज विषय स्पष्टीकरणासाठी अत्यंत मार्मिक

आणि अचूक कथाभाग सांगतात. त्यामुळे आपल्या मनातले संदेह गळून जातात. प्रत्यक्ष जीवन जगतांना विविध प्रकारचे प्रश्न आपल्या समोर आ वासून उभे असतात. कोणत्या प्रसंगी कसे वागावे याविषयी संभ्रम असतात, आपण चांगलं वागूनही त्याचं फल योग्य मिळेल का अशी शंकाही असते पण मला वाटते हे सगळे संभ्रम, शंका ह्या प्रवचनांच्या वाचनाने नाहीशा होतात. हेच गुरुवाक्याचे महत्त्व आहे. संत एकनाथांच्या 'विंचू चावला' ह्या भारुडात नाना उपायांनी विंचू उतरवल्यावरही 'फुणफुण' रहातेच. असा विषय मांडून शेवटी ते म्हणतात,

**'किंचित् राहिली फुणफुण ।**
**शांत केली जनार्दने ।।'**

म्हणजे जनार्दन स्वामींच्या गुरुपदेशामुळे ती 'फुणफुण' नाहीशी झाली. अगदी हाच अनुभव प.पू. दत्तमहाराजंचे शब्द वाचतांना येत असतो.

पावित्र्याचेही महत्त्व ते सहजपणे मनावर बिंबवतात. आहार पवित्र हवा, आचार पवित्र हवा यावर त्यांचा कटाक्ष आहे. ते म्हणतात," उत्तम फूल आहे. ते वास घेतल्यानंतर देवाला घालता येईल का? काय हरकत आहे? बुद्धिवाद असंच सांगणार. वास घेतला म्हणून काय झालं? पण ती पवित्रता गेली. स्वच्छता निराळी आणि पवित्रता निराळी. भांडी स्वच्छ झाली, हे डोळ्यांना दिसू शकतं. पण पवित्र किंवा अपवित्र हे बुद्धीने ठरवता येणार नाही. पवित्रपणा हा शास्त्राशिवाय समजत नाही" वास घेतलेले फूल अपवित्र होते म्हणून ते देवाला वहायचे नाही, जे जे पवित्र ते ते ईश्वराला अर्पण करायचे कारण ईश्वर म्हणजे साक्षात् पावित्र्यच आहे. साध्या गोष्टीत दडलेला गंभीर अर्थ. उकलून दाखवण्याची ही पद्धत फार परिणामकारक आहे.

प्रस्तुत पुस्तकात संग्रहित केलेली प्रवचने बीडला डॉ. दिलीप देशमुख यांच्या घरी झालेली आहेत. डॉ. देशमुखांच्या मातोश्री सौ. सिंधूताईंचे वडिल श्री.शंकरकाका आजेगांवकर हे परिव्राजकाचार्य टेंबे स्वामीमहाराजांचे अनुग्रहित होते. नित्यपाठाच्या पुस्तकात 'पुरस्कार' म्हणून काही उपदेश छापलेला आहे. तो उपदेश स्वतः योगिराज गुळवणीमहाराजांनी श्री.शंकरकाकांना केलेला होता. आणि श्री. शंकरकाकांनी त्याचे शेवटपर्यंत पालन केले. डॉ. देशमुखांच्या घराण्यात भक्तीभाव हा असा परंपरागत आहे. डॉ.देशमुखांचे बीडला हॉस्पिटल आहे, हाताला यश आहे आणि मुख्य म्हणजे ह्या सर्व लौकिक यशाच्या जोडीला आत्यंतिक सश्रद्धताही त्यांच्याठायी आहे. ही प्रवचने उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार.


प.पू.महाराजांना जनसामान्यांविषयी असलेला कळवळा बघितला, विवेकाचा दिवा हातात घेऊन त्यांनी मार्गस्थ व्हावे ही त्यांच्या अंतर्यामी असलेली तळमळ बघितली आणि मुख्य म्हणजे तत्वज्ञानाच्या दृष्टीने श्रेष्ठ असलेल्या भारतीय विचारांचा मागोवा सर्वांनी घ्यावा ही त्यांची उत्कट ओढ अनुभवली की संत नामदेवांनी लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाच्या ज्ञानेश्वरांविषयी काढलेले 'अध्यात्म विद्येचे दाविलेसे रुप। चैतन्याचा दीप उजळिला।' हे उद्‌गार आठवतात. प्रपंचात राहून परमार्थ विवेक कसा साधता येतो हे त्यांनी स्वतःच्या जगण्यातून दाखविले आहे. सामान्य माणसे एका ठराविक चाकोरीतून जगत असतात. त्यांच्यापेक्षा प.पू. महाराजांच्या सारख्यांची भूमिका फारच वेगळी असते. 'या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी' ह्या पातळीवरचे

त्यांचे जगणे असते. त्यांची वुद्धि नेहमी स्थिर असते, मनःशांती कधी ढळत नाही. अशा संतपुरुषांच्या सहवासात निरामय शांतीचा अनुभव येत असतो.

भक्तिमार्गात करुणेला महत्व आहे. व्याकुळ झालेला अर्जुन, "येथ जीवाला कृपानिधी । कारुण्य तुझे ।।" अशा शव्दात श्रीकृष्णाला आळवतो. अमृतानुभवातही सद्गुरुंचे वर्णन करताना ते कारुण्याची प्रत्यक्ष मूर्तीच आहेत, असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. अशा कारुण्यसिंधू सद्गुरु दत्तमहाराजांना मनःपूर्वक नमस्कार करुन हे लेखन थांबवते.

डॉ.सौ.माधुरी पणशीकर
११, गुडविल बिल्डिंग,
मनमाला टँक रोड,
माहीम, मुंबई-१६.


## श्री सद्गुरु मांदियाळी




श्री दत्तात्रेय



पू. श्रीपादश्रीवल्लभ



पू. नृसिंह सरस्वती



पू. वासुदेवानंद सरस्वती

।। गुरो तुझी ही पदवारीधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ।।

ओम् नमो सद्गुरु तूं ज्योतिषी। एकात्मतेचे घटित पाहसी।
चिद्ब्रह्मेंसी लग्न लाविशी। ओम् पुण्येंसीं तत्त्वतां ॥
वधूवरां लग्न लाविती। हें देखिलें असे बहुतीं।
आपुली आपणा लग्नप्राप्ती। हे अलक्ष्य गती गुरुराया ॥

ओम् नमो सद्गुरु धन्वंतरी। ज्याची दृष्टीचि निरुज करी।
त्यावांचोनि संसारीं। भवरोगु दुरी न करवे।
ज्या भवरोगाचेनि दर्पें। फुंफात तापलीं त्रिविधतापें।
'मी माझें' येणें संकल्पें। वाग्जल्पें जल्पती ॥

जय जय सद्गुरु परम। जय जय सद्गुरु पुरुषोत्तम।
जय जय सद्गुरु परब्रह्म। ब्रह्मा ब्रह्मनाम तुझेनी ॥
जय जय सद्गुरु चिदैक्यस्फूर्ती। जय जय सद्गुरु चिदात्मज्योति।
जय जय सद्गुरु चिन्मूर्ती। मूर्तामूर्ती चिद्रूप ॥

'जागृती' जागे तुझेनि हरिखें। 'स्वप्न' स्वप्ना तुझेनि देखे।
'सुषुप्ती' सुखावे जेणें सुखें। पूर्ण संतोखें तुझेनि ॥
मी जे जे 'विषय' भोगीं। तें भोक्तेपण तुझे अंगी।
तुझेनि निजसंयोगीं। मी पणें जगीं वर्तविशी मज ॥

सुखेंचि तुझें नाम घेतां। घातु करिसी जीविता।
जीवु घेऊनि तत्त्वतां। होसी सर्वथा कृपाळू ॥
तुझे नामाचें प्रबळ बळ। माथा नुधविती कळिकाळ।
चारी मुक्ति केवळ। होती निश्चळ निजदासी ॥

आतां सद्गुरु वर्णवेना। जेथे माया स्पर्शों सकेना।
ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ॥
न कळे न कळे नेति नेति। ऐसें बोलतसे श्रुती।
तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठे ॥



प. पू. ताईमहाराज चाटुफळे

# अवधूतांचा उपदेश

**यन्नामस्मरणाद्दैन्यं पापं तापश्च नश्यति।**
**भीतिग्रहार्तिदुःस्वप्नं दत्तात्रेयं नमामि तम्।**

**नारद मुनींनी** वसुदेव देवकीला सांगितले" तुमच्या कल्याणासाठी मी तुम्हाला भागवत धर्माचा उपदेश केला. जर तुम्ही श्रद्धेने त्याप्रमाणे आचरण केलेत तर शेवटी सर्व आसक्तीतून मुक्त होऊन परमपदाला पोहोचाल. तुमच्या पुत्राच्या रुपाने सर्वशक्तिमान श्रीकृष्ण या भूतलावर अवतीर्ण झाले. तुमच्या भाग्याचे काय वर्णन करणार ! परमेश्वराचा तुम्हाला फार निकटचा सहवास लाभला. त्याच्याबरोबर तुम्ही बोललात, त्याला आलिंगन दिलेत, खेळवलेत, त्याच्यावर प्रेम करुन तुमचे अंतःकरण पवित्र झाले आहे. वसुदेवजी, शिशुपाल व पौंड्रक आणि शाल्व राजांनी तर वैरभावाने श्रीकृष्णांचे स्मरण केले तरीसुद्धा त्यांची चित्तवृत्ती कृष्णाकार झाली आणि त्यांना सायुज्य मुक्ति मिळाली. मग जे प्रेमाने, श्रद्धेने, भक्तीने श्रीकृष्णांचे चिंतन करतील त्यांना श्रीकृष्णांची प्राप्ती होईल यात संशय काय? वसुदेवजी, तुम्ही श्रीकृष्णांना फक्त आपला मुलगा समजू नका. ते सर्वात्मा, सर्वेश्वर, कारणातीत आणि अविनाशी आहेत. त्यांनी मानवाप्रमाणे सर्व व्यवहार करुन आपले खरे ईश्वरी स्वरुप झाकून ठेवले आहे. या पृथ्वीला भार झालेल्या राजवेषधारी असुरांचा नाश

आणि संतांचे रक्षण तसेच सामान्य जीवांना परम शांती आणि मुक्ती देण्यासाठी अवतीर्ण झाले आहेत. आणि म्हणूनच या त्रिभुवनात त्यांच्या कीर्तीचा सुगंध दरवळतोय. सर्व असुरांचा, राजांचा नाश करण्याकरता आणि धर्माच्या संरक्षणाकरता परमात्मा आलेला आहे. ही भावना तुम्ही ठेवा, ईश्वरबुद्धीने कृष्णाकडे पहा." असे नारदांनी सांगितल्यानंतर वसुदेव, देवकी यांच्या मनातला सगळा मोह दूर झालेला आहे. शुक्राचार्य सांगतात,"राजा, एके दिवशी सकाळच्या वेळेला आकाशामध्ये अनेक विमाने आलेली आहेत. भगवान श्रीकृष्णांच्या दर्शनाकरता ब्रह्मादिक सगळे देव तिथे आले. स्वर्गाच्या उद्यानामध्ये असलेली कल्पवृक्षाची पुष्पे त्यांनी आणलेली आहेत. आणखी द्वारकेवरती, भगवान श्रीकृष्णांच्या वाड्यावरती तो पुष्पवर्षाव केलेला आहे. ते जे दिव्य, सुंदर शरीर आहे ते एकदा पहावं म्हणाले. काय लीला केलेल्या आहेत, किती पराक्रम आहेत, किती आणखी कर्म आहे. आणि त्या द्वारका नगरीमध्ये आले ते. आणि त्यांना कृष्ण दर्शन झालं. " गोपालकृष्ण महाराज की जय"

श्रीकृष्णांचे दर्शन झाल्याबरोबर पुष्पवृष्टी करुन त्यांनी स्तुति करायला आरंभ केलेला आहे. "हे परमेश्वरा, आपल्या चरणाला आम्ही सर्व देव नमस्कार करीत आहोत. भावयुक्त मुमुक्षु लोक या आपल्या चरणाचे चिंतन अखंड करीत आहेत, कर्मपाशातून मुक्त होण्याकरता आपले चरण हेच साधन आहे. ही आपली मायाशक्ती विलक्षण आहे. या मायाशक्तीचा स्विकार करुन आपण हे विश्व उत्पन्न करता, संरक्षण करता, पुन्हा त्याचा संहारही करुन टाकता. पण या कर्माचा कर्तृत्वाभिमान आपल्याला नाही. केवढी लोकोत्तर कार्यं होताहेत आपल्याकडून पण त्याचा चित्तावर काहीही परिणाम नाही. होऊन जातात



कार्यं. अशी अखंड कृपा आपली आमच्यावर असावी" अशी ब्रह्मादिक देवांनी आणखी प्रार्थना देवाची केली.

शेवटी ब्रह्मदेव म्हणताहेत, "देवा, भूमीचा भार दूर करावा अशी आम्ही विनंती आपल्याला पूर्वी केली होती. त्याप्रमाणे आपण अवतार घेऊन आलात या भूमीवर. सर्व कार्य आपण आमच्या इच्छेप्रमाणे केलेले आहे. सज्जनांच्या ठिकाणी धर्मस्थापना आपण केली, त्यांच्या द्वारांनी धर्माचा प्रसार होतो आहे. सगळ्या लोकांना पवित्र करणारी आपली कीर्ती सगळ्या जगामध्ये पसरलेली आहे. जगाच्या हिताकरता म्हणून यदुवंशामध्ये अवतार धारण करुन ही अलौकिक आणखी कृत्यं आपण केलेली आहेत. कलियुगामध्ये जे जे लोक आपल्या या दिव्य चरित्राचे श्रवण करतील, चिंतन करतील ते या अज्ञान बंधनातून, माया बंधनातून आणखी मुक्त होतील. यदुवंशात अवतार घेऊन आपल्याला सव्वाशे वर्षाचा काळ झालेला आहे. आता आमचं देवांचं कार्य काही राहिले नाही. यदुकुळालाही विप्र शाप झालेला आहे. याचाही नाश होणार आहे. तेव्हा आपली इच्छा असेल तर आपण आपल्या स्थानाला, वैकुंठ लोकाला यावं आणि आमच्याही स्थानामध्ये आमच्याकडूनही सेवा करुन घ्यावी."

अशी प्रार्थना ब्रह्मदेवांनी केल्यानंतर भगवान म्हणाले, तसेच ठरवलयं मी आता बहुतेक यायचंय आता वैकुंठ लोकाला. इथले सगळे कार्य आटोपलेले आहे. पण हे यादवांचे कुळ हे असेच ठेऊन भागणार नाही. पराक्रम आहे, त्याचप्रमाणे उन्मत्तपणाही वाढलाय म्हणाले बराच. हे जर इथेच सगळेच राहिले तर सगळ्या लोकांचा नाश हे करतील, म्हणाले, म्हणून याचा संहारच करुन मी येणार आहे. त्यावेळेला आपल्याही लोकामध्ये येऊन जाऊ असे ब्रह्मदेवांना भगवंतांनी सांगितले.

सर्व देवमंडळींनी श्रीकृष्णांना नमस्कार केला आणखी आपल्या आपल्या स्थानाला सर्व मंडळी निघून गेलेली आहेत.

द्वारकेमध्ये भयंकर अपशकुन होऊ लागले. काहीतरी मोठे संकट येण्याची चिन्हं दिसताहेत. भगवंतांनी लहान थोर सर्व मंडळींना सांगितले आता जर जिवंत राहायचे असेल आपल्याला, तर हे स्थान सोडले पाहिजे. प्रभास क्षेत्राला आपण जाऊया. दक्षाच्या शापामुळे आणखी क्षययोगी झालेला चंद्र या प्रभास तीर्थामध्ये स्नान करुन सर्व रोगातून मुक्त झाला म्हणाले. असे ते तीर्थ आहे. तिथे आपण जाऊ, स्नान करु, देव, पितरांचे अर्चन करु, सर्वांना अन्नदान आपण करु, याप्रमाणे पुण्यकर्मांनी आपला हा काळ घालवायचाय, संकटं दूर करायची आहेत. अशी आज्ञा भगवंतांनी दिल्यानंतर सर्वही यादव निघाले. रथ वगैरे तयार केले त्यांनी आणि सर्व यादव मंडळी द्वारकेतून बाहेर पडायला लागली.

उद्धवजींनी हे सगळे पाहिले. आणखी भगवान श्रीकृष्णांच्या भेटीकरता ते एकांतामध्ये आता बसले होते तिथे गेले, त्यांना सगळीकडे जायला परवानगी होती, ते मोठे विश्वासू होते, मंत्री होते, भक्त होते. नमस्कार केला, भगवंतांच्या चरणावर आणखी मस्तक ठेवलेले आहे. हात जोडून उद्धवजी म्हणताहेत "हे देवाधिदेवा, परमेश्वरा, श्रीहरी, या कुळाचा संहार करुन आणि या लोकांचा त्याग करुन आपण जाण्याची इच्छा करता आहात हे खरे आहे ना? विप्रशाप दूर करण्याचे सामर्थ्य आपल्याला नाही काय महाराज? पण आपण तिकडे लक्ष देत नाही. उलट चला गाव सोडून आपण जाऊया, तीर्थाला जाऊया, हे करुया असेच आपण सांगायला लागलात, म्हणजे बहुतेक आपण त्या विप्रशापाकडे दुर्लक्ष केलेले आहे. पण मी मात्र आपल्या चरणांना



सोडून आता राहाणार नाही. मलाही आपल्याबरोबर आपल्या निजधामाला घेऊन चला देवा, आजपर्यंत आपला समागम मला घडला आहे. आपल्या दिव्य लीला मला पहायला मिळालेल्या आहेत. नेहमी आपलं सान्निध्य आहे. प्रसाद रोज मिळतो आहे, त्याचप्रमाणे आपली वस्त्रंच मला परिधान करायला मिळत आहेत. असे आम्ही आपले दास आपल्या मायेतून म्हणाले मुक्त झालेलो आहोत. आम्ही आणखी या कर्ममार्गामध्ये फिरतो आहोत सारखे, परंतु आपल्या लीला वर्णन करणे, ऐकणे वगैरे या साधनांनी आम्ही या अज्ञानातून मुक्त झालेलो आहोत. आम्हाला माया बंधन वगैरे काही नाही." याप्रमाणे उद्धवजींनी आपले मनोगत निवेदन केल्यानंतर त्या भक्ताला, उद्धवाला भगवंतांनी उपदेश करायला आरंभ केलेला आहे.

भगवान सांगताहेत,"उद्धवा, खरी गोष्ट आहे बाबा, तू म्हणालास ना, संहार ह्या कुलाचा करुन आपण निजधामाला जाणार आहोत! हो, आता जायचं आहे वैकुंठ लोकाला, आत्ताच हे सगळे ब्रह्मादिक देव येऊन गेले, त्यांनीही प्रार्थना केली आहे, तेही वाट पहाताहेत. ज्याकरता मी अवतार घेतला ब्रह्मदेवाच्या इच्छेने, ते सगळे कार्य संपलेले आहे. आता इथे कशाकरता रहायचे मनुष्य लोकामध्ये? कुळालाही शाप झालाय. ही द्वारकानगरी सातव्या दिवशी बुडवून टाकणार आहे. मी ज्यावेळेला या लोकातून आणखी बाहेर जाईन वैकुण्ठलोकाला त्याचवेळेला कलीचा अधिकारही या ठिकाणी सुरु होणार आहे. तू मात्र आता इथे राहू नकोस. अधर्माकडेच जास्ती जास्ती आवड असणारी मंडळी या कलियुगामध्ये होणार आहेत. तू सर्व स्नेह पाश तोडून टाक आणि माझे चिंतन करीत समदृष्टीने पृथ्वीवर संचार करीत रहा. मनाने, वाणीने, इंद्रियांनी जे जे काही आपल्याला समजून

येतंय, दिसतेय ती सर्वही माया आहे असे तू समजून रहा. तू इंद्रियांचा, मनाचा निग्रह कर आणि हे सर्व विश्व म्हणजे वस्तुतः आत्मरुपच आहे हे जाण. नामरुपात्मक विश्व मनातून काढून टाक आणि सच्चिदानंदघन जे परमात्म स्वरुप आहे त्याचे चिंतन करीत पृथ्वीवर तू संचार कर म्हणजे तुला कोणचेही विघ्न होणार नाही, आणखी पूर्ण शांती प्राप्त होईल."

असे भगवंतांनी सांगितल्यावर उद्धवजी म्हणताहेत,"महाराज, सर्व त्याग करायला आपण सांगता आहात पण हे किती कठीण आहे. मनातल्या सगळ्याही विषयवासनांचा त्याग झाला पाहिजे. नुसता विषयांचा त्याग बाहेरुन करणे म्हणजे त्याला त्याग म्हणत नाहीत. मनातल्या सगळ्या वासना गेल्या पाहिजेत. आणि हे तर कठीण आहे. आपली भक्ति ज्यांना नाहीये त्यांना तर फारच कठीण आहे. तेव्हा देहाच्या ठिकाणी अहंकार, सर्व एकंदर स्त्री, पुत्र म्हणा किंवा सगळंही द्रव्य वगैरे याच्या ठिकाणी ममता, हे सगळे दोष वाढलेले आहेत. आणि ही अहंकार, ममता सगळी कशी सोडून द्यायची, यातून कसं बाजूला व्हायचं, हेच मला कळत नाही. मी आपल्याला शरण आलेलो आहे. आपण सर्वज्ञ आहात. सर्व नियामक आहात, करवून घेणारे आहात. भक्ताचे कल्याण करणारे आहात. तेव्हा मला आपण मार्गदर्शन करा."

अशी प्रार्थना उद्धवजींनी केल्यानंतर भगवान सांगताहेत, उद्धवजी, आपला आपणच उद्धार करुन घ्यायचाय बाबा, मन आहे ना आपल्याला! विचार करु शकणारे जे आहेत लोक ते स्वतःचा स्वतःच उद्धार करुन घेतात. हे सगळे मनाने विचार करुन ठरवायचंय. खरं, खोटं मनुष्य जन्म मिळाल्यानंतर ही विचारशक्ति वाढविता येते. बुद्धितत्व जे आहे ते आणखी विकसित होऊ शकतं. सांख्यमार्ग आहे, योगमार्ग आहे. या मार्गांनी जाऊन



माझा आणखी जास्ती प्रभाव म्हणा, आविर्भाव कुठे कुठे आणखी जास्ती आहे वगैरे हे सगळे ते पाहू शकतात. या सर्व शरीरामध्ये हे 'पौरुष शरीर' म्हणजे माणूस शरीर जे आहे, ते मला अत्यंत प्रिय आहे. या मनुष्य शरीरामध्येच माझे मार्गदर्शन होऊ शकते. आणखी माझी प्राप्ती होऊ शकते. म्हणून आपल्या मनानीच आपण विचार करुन आपली बुद्धि शुद्ध करायची आहे. जगामध्ये काय घ्यावे आणि काय सोडावे हे बुद्धिने ठरवायचंय म्हणाले. अमुक ग्राह्य आहे बाकी सगळेच त्याज्य. हे बुद्धीला पटले की शांतता प्राप्त होते.

याकरता उद्धवजी तुम्हाला एक पूर्वीचा संवाद सांगणार आहे. अवधूत दत्तात्रेय आणखी यदुराजा यांचा. आमच्या कुळाचा तो पूर्वज आहे, याच वंशामध्ये आम्ही जन्माला आलो. तो यदुराजा, त्या दोघांचा संवाद. यदुराजा आणखी पृथ्वीवर फिरत असताना अवधूत दत्तात्रेयांची भेट त्याला झालेली आहे. तरुण आहेत. दत्तात्रेय तरुण वयामध्ये आहेत. उत्कृष्ट ज्ञानी आहेत. पाहिल्याबरोबर आणखी तेजःपुंज स्वरुप आहे. यदुराजाही मोठा धर्मशील होता. त्याने अवधूतांना विचारले,"महाराज, काय गांभीर्य आहे. आपल्याला पाहिल्याबरोबर आमचंसुद्धा मन स्थिर होतंय. आपल्याजवळ इतका आनंद आहे. शांत अंतःकरण असले म्हणजे आनंद आहे. तर हा इतका आनंद आपण कसा मिळविला आपल्या बुद्धिने? इतर सर्वही लोकांकडे पाहिलेलं असताना धर्म, अर्थ,काम यांची प्राप्ती होण्याकरता प्रयत्न सर्वही जीव करताहेत. त्यांचं कोणचेही काम हेतुशिवाय नाही. सहेतुक सगळी कर्म चाललेली आहेत. आयुष्य पाहिजे, यश पाहिजे, संपत्ति पाहिजे, सत्ता पाहिजे, आपण समर्थ आहात. उत्कृष्ट आणखी विद्वान दिसता आपण. सर्वही करू शकता आपण. तरी काहीही

आपण करत नाही, स्वस्थ पडून राहिला आहात म्हणजे काय? काही सर्व चुकलेत का लोक सगळे? प्रयत्नवाद आहे. सगळी कर्म करताहेत. व्यवहारातही कर्माची आवश्यकता आहे आणि शास्त्रानीही कर्म करायला सांगितलेली आहेत. पण आपण तर काहीही करत नाही. बरं इतकी कर्म करणारे सगळे लोक कामक्रोधादि विकाराने दग्ध होत आहेत. काम, क्रोध, लोभ हा दावाग्नी सगळा पेटलेला आहे म्हणाले, सगळे विकार मनामध्ये उत्पन्न होत आहेत. आणि त्यामुळे ते दग्ध होत आहेत. पण आपल्याकडे पाहिले तर आपल्याला कोणचाही विकार नाही. काम नाही, क्रोध नाही, लोभ नाही, दोष नाही, काही नाही. इतका आनंद आपल्याला मिळाला कसा? यदुराजा विचारतो आहे. काही न करताना आनंद मिळतो काय महाराज?

विषयाचा संबंधसुद्धा नाही आपल्याला आणि तरी आनंद आहे! आम्ही विषयाचा संबंध मिळावा, विषयापासूनच आनंद मिळतो अशा समजुतीने दुसरे संग्रह करण्याच्या मागे लागलो. आणि त्यावेळेला आनंद गेला हातचा.

याप्रमाणे यदुराजाने विचारल्यानंतर त्याची जिज्ञासा पाहून, हा सगळा आत्मानात्म विचार म्हणा, हेयोपादेय विवेक हा सांगायला त्यांनी आरंभ केला. अवधूत सांगताहेत राजा, मी म्हणाले पुष्कळ गुरू केलेले आहेत. ज्याच्यापासून जो गुण घेतला तो मी गुरू केला म्हणाले. गुण घेण्याकरता गुरू आणि दोष टाकण्याकरता गुरू. कसं वागावं हे मी शिकलो, कसं वागू नये हेही शिकण्याकरता मी गुरू केले. जगामध्ये ग्राह्य काय आहे आणि त्याज्य काय आहे हा निर्णयच होत नाही जीवांचा. त्यामुळे गोंधळ आहे. हे करून पहावं, ते करून पहावं, हे मिळावं, ते मिळावं असं जीवांना वाटतं. काय मिळावं ते अगोदर निश्चित नाहीये. त्यामुळे



सगळं मनाचं चांचल्य आहे, मनाची बुद्धिची, स्थिरता नाही. त्यामुळे आणखी दुःख आहे. मी ती बुद्धि स्थिर केली. तर पहिली गुरू म्हणजे ही पृथ्वी आहे.त्या गुरूंमध्येसुद्धा असं आहे. की चेतन, अचेतन. हे सगळे गुरू आहेत. पक्षी गुरू आहेत, पशु गुरू आहेत. पंचमहाभूतं गुरू आहेत. पिंगला वेश्या गुरू आहे. घरातील उपवर झालेली कन्याही गुरू आहे. म्हणजे बुद्धिने, विचार करणारी जी बुद्धि आहे त्या बुद्धिने जे जे मार्गदर्शन करतात ते ते गुरूतत्व आहे म्हणून त्याचा स्वीकार केला. मार्गदर्शन कुठूनही मिळू शकतं म्हणाले. आपल्या बुद्धिला मात्र जिज्ञासा पाहिजे. उत्कंठा पाहिजे. अशा गुरूचा शोध करणं. 'शाब्देपरेचनिष्णात' गुरू मिळतील म्हणाले, परंतु त्याच्यापूर्वी मार्गदर्शन स्वीकारणारी बुद्धि व्हायला हवी. हे सांगताहेत अवधूत. पहिलं आणखी शिक्षण या भूमीपासून मी घेतलं. आता परमार्थ मार्गाला जायचंय आपल्याला, तर त्यावेळेला आणखी क्षमा, तितिक्षा ही पहिली आहे. पहिला गुण आहे क्षमा, शांती. गीताज्ञानाचा उपदेश सुरू करताना आरंभालाच भगवान या तितिक्षेचा उपदेश करत आहेत. ही तितिक्षा पृथ्वीपासून मी शिकलो. कोणीही कितीही काही केलं, लोकांच्यापासून पुष्कळ उपसर्ग होतो म्हणाले आपल्याला. सगळेच काही मान देणारे नसतात. अपमानाचाही त्रास आहे, मानाचाही त्रास आहे. तरी जरी कोणाकडूनही आपल्याला उपसर्ग झाला तरीसुद्धा धैर्य अंतःकरणामध्ये धारण करुन आपला मार्ग मात्र त्या साधकाने सोडू नये. साधकाला हा उपदेश आहे सगळा. हे सगळे गुरु साधकाच्या करता आहेत. ही जी पृथ्वी आहे, ही पृथ्वी अशी तितिक्षा वृत्तीची आहे. किती जमीन उकरतात लोक, जमीन जाळताहेत, वाटेल ते करतात, पण सर्व सहन करणारी ती आहे. आणि हा तिचा गुण अवधूत म्हणताहेत मी

घेतला बाबा. त्यामुळे अगदी समाधान मला आहे. वृक्षरुपी पृथ्वी आहे. पर्वत रुपी पृथ्वी आहे. सर्वस्व देऊन टाकतात, ते वृक्ष काय ठेवतात काय. फळं, फुलं तोडून सगळेच नेले तरी काही बोलत नाही. अशी वृत्ती पाहिजे. हे भूमीपासून मी शिकलेलो आहे. तितिक्षेचा अभ्यास!

त्याच्यानंतर वायू. वायूपैकी प्राणवायू म्हणून जो आहे, शरीरात सारखा संचार करणारा, आतला वायू त्याला प्राणवायू म्हणतात. त्या प्राणाची वृत्ती कशी आहे हे मी पाहिले आणि त्याप्रमाणे मी वागतो म्हणाले. प्राण जसा चालतो आहे त्याप्रमाणे आणखी साधकाने रहाण्याचा अभ्यास करावा. म्हणजे काय? इंद्रियं जी आहेत, त्या इंद्रियांना जे आवडेल त्याच्याकरता आपण प्रयत्न करतो. चांगले चांगले खायला पाहिजे, चांगली वस्त्रं पाहिजेत. चांगले सगळे एकंदर ऐकायला मिळाले पाहिजे, हे सगळे प्रयत्न आहेत. पण इंद्रियाला प्रिय जे आहे त्याच्यावर संतुष्ट न रहाता, जे आपल्याला ज्यावेळेला मिळेल त्याच्यावरती संतुष्ट राहण्याचा अभ्यास हा प्राणाचा, प्राणवृत्तीचा अभ्यास आहे. प्राणवायू! याला काहीही चालते म्हणाले. चोवीस तास कार्य करतो. कोणचंही इंद्रिय चोवीस तास काम करणार नाहीये. फक्त प्राणवायू मात्र चोवीस तास काम चाललेलं आहे. सर्वात तो मुख्य आहे. विचार केला असताना बाकीची इंद्रियं काय, बनताहेत सगळी. पण हा प्राणवायू इतका श्रेष्ठ आहे की तो सर्व कार्य करतो आहे. चोवीस तास अखंड कार्य चाललेले असताना, अपेक्षा काही नाहीये. नुसत्या पाण्यावरही प्राणवायू राहू शकतो. लिंबाचा रस, कडुलिंबाचा रस घेऊनही प्राणवायू राहू शकतो. प्राणवायुला गुरु करुन असं वागावं. बाह्य वायू हा सर्व ठिकाणी फिरतो आहे. कुठेही आसक्त नाही. चांगल्या जागेकडून जातो,



वाईट जागेकडे जातो, स्मशानातून जातो, देवमंदिरातून जातो, उत्तरतीर्थ जलावरुन, नद्यांवरुन जातो आहे. सगळीकडे जातो. पण आसक्ती कुठेही नाही. ही एक वृत्ती. याचाही अभ्यास करण्यासारखा आहे. जगात तर रहायचंय. नाना प्रकारच्या वृत्तीचे आणखी लोक आहेत. जीव आहेत. आणि तिथे राहून जर हे बरंय, ते बरंय अस वाटायला लागलं तर ते काही योग्य नाही. गुण दोष मनामध्ये येऊन उपयोग नाही. जीव अनेक प्रकारच्या विषयांच्या ठिकाणी जरी असला तरी सुद्धा बुद्धि गुणदोषरहित असायला हवी. तो वायू जातो इतरही चांगल्या ठिकाणी, वाईट ठिकाणी सगळीकडे जातो. त्याप्रमाणे गुणदोषरहित समदृष्टी हवी. सम अंतःकरण ठेऊन आणखी त्या साधकानी रहावे याकरता हे वायूचं उदाहरण दिलेले आहे.

त्याच्यानंतर आकाशतत्व आहे. अनासक्त कसं व्हायचं? आसक्ती सुटायची कठीण, कारण सगळेही विषय आहेत. त्यांना सोडून अनासक्त व्हायचं कसं? त्याकरता आकाश तत्वाला गुरू मानलं. आकाश म्हणाले, सर्व ठिकाणी आहे. सर्वही घडामोडी आकाशामध्येच चाललेल्या आहेत पण त्याला कशाचा संबंध आहे काय? पावसाच्या धारा सारख्या पडताहेत, ऊन तापतंय, आकाशातच सर्व चाललेलं आहे. पण आकाश तत्व हे स्वभावतः असंग आहे. त्याला कशाचा संबंधच होऊ शकत नाही. कमलाचं पान पाण्यामध्येच आहे म्हणाले. पण पाण्यातून वर काढल्याबरोबर पाण्याचा एक थेंबसुद्धा त्याच्यावर रहात नाहीये. म्हणजे स्वाभाविक असंग वृत्ती जी आहे त्याचं चिंतन केलं पाहिजे. आत्मस्वरुप, आपल्याला वस्तुतः कशाचाही संबंध नाही, होऊ शकत नाही आहे. आकाशाप्रमाणे आहोत. म्हणून आकाशाला गुरू केले. संग आणखी कशाचाही नाही. कुणाचाही प्रभाव आपल्यावर

पडणार नाही. गुण नाही, दोष नाही. आत्मतत्व, ब्रम्हतत्व हे निर्दोष आहे आणि जे स्वभावतः निर्गुण आहे. त्याचं जर चिंतन सुरू केले तर आसक्ती होती कशाला म्हणाले. वायूप्रमाणे अनासक्त रहावे म्हणाले. जल जे आहे, तीर्थजल पवित्र असते म्हणाले, स्वच्छ आहे, तहान लागल्यानंतर प्यायल्याबरोबर समाधान होतं आहे. तसं, साधकांनी त्या जलाप्रमाणे, असावं.

पवित्र आहे, कोणीही आला तरी त्याला दृष्टी नाही, वाणी नाही मनानी आणखी त्याला आनंद त्याचप्रमाणे सर्व जलाचा संग्रह करतात.

अर्थसाम्य असले पाहिजे असाच एक वाद निघालेला आहे सध्या. पुष्कळ त्याचे अनुयायी आहेत. सर्वत्र अर्थ समान असला पाहिजे. एका ठिकाणी अर्थसंग्रह उपयोगी नाही. परंतु अर्थसंग्रह तर आवश्यक आहे. अर्थसंग्रहाशिवाय राष्ट्र कसं चालणार? संग्रह तर करायचा नाही. त्याकरता अवधूतांनी आणखी त्याला सांगितले की सूर्यनारायण संग्रह करतात म्हणाले परंतु देऊन टाकतात. तशी वृत्ती साधकांनी ठेवली पाहिजे. संग्रह त्याला करता येत असेल तर करावा परंतु त्याचा त्यागही केला पाहिजे म्हणजे आसक्ती मिटली. उद्देशच तसा. त्यागाकरताच अर्थसंग्रह आहे. या संग्रहाकरता दोन गुरू सांगितलेले आहेत. सूर्य एक गुरू आहे.

दुसरा गुरू पक्षी आहे. त्या पक्षालाही त्यांनी गुरू केलेले आहे. टिटवीला मांसाचा गोळा मिळाला. तो चोचीमध्ये घेऊन तो पक्षी निघाला. ज्यांना मांसाचा पिंड मिळाला नाही, ते सगळे पाचपन्नास पक्षी त्याच्या अंगावर धाऊन आले. एकटा काय करणार. त्याने आपल्या तोंडातला मांसाचा तो गोळा टाकून दिला. सगळे पक्षी निघून गेले आणखी याचे प्राण वाचले म्हणाले,



हा सुखी झाला. सूर्यनारायण संग्रह करतात पण देतात सगळ्यांना. ह्या पक्षाने संग्रह केला पण आपल्याकरता केला. म्हणजे संग्रह, अर्थसंग्रह हा दोष नाहीये. संग्रह करणाऱ्याची बुद्धि सुधारण्याचा प्रयत्न करायचा. त्यागाकरता केलेला संग्रह हा गुन्हा नाही. पण स्वतःकरता केलेला संग्रह हा दोष आहे. त्यावेळेला इतर सगळे द्वेष करणार आणि अशांती होणार. त्याला काही नाही. कायदा नको, काही नको स्वभावच आहे म्हणाले. साम्यवाद हा वाटेल त्या वेळेला निर्माण होतो. प्रचार करण्याची गरज नाही. असे दोन गुरू करून या संग्रहाबद्दलचं उत्तर देऊन आपली बुद्धि कशी ठेवावी हे अवधूतांनी सांगितले.

गुरूंचे आणखी काय गुण आहेत जे आपण घेतले ते अवधूत सांगताहेत. प्रारब्धवाद याला म्हणतात. नाथ महाराज सांगताहेत. जे आपले संचित असेल त्याप्रमाणे सुख, दुःख मिळतं म्हणाले, हाच उपदेश अवधूतांनी सांगितला आहे. इंद्रियांनी, इंद्रिय आणि विषयाचा संबंध आला म्हणजे सुख मिळतं, अशा समजुतीने, भोग ज्याला म्हणतो त्या सुखाकरता प्रयत्न चालू आहे. ते सुख स्वर्गात काय किंवा याठिकाणी काय, जे मिळायचं ते मिळते. त्याची इच्छा करायची, नी त्याच्याकरता प्रयत्न करायची जरूरी नाही. हा फार मोठा विशिष्ट सिद्धांत मांडलेला आहे. 'अजगर वृत्ती!' काहीही करायचं नाही. जे काही मिळायचं असेल ते मिळतं. म्हणून प्रल्हादजींनीही सांगितलं होतं. सुखाकरता प्रयत्न केला जातो तो काही बरोबर नाही म्हणाले आणि याला त्यांनी असा तर्क मांडलेला आहे. दुःखाकरता प्रयत्न कोणीही करीत नाही. पण दुःख मिळतं की नाही म्हणाले. म्हणावं लागतं ना! तसंच सुखही मिळू शकतं म्हणाले. पण तितके धैर्य आम्हाला नसल्यामुळे हा प्रारब्धवाद त्याज्य ठरलेला आहे. परंतु तो मोठा

महत्वाचा आहे म्हणतात. मी ही अजगर वृत्ती धारण करून पडून रहातो म्हणाले. चांगले अन्न मिळालं तर घेतो. नाही मिळालं तर नाही घेत. मिळालं नाही तर निजून रहातो म्हणे. त्यामुळे असं होतं की इंद्रियांच्या शक्ती कमी होतात. त्या इंद्रियांबरोबर सगळ्याही आणखी विषयवासना कमी कमी होतात म्हणाले आणि क्रमाक्रमानी आणि अशाप्रकारचे लोकोत्तर धैर्य, वगैरे आपोआप उत्पन्न होतं. ह्याकरता अजगराप्रमाणे मी वागतो म्हणाले. म्हणजे या बाबतीत हं! प्रयत्न न करणं! प्रारब्ध म्हणजे पूर्वीचे कर्म आहे ते, पूर्व जन्मामध्ये केलेले कर्म, त्यालाच प्रारब्ध असे म्हणतात. जे फलोन्मुख झालेले असेल आणि ते जर सुखाला अनुकूल असेल तर सुख आपोआप मिळते. काही घटना घडून येतात. आपण त्यालाच, प्रयत्नाला प्राधान्य देतो, प्रयत्न केला म्हणून झाले असे समजतो, पण असा एक अभ्यास करण्याचा प्रकार आहे. म्हणून अवधूतांनी सांगितलेले आहे माझा अभ्यास असा आहे म्हणाले. समुद्राप्रमाणे गंभीर रहाणे. गांभीर्याचा अभ्यास आहे म्हणाले. उन्हाळ्यामध्ये पाणी नद्यांचं आटलं म्हणून समुद्र काही आटत नाही आणि पावसाळ्यामध्ये अगदी भरपूर, पुष्कळ पाणी मिळाले म्हणून समुद्र वाढत नाही. त्याचप्रमाणे आणखी अनुकूल परिस्थिती झाली म्हणून आमची वृद्धी झाली, हर्ष वाढलेला आहे. प्रतिकूल परिस्थिती झाली म्हणून विषाद अंतःकरणामध्ये वाटतो आहे. निराशा अंतःकरणात वाढलीये असं नाही. शांत अंतःकरण रहायला हवे.

रुप जे आहे, त्याची आसक्ति जाण्याकरता पतंगाला गुरु केला. या स्त्रीरुपाच्या आसक्तीमुळे किंवा याठिकाणी तो जो त्या मोहामध्ये सापडून आणखी त्याचा कसा नाश होतो त्याला पतंगाचा दृष्टांत दिला आहे. अग्नी पेटलेला आहे, दिवा लागलेला आहे.



आणि तो पतंग त्या अग्नीवर झडप घालतो. रुपाची आसक्ती आहे ही. पण त्याचे पर्यवसान, शेवट काय होतो म्हणाले, त्या पतंगाचा नाश होऊन जातो. तशी स्थिती होती. म्हणून मी त्या रुपासक्तीपासून बाजूला आहे. एक एक, एक एक मोह कसे बाजूला केलेले आहेत आणि कोणच्या विचारांनी केलेले आहेत. योगमार्ग आहे, प्राणवायूचा निरोध केला. कुंभक झाला म्हणजे, मन आपोआप बंद पडेल. प्राणही बंद राहिला, मनही बंद राहिले. सांख्यमार्ग हा विचार मार्ग आहे. प्रत्येक वस्तूचे पर्यवसान कशात होते, तो कसा वागला आणि काय त्याचे फळ त्याला मिळाले. हा सगळा विचार आहे. त्याप्रमाणे आपण वागू नये म्हणून पतंगाला गुरु केले म्हणे.

यानंतर मधमक्षिका! हे संग्रहाचे तिसरे उदाहरण दिलेले आहे. संग्रह केला त्यांनी म्हणजे भोगही नाही आणि त्यागही नाही. कृपण! संग्रह, नुसता मध संग्रह करुन ठेवलेला तो संग्रहही गेला आणि त्यांचा प्राणही गेला. म्हणून सायंकाळला पाहिजे, उद्याला पाहिजे, वर्षभर पुरलं पाहिजे अशा सगळ्या आशा मनामध्ये ठेऊन, मनोरथ करुन संग्रह करणारा जो आहे त्याला हा दोष आहे. याप्रमाणे असे अनेक त्यांनी दृष्टांत सांगितलेले आहेत.

मत्स्य रसासक्ति ही फार मोठी आहे. ही रसासक्ति आणखी जाण्याकरता मत्स्याला गुरु केलं म्हणाले. ही जिव्हा म्हणजे अतिशय आणखी नाशक आहे म्हणाले. निरनिराळ्या रसांचा मोह उत्पन्न झालेला हा जीव, त्या जिव्हेच्या द्वाराने शेवटी आणखी अनेक रोग उत्पन्न होतात. आणि मृत्यूच्या पाशात तो सापडतो. त्या मीनाला खाण्याची इच्छा झाली. जाळ्यामध्ये तो खाण्याचा पदार्थ ठेवलेला आहे. तोंड घालतो आहे आणि त्याचा प्राण

जातो. त्या केवळ रसाच्या आसक्तीने जातो आहे. इंद्रियं बाकीची जिंकता येतात म्हणाले, अन्न, आहार सोडला की बाकीच्या इंद्रियांची शक्ती कमीच होती, कशाला जाताहेत! पण हे रसनेंद्रिय जास्ती वाढते. ताप थांबलेला आहे आणि थोडं थोडं अन्न द्या म्हणतात डॉक्टर. एकदम देऊ नका. रोग्याला तर जास्ती इच्छा इतकी झाली हे खाऊ का ते खाऊ म्हणजे आहार सुटल्यामुळे बाकीची इंद्रियांना शक्तीच राहिली नाही. म्हणून जितेंद्रिय, जितेंद्रिय म्हणून जे काही सामर्थ्य सांगितले आहे त्यांनी. याबद्दल विचार सांगताहेत अवधूत. रसनेंद्रिय जोपर्यंत जिंकलं नाही तोपर्यंत त्याला जितेंद्रिय म्हणता येणार नाही. रस ज्याने जिंकला त्याने सगळे जिंकले. ही रसासक्ती दूर करण्याकरता मीनाला गुरु केले. या रसासक्तीमुळे प्राणनाश त्या मीनाला होतो म्हणजे रसाची आसक्ती उपयोगी नाही. रसासक्ति उपयोगी नाही.

त्याचप्रमाणे बाकीचे हे मनाचे दोष जाण्याकरता निरनिराळे आणखी त्यांनी विचार मांडले. पिंगला वेश्येचेही उदाहरण त्यांनी सांगितले. विदेह नगरामध्ये रहाणारी वेश्या. आता यांचा संचार सगळीकडेच असायचा, योगीच होते हे. म्हणून त्यांनी सगळी उदाहरणं पाहिली. ती म्हणाले संध्याकाळपासून बसली वेश्या. अन्न नाही, पाणी नाही. धनिक कोणीतरी येईल. धन आपल्याला मिळेल. मध्यरात्र झाली तरी कोणी आलं नाही आणि हिला काही धन मिळालं नाही. मग तिच्या मनामध्ये वैराग्य उत्पन्न झालं. काय म्हणाली मी या मोहामध्ये पडले. धनाची आशा. तेव्हा ही आशा करण्यापेक्षा तो जो आत्माराम आहे शरीरस्थ, शरीरात राहाणारा आत्मा, त्याचं जर चिंतन मी केलं असतं तर मला किती सुख मिळालं असतं! असा विचार करुन सर्व आशा ज्यावेळेला तिने टाकून दिल्या त्यावेळेला तिला गाढ झोप



लागली आणि मी हे उदाहरण घेतले. सर्व इच्छा सोडून दिल्या तेव्हां तिला झोप लागली म्हणजे आशा हे मोठं दुःख आहे. दुःखाचं कारण आशा हे आहे. हे मिळावं, ते मिळावं, अशी सोय व्हावी, तशी सोय व्हावी. संपत्तीच्या बाबतीत त्याचप्रमाणे संततीच्या बाबतीत, सत्तेच्या बाबतीत आशेला अंत नाही. वाढत जाते आणि त्यामुळे दुःख वाढत जाते. योगशास्त्रकारांनी शरीर राहाण्याकरता जेवढं अन्न, वस्त्र लागतं त्यापेक्षा जास्ती संग्रह करु नये हा अपरीग्रह शब्दाचा अर्थ सांगितला आहे. ब्रह्मज्ञानी माणसानी सुद्धा दुपारी भिक्षा मागायला जावं म्हणून सांगतात भगवान. शरीर कसं रहाणार? त्यात काही दोष नाही. जे मिळेल आणखी माधुकरी मध्ये तेवढं घेऊन यायचं, पाणी प्यायचं, झालं म्हणाले, संपलं. भिक्षा हे एक औषध आहे शरीराला. अशा समजुतीने ती भिक्षा ग्रहण करायची. रसाकडे लक्ष नाही, काही नाही. माधुकरीमध्ये सगळं एकत्रच होतंय. एकत्रच ते खायचंय. रसासक्ती सगळी जाण्याकरता हे सगळे उपाय आहेत. यानंतर बालवृत्ती! लहान मुलगा दोन,चार महिन्याचा आहे. काही नाही. भूक लागली की रडायला येतंय, दूध घातलं की आनंदानी खेळतोय.

हा एक एक अभ्यास करायला कितीतरी काळ घालविला पाहिजे. बालवृत्तीचा अभ्यास करायचा म्हणजे किती कठीण आहे. बालकाला ज्याप्रमाणे कोणतीही चिंता नाही, मानअपमान नाही, घरात कोणी उपाशी आहे, कोणाला ताप आला आहे, कोणाला काही वेदना होत आहेत, काही त्याला नाही. आनंदामध्ये खेळतो. भूक लागली की रडतो. दूध मिळालं की झालं. त्या बालकाप्रमाणे मी अभ्यास केला म्हणाले, माझी बुद्धि तशीच आहे. मी नुसता स्वस्थ पडून रहातो. काही नाही. प्रयत्न नाही.

चिंता करुन काय करायचं म्हणाले. कोणालाही आणखी ताप आला किंवा काही त्रास व्हायला लागला, काही दुखायला लागलं, पोट दुखायला लागलं तरी लगेच थोडेच ते दोष दूर होणार आहेत? थोडी काही तितिक्षा पाहिजेच की. औषध घेतल्याबरोबर दुसऱ्या मिनिटात बरं होतं काय म्हणे! प्रत्येकाचं कर्म आहे. सुखं दुःखंही ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे मिळतायत हा ही सिद्धांत आहे. असा सगळ्यांवरचा विचार करुन यांनी हे सगळं तयार केलेलं आहे. बुद्धि तयार केली. जो ज्ञानी झालेला आहे तो एक चिंतारहित आहे. आणि जो अज्ञानी, पूर्ण अज्ञानी म्हणजे लहान बालक त्याला एक चिंता नाही. बाकी सगळे मधले चिंताग्रस्त आहेत. शेवटी एका कुमारीचे उदाहरण सांगताहेत. एका मुलीला पाहण्याकरता काही मंडळी आली म्हणाले घरी. घरातील मंडळी गेली असतील बाहेर कुठेतरी. या मुलीनेच आणखी बसायला सांगितले, आसन दिले. पाणीबिणी प्यायला दिलेले आहे. आणखी येतील म्हणाले आत्ता लोक, कुठे बाहेर गेलेले आहेत. आणि ही मुलगी साळी कांडण्याकरता बसली. त्यावेळेला घरात कामंधामं सगळी असायची. घरचं सगळं धान्य वगैरे सगळंच स्वतःचंच असायचं. तिच्या हातामध्ये कांकणे होती. आता कांडायच्या वेळेला ती कांकणे एकमेकांवर आदळू लागली आणि त्याचा आवाज होऊ लागला. पाहुणे मंडळी आलेली, कांकणाचा आवाज होतोय. तिने एक एक कांकण काढून ठेवले. दोन दोन कांकणे ठेवली तरी आवाज व्हायला लागला. मग तिने शेवटी एक एक कांकण ठेवलं म्हणे. ते अवधूत दत्तात्रेय सांगताहेत हं! यावरुन दत्तात्रेयांचे मत असे आहे असं कुणी सांगतील, एक एकच कांकण हातामध्ये ठेवावे असा संशय येऊन कुणीतरी करतील म्हणून सांगायची पाळी आली. तसा अर्थ नाहीये याचा. दत्तात्रेय



पुढे त्याचा खुलासा करणार आहेत. एक कांकण ठेवल्यानंतर आवाज बंद झाला. दत्तात्रेय म्हणाले, मी असा बोध घेतला. अनेक कांकणे कुमारीच्या हातात होती त्यावेळेला आवाज होत होता. अनेक साधक मंडळी जर एका ठिकाणी राहिली आणि साधना करु लागली तर त्यांच्यामध्ये कलह निश्चित होणार. प्रत्येकाचे विचार निरनिराळे असतात. 'माझा असा अनुभव आहे, माझे बरोबर आहे, तुझे चुकीचे आहे,' हे चालल्याने साधना बाजूला राहाणार. बरं दोघेही मित्र राहिले एका ठिकाणी तर साधना चालेल की नाही? तर म्हणाले, नुसत्या गोष्टी बोलण्यामध्येच वेळ जाणार. साधना होणार नाही. तेव्हा काय आचरण करायचे, साधना करायचे ते एकट्यानेच केले पाहिजे. हा त्यांचा अभिप्राय आहे. अवधूत म्हणाले, मी कोणाशी संगत करीत नाही. कोणाला करायची असेल तर ती तुमची तुम्ही करा म्हणाले. माझी मी साधना करतो.

तेव्हां असे प्रत्येक गुरुचे विवरण म्हणजे फार मोठे आहे. हेयोपादेय विवेक ज्याला म्हणतात. नित्यानित्य विवेक, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक, तसा हेयोपादेय विवेक. फक्त आपल्या बुद्धिने विचार करुनच आपली बुद्धि तयार केलेली आहे. बुद्धि तयार झाली की संपलं. टाकायचे ते टाकून दिले सगळे. सगळ्या वासना दूर झाल्या की संपलं. रसासक्ति गेली, रुपासक्ति गेली, कोणचीही आसक्ति राहिलेली नाही. चिंता नाही. बालवृत्तीने तर काहीच आसक्ति नाही. स्वार्थ नाही हा! 'ज्ञानी माणसे स्वार्थी असतात, त्यांचे कुणाकडे लक्ष नसते.' असा आक्षेप घेतात लोक. 'ज्ञानेश्वर महाराज इतक्या लवकर कशाला समाधीत जाऊन बसले? आणखी काही दिवस त्यांनी काम करायला काही हरकत नव्हती,' पण तुम्ही कोण सांगणार ज्ञानेश्वर महाराजांना? तुम्हाला काय

सांगण्याचा अधिकार आहे? लवकर गेले पण त्यांनी जे कार्य करुन ठेवलेले आहे ते कुठे आम्हाला घेण्याची बुद्धि आहे. कितीतरी करुन ठेवलंय त्यांनी. 'एक तरी ओवी अनुभवावी' ज्ञानेश्वरीत ते ज्ञानदेव सांगताहेत. पण असे निष्कारण आक्षेप वगैरे घेण्याचीच आपली बुद्धि झालेली आहे. तो महाज्ञानी महात्मा, स्थिर बुद्धि झाली की त्याला पूर्ण आनंद मिळतो आहे.

भगवान श्रीहरी सांगतात,'उद्धवजी, यदुराजाला आणखी अवधूतांनी हा उपदेश केलेला आहे. आणखी त्यांनी जे श्रवण केले त्याचे मनन केलेले आहे.' आणखी त्यानी यदुराजाच्याही मनामध्ये असलेली सर्व अशांती दूर झाली म्हणाले दत्तात्रेयांच्या कृपेने, त्याकरता स्वतः आपणच विचार करायचा बाबा आणि ही विचार करण्याची पद्धती आहे. हे त्यांनी सांगितलेले आहे. पुष्कळ उपदेश भगवंतांचा आहे. प्रत्येकाबद्दल विचार करायचा म्हणजे कितीतरी आहे ते संपण्यासारखे नाही. त्यांनी कर्ममार्ग सांगितलेला आहे. शास्त्रीय कर्म सगळी अवश्य करावी असंही भगवंतानी सांगितलंय. शास्त्रानी सांगितल्याप्रमाणे आपले आपले कर्तव्य कर्म करीत राहून आपला उद्धार करुन घ्यावा. बुद्धि शुद्ध होती. भगवत्‌भक्ति करावी. तिच्याद्वारा ज्ञानयोग प्राप्त होतो.

'सगळे सोडून द्या. आणि मला शरण या' असेही सांगितले त्यांनी शेवटी. उद्धवजी म्हणाले, अहो, तुम्ही सांगता, 'अगोदर सगळं करा, पुन्हा सगळं सोडून द्या म्हणता?' 'हो' म्हणाले, अधिकाराप्रमाणे आहे. मनामधील जर आणखी दोष सगळे दूर झाले तर त्यालाच वाटायला लागतं, आपण हे कशाला करत बसायचं. तोच संन्यास घेतो म्हणाले. संन्यास घेतला गेला पाहिजे. आपोआप मनापुरता. वैराग्य उत्पन्न झालं आपल्या मनातून म्हणजे आपणच सगळे पाहून ठरविले पाहिजे. त्याग केव्हा



करायचा, त्यागाची बुद्धि आपली तयार झालेली आहे की नाही, हे आपलं आपण निरीक्षण करुन आणखी पहायचं म्हणाले. नाहीतर तोपर्यंत कर्मानुष्ठान आवश्यक आहे. कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तीयोग हे तिन्ही योग त्यांनी सांगितलेले आहेत. आणि त्या तिन्ही योगांचा अभ्यास करणारे अशाप्रकारचे हे आहेत. त्यांना आणखी पूर्ण मोक्षसिद्धि प्राप्त होते असे भगवंतांनी सांगितले. आणि याप्रमाणे भक्तियोग, ज्ञानयोग यांचा अभ्यास करता करता त्याला अनेक सिद्धि प्राप्त होतात. म्हणूनही भगवान म्हणाले पुष्कळ सिध्दींचे वर्णन त्यांनी केलेले आहे. कोणच्या कोणच्या संयमांनी, अभ्यासांनी कशी कशी सिद्धी प्राप्त होते. शरीर लहान होणं, शरीर हलके होणे, शरीर जड होणे, शरीर मोठे होणे, अणिमा, महिमा, लघिमा वगैरे अनेक प्रकारच्या सिद्धि त्यांनी सांगितलेल्या आहेत. सिद्धि म्हणजे मानसिक शक्तीचा विकास आहे. मनाचीच आणखी अशी तयारी झालेली आहे. इतकी मानसिक शक्ती वाढलेली आहे की एकदम याच्या संकल्पाने हा लहान होतो, मोठा होतो, दिसेनासा होतो. वाटेल ते करु शकतो. अग्नीचा त्रास नाही, जलाचा त्रास नाही, वाऱ्याचा त्रास नाही. अशा अनेक प्रकारच्या सिद्धि आहेत. परंतु त्या सिद्धिच्या मोहामध्ये सापडू नये असेही भगवंतांनी शेवटी सांगितले आहे.

माझी भक्ती करणाऱ्याला कोणचीही सिद्धि दुर्लभ नाही म्हणाले. पण माझ्याजवळ ज्याला यायचंय त्याचं कालहरण मात्र त्यामध्ये होते. काळ मात्र जातो. त्या सिद्धीच्या मोहामध्ये सापडलेला मनुष्य माझ्यापर्यंत येऊन पोहोचत नाही म्हणाले. त्याला विलंब लागतो. म्हणून मोठे मोठे श्रेष्ठ गुरु हे या सिद्धींचा त्याग करतात. विभूती पुष्कळ सांगितल्या. अर्जुनालाही विभूतीयोग सांगितला म्हणाले भगवत्‌गीतेमध्ये, त्याचप्रमाणे उद्धवजींनाही

विभूतीयोग सांगितलेला आहे. विशेष रुपानी ईश्वराचा अविर्भाव कोणच्या कोणच्या वस्तूंमध्ये आहे, त्याला विभूती असे म्हणायचे. ईश्वर तसा सर्वत्रच आहे. 'सत्‌चित्‌आनंदघन अस्ती,' अशी प्रचीति येते. म्हणजे सर्वरुपांनी तो आहेच, हा अनुभव त्याचा आहे. पण विशेष अगदी अनुभवाला येणारे भगवत्‌स्वरुप ज्याठिकाणी आहे त्याठिकाणी विभूती असे म्हटलेले आहे. ज्याठिकाणी विशेष तेज आहे, त्याग आहे, वैराग्य आहे, अत्यंत उदारवृत्ती आहे, तितिक्षा आहे, सहनशीलता आहे, धर्मप्रेम आहे ही सगळी ईश्वराचीच विभूति आहे असे सांगितलेले आहे.

आणि त्यानंतर भक्तीयोग, त्या भक्तीयोगाचंही पुष्कळ प्रतिपादन केलेलं आहे. ती भक्ती कशी उत्पन्न होईल, काय होईल, त्या भक्तीचे शेवटी फळ काय मिळतंय हे सगळंही उत्तम प्रकारांनी प्रतिपादन केलेलं आहे. कर्मयोग शेवटी सांगितलेला आहे. आणि या योगाचा अभ्यास करीत असताना, कोणचाही योग, कर्मयोग, ज्ञान असो, भक्ती असो, अष्टांगयोग असो या सर्वांच्या अभ्यासामध्ये अगोदर म्हणाले, मनाची तयारी झाली पाहिजे. म्हणजे सहनशील मन झाले पाहिजे, सगळे सहन केले पाहिजे म्हणाले. म्हणजे जो मार्ग आपण पत्करलेला आहे त्या मार्गामध्ये पूर्ण यश मिळते. याकरता एका भिक्षूची एक कथा त्यांनी सांगितली.

एक भिक्षू आरंभाला म्हणाले तो धनिक होता. पुष्कळ धन त्याने मिळविले. पण ते धन कोणालाही दिले नाही. स्वतःही भोग घेतला नाही आणि कोणाला दिलंही नाही. त्यामुळे सगळी अगदी त्याच्या परिवारातली मंडळीही खिन्न असायची. पैसा पुष्कळ आहे घरात पण त्याचा विनीयोग काही नाही. कोणालाही काही नाही. धर्मही करायचा नाही, भोगही घ्यायचा नाही. शेवटी



त्याच्यावरती आणखी कोप झाला सगळ्या एकंदर ग्रहादिकांचा म्हणा, त्याचे सगळे द्रव्य गेले. काही चोरांनी नेले. काही आप्तेष्टांनी. मित्रमंडळींनी नेले, कारण कोणाला द्यायचंच नाही त्यामुळे सगळे लोक रागावलेले होते. घर जळून गेलं, त्याच्यामध्ये पुष्कळ द्रव्य गेले. हे सगळे धन गेल्यानंतर त्याची बुद्धि बदलली. आजपर्यंत सर्वकाल माझा म्हणाला या धनाच्या साठवणीत गेला. फुकट गेलं आयुष्य, काही मला सुख मिळाले नाही. धन मिळवताना दुःख, धन मिळाल्यानंतर दुःख, ते संरक्षण करायचं, कितीतरी म्हणाले अनर्थ या धनापासून होत आहे. आता मात्र संन्यासदीक्षा धारण करुन आपण अगदी ईश्वराचं चिंतन करीत पृथ्वीवर फिरायचं, म्हणून त्याने संन्यास घेतला आणि मनाचा निग्रह केला. द्वंद्वातीत अवस्था, मुक्तावस्था प्राप्त करुन घेण्याला मनोनिग्रह मुख्य कारण आहे असे त्यांनी सांगितलेले आहे. संन्यास घेतल्यानंतर भिक्षा मागावी, गावाबाहेर जाऊन नदीतीरावर रहावे, फिरावे, भजन करावे असा त्याचा नित्यक्रम सुरु झाला. असाच एकदा तो एका गावात शिरला असता तेथील दुर्जन लोकांनी त्याला फार छळलं. त्याचा अवधूत वेष आणि वागणे पाहून त्यांनी त्याचा उपहास केला आणि अवहेलना केली. कोणी त्याला दगड मारले, कोणी त्याला चोर समजून घरात डांबून ठेवले. कोणी त्याला ढोंगी आणि मूर्ख ठरवले. तरी तो अगदी अविचल आणि निर्विकार होता. उलट त्याने स्वतःशीच जे चिंतन केले ते 'भिक्षुगीता' म्हणून प्रसिद्ध आहे.

तो म्हणाला,"माझ्या किंवा कोणाही जीवाच्या सुखदुःखाला इतर माणसे, देव, ग्रह, कर्म, काळ वगैरे कारणीभूत असतात असा आपला समज आहे. पण तो चुकीचा आहे. माणसाच्या सुखदुःखाला खरे कारणीभूत असते म्हणजे त्याचे मन! हे मनच

मायेच्या आहारी जाऊन विविध कर्मे करायला लावते. आणि मग कर्मानुसार जन्ममरणाच्या फेऱ्यात ढकलते. सर्व इंद्रिये मनाच्या ताब्यात आहेत पण मन मात्र इंद्रियांच्या ताब्यात नसते. मन हाच खरा शत्रू आहे. त्याला जिंकायचे सोडून आपण बाहेरच्या शत्रूमित्रांच्या मागे लागतो." असा विचार करुन त्या भिक्षूने आपल्या मानहानीकडे दुर्लक्ष केले व तो दुःखातून बाहेर पडला. त्याचे चित्त क्षणभर सुद्धा विचलीत होत नव्हते. म्हणून श्रीकृष्ण भगवान सांगतात की हे उद्धवा ही ब्रह्मज्ञान निष्ठा आहे. ज्ञानी व विवेकी माणसाने याप्रमाणे बोध करुन घ्यावा आणि सुखदुःखाने विचलीत होऊ नये. अशाप्रकारे मनाची तयारी झाल्यानंतर आणखी खरा भक्तीयोग प्राप्त होतो आणि त्यामुळे ईश्वर सान्निध्य मिळू शकते.

**।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।।**



# सुसंस्कारित बुद्धि

**उपासनेला दृढ चालवावे।**
**भूदेव संतासी सदा नमावे।।**

**ईश्वराची** आणखी सद्‌गुरुंची भक्ति ही जरुर आहे असे याच्यामध्ये दाखिवलेले आहे. ईश्वराची उपासना दृढ करावी, मानवानी. त्याच्या शक्तीच्या बाहेर पुष्कळ गोष्टी आहेत. मनाप्रमाणे सगळे काही होऊ शकत नाहीये. म्हणून योगशास्त्रकार सांगतात, ईश्वराची कृपा आवश्यक आहे. योगशास्त्र म्हणजे प्रयत्नवादी शास्त्र आहे. प्रयत्नांनी आणखी वाटेल त्या सिद्धि प्राप्त करुन घेता येतात. असा त्यांचा सिद्धान्त आहे. परंतु त्यांनीसुद्धा ईश्वराची उपासना पाहिजे म्हणून मान्य केलेले आहे. अनेक विघ्नं येतात, संकटे येतात. प्राणायामादिकाचा अभ्यास करण्यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येतात. शरीरामध्ये काही आकस्मिक व्याधी उत्पन्न होतात. मनातला उत्साहच नाहीसा होतो. निराशा, मानसिक निराशा उत्पन्न झाली म्हणजे काहीही काम होत नाही. कुठला योगाचा अभ्यास आणि काय करणार?

अर्जुनाने किती प्रयत्न केला होता. वनवासात असताना व्यास महर्षीनी सांगितल्यामुळे अस्त्रविद्या प्राप्त करुन घेण्याकरता! व्यासांची कृपा होती त्याच्यावर. शंकरांचं दर्शन झालं. त्यांची कृपा झाली. इंद्रलोकामध्ये गेला. तिथे पाच वर्षे राहून सर्वही

देवांच्यापासूनच ही सगळी अस्त्रविद्या प्राप्त करुन घेतली. भूतलावर आलेला आहे. अज्ञातवासामध्ये सगळे पांडव गेले परंतु त्यांनीसुद्धा ईश्वराची कृपा संपादन केलेली होती.

आधिदैविक विभाग म्हणून आपल्या शास्त्रकारांनी मानलेला आहे. केवळ आधिभौतिक विभागाने काम होत नाहीये. आधिदैविक म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या
देवता ज्या आहेत, त्या देवतांची कृपा धर्मराजाने संपादन केलेली होती, केवळ धर्माचरणाने! धर्मराजाला एकदा तहान लागली होती. पाणी आणण्याकरता भीमसेन गेला. मोठ्ठा तलाव होता त्यालाही तहान लागली, आपणही तलावातले पाणी प्यावं, धर्मराजालाही नेऊन द्यावं. पाणी पिण्याला जातो इतक्यात समोर एक मोठ्ठा कुणीतरी एक यक्ष बसलेला होता. त्यानी भीमाला सांगितले,'भीमा थांब,' म्हणाले, ' हा तलाव माझा आहे, माझी सत्ता आहे त्याच्यावर. माझ्या प्रश्नांची योग्य उत्तरं तू जर देशील, तर तुला पाणी प्यायला मिळेल.' तो तर भीमच होता. तो कशाला ऐकतोय त्याचं! पाण्यावर कसली सत्ता? तो पाणी प्यायला, प्राण गेला त्याचा. अर्जुन, नकुल, सहदेव सगळे आले. सगळ्यांची अशीच स्थिती झाली. काय झालं आपल्या बंधूंचं, म्हणून धर्मराज स्वतः पहाण्याकरता आले तिथे आणि तिकडे सगळे बंधू आणखी मृत होऊन पडलेले आहेत. आता वनवास संपून अज्ञातवासातून पुन्हा परत कसं जायचं, राज्य मिळवायचं, कोणाच्या बळावर मिळवायचं? अर्जुन गेला, भीम गेला. त्या यक्षाने त्यांना सांगितलं,'धर्मराजा, माझे यांनी ऐकले नाही, म्हणून यांचा प्राण गेलेला आहे. तू जर माझ्या प्रश्नांची उत्तरे देशील तर तुला हे पाणी प्यायला परवानगी मिळेल.'

ही एक मनाची स्थिती आहे. चारही बंधू मरून पडलेले



आहेत. वनामध्ये त्यांचे सहाय्य व्हायचे. पुढेही राज्य मिळवायला ज्यांचा उपयोग व्हायचा ते चौघेही एकदम गेलेले आहेत. परंतु मनाची मात्र अगदी सम स्थिती आहे. "असंमोहः" असं म्हणतात. गीतेच्या दहाव्या अध्यायामध्ये आरंभालाच भगवंतांनी सांगितलेले आहे.

**" बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।**
**सुखं दुःख भवो भावो भयं चाभयमेव च ।।**
**अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशो यशः ।**
**भवन्ति भावा भूतानां मत्त एक पृथग्विधाः ।। "**

हे जे गुण आहेत, हे माझ्यापासूनच मिळतात. मीच देतो म्हणाले "मत्त एव" घातलेले आहे. दुसऱ्या प्रयत्नांनी मिळू शकत नाही. असंमोह आहे. कसाही प्रसंग जरी आलेला असला तरी त्याप्रसंगी आपलं मन शांत ठेवणं! कधी मनाची चलबिचल न होणं, ही मनाची जी स्थिती आहे ती ईश्वराच्या कृपेने प्राप्त होते.

धर्मराजांनी सांगितले,"विचारा". इतकं दुःख झालेले असताना त्यांना प्रश्न विचारायचे, ते सुद्धा सामान्य प्रश्न नाहीयेत.'यक्षप्रश्न' म्हणून एक मोठं प्रकरणच आहे महाभारतात. उत्तम विचार करणारा, ज्ञानसंपन्न जो असेल त्यालाच, त्या प्रश्नांची उत्तरं देता येतील. पण तशाही स्थितीमध्ये सगळे दुःख विसरून जाऊन आणि समर्पक उत्तरं त्यांनी दिलेली आहेत. तो यक्ष म्हणजे यमधर्मच होते, परीक्षा पहाण्याकरता आलेले! समाधान झालं त्यांचं, त्यांनी सांगितलं, "धर्मराजा तू माझ्या प्रश्नांची उत्तरं खरोखर समाधानकारक दिलेली आहेस. मी प्रसन्न झालेलो आहे. या तुझ्या चार भावांपैकी कोणचा तरी एक भाऊ मी

जिवंत करीन. कोणाला जिवंत करु?" धर्मराज लगेच म्हणाले,"नकुलाला जिवंत करा." यक्ष म्हणाला,"अरे! लहान मुलगा हा, हा तुझ्या काय उपयोगी पडणार आहे? अर्जुन किंवा भीम कोणाला तरी जिवंत करायचं सोडून 'नकुलाला जिवंत करा,' असं तू का म्हणतोस?" धर्मराजांनी सांगितले, "यक्षराज मला दोन माता आहेत. एक कुंती आहे दुसरी एक माता मला होती, ती गेली, सती गेलेली आहे. सहगमन केलं तिनं. हा नकुल तिचा मुलगा आहे. तो जर जिवंत झाला तर माझ्या मातेला समाधान होईल. त्याकरता मी त्याला जिवंत करा म्हणतो." यक्षाने चारही भावांना जिवंत केले.

ही धर्मराजांची धर्मबुध्दि आहे. पुढे काय होईल, युद्ध करायचंय तो विचार नाहीये. आज कसं वागायचं? बुद्धिची समज किती आहे! दुःखाच्या वेळेला सुद्धा काही नाही आणि मग यमधर्म प्रसन्न झाले. त्यांनी वर प्रदान केला की "अज्ञात वासामध्ये तुम्हाला कोणीही ओळखणार नाही. तुम्ही प्रत्यक्ष तुमच्या मूळ रुपानी जरी वावरला एक वर्ष, तरी कोणी ओळखणार नाही." हा वरही त्यांनी घेतला होता. तरीसुद्धा वेगळ्या वेगळ्या स्वरुपामध्ये ते राहिले होते. विराट राजाच्या नगरामध्ये त्याचे नोकर म्हणून राहिले. अर्जुन तर बृहन्नडा म्हणून स्त्रीवेष घेऊन राहिलेला आहे. नपुंसक. हातात बांगड्या काय भरलेल्या आहेत, केस बांधलेले आहेत! आणि विराट राजाच्या ज्या मुलीबिली होत्या त्या सगळ्यांना सांगितले,"उत्तम गायन मला येतं म्हणाले, नृत्य कलेचा माझा अभ्यास झालेला आहे. मी शिकवायला आलेलो आहे." त्यावेळी त्याला अंतःपुरामध्ये ठेवलं होतं. एक वर्ष तिथे तो राहिला.

तर त्याने जी अस्त्रविद्या मिळविलेली होती त्याची परिक्षेची



वेळ आलेली आहे. एक वर्ष संपलं. कीचक, एकशे पाच कीचक मारले गेले अशी बातमी सगळीकडे पसरली. एका रात्रीमध्ये एकशेपाच कीचक, तो मुख्य कीचक त्याचे बंधू बाकीचे. ही सगळी बातमी सगळीकडे पसरलेली आहे. पांडव कुठे गेलेले आहेत? त्याच्या शोधाकरता कौरवांचे हेर
हिंडत होते. पांडव काही सापडले नाहीत. पण ही बातमी ज्यावेळेला दुर्योधनाच्या कानावर आली त्यावेळेला तो म्हणाला," इथे पांडव असले पाहिजेत. एवढा कीचक, त्याचे भाऊ त्यांना एका रात्रीत मारणारा म्हणजे भीमाशिवाय कोणी नाही. म्हणून पांडवांना ओळखायचं, शोधून काढायचं, आणि पुन्हा वनामध्ये पाठवून द्यायचे." कौरवांनी आपले बुद्धिचातुर्य खर्च केले होते. बारा वर्षं वनवास. ज्याचा पराजय होईल त्यांनी बारा वर्षं वनात आणि एक वर्ष अज्ञातवासात राहिले पाहिजे. बारा वर्षांच्या वनवासात ओळखलं तर आणखी अट होती ती अट इतकी भयंकर होती की एक वर्ष अज्ञातवासात असताना जर पांडवांचा शोध लागला, सापडले ते, ओळखले गेले तर पुन्हा बारा वर्षं वनवास! म्हणजे राज्य आपल्या ताब्यात ठेवण्याकरता ही योजना दुर्योधनाने केली होती. बुद्धि कशी वापरावी, हे समजायला हवे पण ज्याचे त्याचे संस्कार आहेत. अशाही स्थितीमध्ये पांडवांना यमधर्माचे आशीर्वाद मिळाले, दुर्गादेवीचे आशीर्वाद त्यांनी घेतलेले आहेत आणि त्यांचा अज्ञातवास पार पडला. पण हे दुर्योधनादिक वगैरे अजून आहे म्हणाले, त्यांचे अजून दिवस आहेत. संपलेली नाहीत तेरा वर्षं.

विराट राजाच्या नगरामध्ये, राज्यामध्ये पुष्कळ गाई होत्या. त्यावेळेला गाई हेच धन समजलं जात होतं. मोठ मोठ्या ऋषीमंडळींच्या आश्रमामध्येही पुष्कळ गाई असायच्या. त्यांचा

खर्च काही नाही. मोठे मोठे डोंगर म्हणा, किंवा जंगल, नद्या त्या ठिकाणी असलेले सगळही एकंदर गवत त्याठिकाणी असलेले खाण्याला परवानगी असायची. त्याच्यावर स्वामित्व नाही. श्रुतीकारांनी मुद्दाम दिलेले आहे. त्याच्यावर स्वामित्व कुणाचंही म्हणजे राजाचंही नाही. आता प्रत्येक जंगलातल्या प्रत्येक झाडावर नंबर पडलेला आहे. पुरतंच नाही राज्याला, कितीही जरी मिळालं तरी पुरतंच नाही. धन पुरत नाहिये. तशीच गोधनाची अवस्था झालेली आहे. कुठलं गोधन, कोण राखणार, संरक्षण कोण करणार, खर्च कसा भागवणार, त्यावेळेला त्यांच्याजवळ गाई असायच्या. गाईचं संरक्षण चाललेलं असायचं.

पुष्कळ गाई होत्या म्हणून विराट राजाच्या नगरात पांडव असावेत अशा समजुतीने आपल्या एका मित्र राजाला, 'सुशर्मा त्रीगर्त राजा' त्याला आणखी उत्तरेकडून हल्ला करायला सांगितला, आम्ही एक दोन दिवसांनी दक्षिणेकडून हल्ला करतो म्हणून सांगितले दुर्योधनानी. त्याप्रमाणे त्याचा हल्ला झाला. प्रथम त्यानी हल्ला केल्यामुळे विराट राजानीही सैन्याची जुळवाजुळव केलेली आहे. तो युद्धावर गेला तेव्हां धर्मराजानी सगळ्यांना सांगितले,"बाबांनो! संपली आता प्रगट व्हायला हरकत नाही.सहाय्य आपण केलं पाहिजे."तेव्हा भीम, नकुल आणखी सहदेव, धर्मराजाही गेले युद्धाला. सगळ्यांनी त्यांचा पराजय केला. त्या गाई परत आणलेल्या आहेत. ही लढाई तिकडे चाललेली असताना, दुसऱ्या बाजूनी या दुर्योधनादिक सगळ्या कौरवांनी हल्ला केला अन् त्या तिकडून सगळ्या गाई नेलेल्या आहेत. अजून त्या बाजूला लढाई चाललीये. एकदम दोन्हीकडून आणखी शत्रू आल्यानंतर अतिशय कठिण प्रसंग आलेला आहे. विराट राजाला तिकडे जय मिळाला पण इकडे या वेळेला ही बातमी आली. त्या



सगळ्या गोपालांनी येऊन सांगितले की आपल्या गाई चाललेल्या आहेत. कौरवांनी गाई नेल्या. सैन्य सगळे तिकडे गेलेले आहे. तो विराटाचा एक मुलगा होता, उत्तर नावाचा. तो म्हणाला काय,"मी अगदी सगळ्या कौरवांना जिंकून सगळ्या गाई परत आणायला तयार आहे. पण माझ्या रथावरती सारथी चांगला कुणी नाही, मला सारथी मिळाला तर मी येईन." ती द्रौपदी, तीच होती सैरंध्री. तिने सांगितले की 'त्या बृहन्नडेला घेऊन जा.' त्या विराट राजाच्या मुलीनी बृहन्नडेला सांगितले की 'तुला माझ्या भावाच्या रथावर जायला सांगितलंय. तू चांगला आहेस, तुला सारथ्य कर्म येतेय.' बृहन्नडा वेषात अर्जुन बाहेर सारथी म्हणून निघाला. आणखी त्या सैन्यासमोर आल्याबरोबर तो उत्तर घाबरला. खरा काही वीर नव्हता तो. नुसता आपलं,"मी मोठा आहे, मी जिंकून आणीन" असं म्हणून आपला अहंकार दाखविला. ते सबंध समुद्रासारखं पसरलेले कौरवांचं सैन्य आहे. भीष्माचार्य आहेत, द्रोणाचार्य आहेत, अश्वत्थामा, कृपाचार्य, कर्ण, दुर्योधन सगळेच मोठे मोठे वीर आहेत. तो घाबरून पळायला लागला. मग अर्जुनानी त्याला धरून आणलं. इथं बैस म्हणाला "मी लढाई करतो तू रथ हाक, तुझं संरक्षण मी करतो." मग तिथे स्मशानामध्ये झाडावर शस्त्र ठेवली होती पांडवांनी विराट नगरीत जाताना. त्याला झाडावर चढायला लावलं. त्यातून ते आपले गांडीव धनुष्य, ते अक्षय बाणाचे भाते, तलवार वगैरे सगळी शस्त्रं काढून घेतली उरलेली पुन्हा तिथे ठेवायला सांगितली. आणि अर्जुन आलेला आहे. त्या बांगड्या काढून ठेवल्या आता हातातल्या. किरीट नाही, काही नाही. डोक्याला आपलं एक वस्त्र बांधलेलं आहे. केस कसेतरी काढले. आणि तो धनुष्याचा टणत्कार करीत आलेला आहे.

भीष्म, द्रोण म्हणाले हा अर्जुन आलेला आहे. त्यांनी ओळखले त्याच्या धनुष्याला. दुर्योधनाला सांगितले 'सावध रहा. तू आजपर्यंत ज्याचं राज्य घेतलेले आहेस आता त्या अर्जुनाशी गाठ आहे. एकटा म्हणून चालणार नाही, याचं सामर्थ्य फार आहे. शंकरांची कृपा याच्यावर झालेली आहे.' आणि त्या युद्धामध्ये भीष्म, द्रोण एकेका बरोबर युद्ध केलं. सर्वांबरोबर युद्ध केलं सर्वांचा पराजय केला. कितीतरी अस्त्रविद्या त्याला मिळालेली होती. सर्व गाई सोडवून आणलेल्या आहेत. भीष्म, द्रोणांनी सांगितले दुर्योधनाला "जास्ती आता तू युद्ध वाढवू नकोस. नाहीतर सर्वांचा नाश होईल. चला परत जाऊया" म्हणून सगळे परत आले. अर्जुनाने एकट्याने सर्वही वीरांबरोबर युद्ध करुन त्या कौरवांचा त्यादिवशी पराजय केला. गाई सोडवून आणल्या. हा असा अर्जुन, इतका पराक्रमी असलेला, भारतीय युद्धाच्या वेळेला हातपाय गाळून बसलेला आहे. मानसिक वगैरे काही आणखी विकार उत्पन्न झाला, भिति उत्पन्न झाली काही तरी त्याला. 'आपल्याला पाप लागेल,' ही भिति उत्पन्न झाली. मी जर युद्धामध्ये भाग घेतला तर हे सगळे कौरव माझ्या हातून मारले जाणार. कशाला इतकी हिंसा करायची. 'अहिंसा परमोधर्म.' म्हणायला लागलेला आहे. 'नाही बाबा मी काही युद्ध करु शकणार नाही. धनुष्य मला हातात घेता येत नाही. काही नाही.' बसून राहिला म्हणतात. 'ते मला पसंतही नाहीये. क्षत्रियांचे कर्म किती भयंकर आहे. किती पाप आहे यात' असा तो आपला बुद्धिवाद मांडायला लागला.

शास्त्रांनी जे सांगितलेले आहे ते शास्त्रीय कर्म आहे- 'क्षत्रियांनी परस्परांबरोबर युद्ध करावं' क्षत्रियांचा धर्म इतका



कठोर आहे. सख्खा भाऊ जरी समोर युद्धाला उभा राहिला तर त्याच्याबरोबरही युद्ध करायचं, प्राण घ्यावा लागला तरी घ्यायचा. युद्धाच्या वेळेला हा आपला अन हा दुसऱ्याचा असा विचार करु नये हे शास्त्र सांगतंय. इथे हिंसा, अहिंसा वगैरे विचार नाहीये. यज्ञकर्माचाही विचार आचार्यमहाराजांनी करताना हेच सांगितले. क्षत्रियांचं कर्म इतकं, हिंसात्मक कठोर असतानासुद्धा,'ते तुझे कर्तव्य कर्म आहे, शास्त्राची आज्ञा आहे, ईश्वराची आज्ञा आहे, ते तुला केले पाहिजे,' म्हणून भगवान सांगताहेत. तर अशा दृष्टीने अर्जुनाची मनःस्थिती बिघडलेली आहे म्हणून त्याचं सामर्थ्य, पराक्रम सगळे आणखी विफल होण्याची पाळी आली आहे. जगामध्ये अर्जुनाची अपकीर्ती होणार असा प्रसंग आलेला आहे. म्हणून ईश्वराची कृपा त्याच्यावर झाली. भगवान गोपालकृष्ण म्हणजे ईश्वरच त्याला गुरु म्हणून मिळाले. त्यांनी त्याच्या बुद्धीत उत्पन्न झालेला मोह दूर केलेला आहे. अविवेक जो त्याला झालेला आहे, त्या अविवेकानी भ्रष्ट होण्याची पाळी आली, तो दूर करण्यासाठी म्हणून ईश्वराची उपासना किंवा महात्म्यांची संगती, त्यांचं मार्गदर्शन याची अतिशय जरुरी आहे म्हणून सांगतात.

एवढा मोठा अर्जुन सुद्धा शेवटी,'युद्धातून परत जायला पाहिजे, मला हे युद्ध पसंत नाही' असं म्हणू लागला. शास्त्राची आज्ञासुद्धा तो मोडू लागला.

## 'तस्मात् शास्त्रं प्रमाणं'

ते म्हणताहेत. हा मला शास्त्रही पसंत नाही म्हणतो. भिक्षा मागून मी राहाणे पसंत करीन. भिक्षा मागणं हा ब्राह्मणाचा धर्म आहे.

क्षत्रियांचा नाहीये. तो त्याला पसंत पडला आणि क्षत्रियाचा धर्म युद्ध करणं हा पसंत नाही. आपल्या बुद्धीनेच निर्णय घेऊ लागला तो. मोह उत्पन्न झाला. भगवंताच्या कृपेने आणखी तो सावरलेला आहे. काय ईश्वराचं कर्तृत्व आहे, शास्त्र सिद्धांत कसे आहेत, काय आहेत, ते सगळे त्याला समजावून सांगितलेले आहे.

"सत्कर्मयोगे वय घालवावे" म्हणून जे समर्थ सांगताहेत. संपूर्ण आयुष्यच्या आयुष्य म्हणजे एक जन्म नाही. जितकेही जन्म येतील त्या सर्वही जन्मामध्ये सत्कर्मे झाली पाहिजेत आपल्या हातून. धर्मराज जसे वागले त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न तरी झाला पाहिजे. आणि त्याच्यामध्ये जर कदाचित मनात काही आणखी विकार उत्पन्न होऊन,' हे नको आपल्याला,' असं वाटायला लागलं, तर ते वाटू नये, दोष जावेत बुद्धितले, मनातले, म्हणून ईश्वराची उपासना करायची. सुधारणा होण्याकरता, सत्कर्म हातून घडण्याकरता म्हणून ईश्वराची उपासना करायची. कर्म घडल्यानंतर ईश्वराची कृपा पुढे मिळेल. साधकावस्थेमध्ये सुद्धा साधना अभ्यास व्यवस्थित चालू रहावा याकरता ईश्वराची उपासना करायची. दोन्ही, ईश्वर आणखी सद्‌गुरु, या दोघांचीही सेवा, कृपा ही जरुर आहे हे आणखी समर्थांनी सांगितले. आणि त्यांच्या उपदेशाप्रमाणे सत्कर्म काहीतरी आपल्या हातून घडली पाहिजेत. संतानी केलेली कर्म किंवा चांगली कर्म जी आहेत, चांगली म्हणजे आपल्या बुद्धीने निर्णय करायचा नाही. आमच्या बुद्धीला काहीही चांगलं वाटलं तर? अर्जुनाला भिक्षा मागावी हेच चांगलं वाटलं, म्हणून ते सत्कर्म होणार नाही. उलट धर्मत्याग झाल्यामुळे तो अधर्म होईल म्हणून त्याला भगवंतांनी सांगितलेले आहे. 'तुला दया उत्पन्न झालेली नाही, तुला अहंकार उत्पन्न झालेला आहे. 'मी मोठा पराक्रमी आहे. मी युद्ध केले तर हे



सगळे माझ्या हातून मारले जातील म्हणून मला दया येते,' ही दया नाही म्हणाले. हा तुझा अहंकार आहे.'

तो त्याचा अहंकारच आहे. तर आपल्या बुद्धीने सत्कर्म, असत्कर्म ठरविता येत नाही आपल्याला, चांगलं कर्म कोणचं, वाईट कर्म कोणचं, हे कळायला बुद्धी शुद्ध झाली पाहिजे. बुद्धिवाद हा शास्त्रकारांनाही मान्य आहे. बुद्धिनेच सगळे मिळवायचं आहे ना! व्यवहारातसुद्धा सगळा अभ्युदय, सगळंही ऐहिक सुख वगैरे हे बुद्धिच्याच स्वाधीन आहे. परंतु ती बुद्धि संस्कृत पाहिजे. संस्कार त्या बुद्धिवर केला गेला पाहिजे. संस्कार शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी दिलेला आहे. बुद्धिमध्ये, मनामध्ये असणारे जे दोष आहेत ते दोष घालविले पाहिजेत. आणि चांगल्या गुणांचं त्या बुद्धिमध्ये, मनामध्ये संक्रमण करायचंय. हा संस्कार आणखी सत्कर्मांनी होतो आहे. संत ज्या मार्गांनी गेलेले आहेत त्या मार्गांनी जायचंय आपल्याला. तेव्हा त्या सत्कर्माच्या योगाने मनामध्ये असणारे दोष दूर होतात. आणखी चांगले चांगले गुण उत्पन्न होतात.

धर्मराज जरी वनवासामध्ये होते तरीसुद्धा त्यांनी धर्माचरण सोडले नाही. सगळ्या ऋषी मंडळींनी प्रेमाने, धर्मशील महात्मा आहे, अजातशत्रू आहे धर्मराज, या भावनेने त्याला भेटावं. त्याच्याशी चर्चा करावी, त्याच्याबरोबर रहावं, त्याच्या आश्रमात रहावं म्हणून त्याच्याजवळ यायला लागली होती सगळी अरण्यामध्ये गेल्यानंतर. आता काय यांनी असं सांगायचंय की, 'माझ्याजवळच काही नाहीये बाबा. माझंच राज्य गेलं आणि आता मी तुम्हाला कुठलं देऊ?'

'अतिथी देवो भव' म्हणून म्हणताहेत ना! अनुसूया मातेने ह्याच व्रताचे आचरण केले, दुसरं काही नाही. अतिथीलाच देव

मानले. मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव, अतिथीदेवो भव. कुठेही जावं लागत नाही. वनात जायला नको, घरदार सोडायला नको. काही नको. पण आपली बुद्धि मात्र अशी स्थिर झाली पाहिजे. देवता घरातच आहेत. ही भावना त्या अनुसूया मातेची असल्यामुळे ब्रम्हा, विष्णू, महेश्वर हे सगळ्या जगाचे नियंत्रण करणारे, उत्पत्ति करणारे, संरक्षण करणारे, संहार करणारे, सर्व जीवांचे नियामक म्हणून असणारे त्रिमूर्ति, त्या अनुसूयेची परिक्षा बघण्याकरता आले आणि शेवटी त्यांना तिची मुले व्हावे लागले. नियामक म्हणून असणाऱ्या ईश्वरालासुद्धा ज्या अनुसूया मातेने नियम्य केला. मी सांगेन तसे ऐकायला पाहिजे. मला देव मानलं पाहिजे. हे इतके सामर्थ्य तिने दाखविलेले आहे. जीवसुद्धा ईश्वराला आव्हान देऊ शकतो, जर धर्मशील असेल तर ईश्वरसुद्धा त्याची परिक्षा बघू शकतो. म्हणून धर्मराजांनी सूर्यनारायणांची प्रार्थना केली. त्यांनी एक थाळी दिली. पात्र दिले म्हणाले,'सूर्योदयानंतर याच्यातून वाटेल तितके अन्न तुम्हाला मिळेल.' ही काही स्वतःकरता व्यवस्था त्यांनी केलेली नाहीये. स्वतः काय अरण्यात रहात होते. अरण्यातली कंदमुळे, फळे खायचे. मृगया करायचे. शिकार करत. क्षत्रियच होते ते. पण या सगळ्या ऋषींची भोजनाची व्यवस्था व्हावी याकरता त्यांनी प्रार्थना केली. सूर्यनारायणांनी सांगितले की 'द्रौपदीचं जेवण होईपर्यंत याच्यातून अन्न मिळेल. द्रौपदीचे जेवण झाले की त्या दिवशी अन्न बंद होईल. दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर पुन्हा मिळेल.' आता द्रौपदीने जेवण केव्हा करायचं? करायचं की नाही? जर जेवण केले भूक लागली म्हणून तर? नक्त व्रत ती करीत होती असे नाहीये. नेहमीच नक्त आहे, बारा महिने, बारा वर्ष वनात असेपर्यंत कोणकोणच्या वेळेला ऋषी येतील याचा



नियम नाही. आपण जेवलं की अन्न बंद आणि त्या वेळेला ऋषी आले तर काय करायचं? दुर्वास ऋषींनी परिक्षा केलेली आहे की! पण श्रीकृष्णांची भक्ती तिच्याजवळ होती. हेही सामर्थ्य होते तेव्हा स्वतः अन्न खायचे नाही, अन्न द्यायचंय, अन्नदान करायचंय हे तिने व्रत पाळले. द्रौपदीचे जे सत्व तिने मिळवले होते ते गोपालकृष्णांची दृढ उपासना करून. अगदी अन्न खायचं नाही, अन्नदान करायचं, शेवटी रात्री अकरा-बारा वाजता काही थोडं खायचं आणि भांडे घासून ठेवायचं. म्हणजे द्रौपदीचेही सहाय्य झालेले आहे धर्मराजाला. गृहस्थाश्रमामध्ये तो पुरुष जो आहे तो गृहस्थ. दंपत्ती आहेत दोघेही, त्या दोघांचाही अधिकार सारखा आहे, साम्य पाहिजे ना स्त्रीयांना, समानता शास्त्रकारांनी धर्माचरणामध्ये दिलेली आहे. स्त्रीला विचारल्यावाचून वाटेल तसा दानधर्म करायचा नाही. पुरुषास विचारल्यावाचून स्त्रीनेही दानधर्म करायचा नाही. दोघांनी एकमतांनी काय करायचं ते धर्माचरण करायचं. धर्माचरणामध्ये दोघांचा समान अधिकार आहे, शास्त्रकारांना मान्य आहे. समान अधिकाराचा उपयोग कसा करायचा? हा एक विचार आहे. तर अशा रितीने सत्कर्म करण्यामध्ये धर्मराजाचा सगळा काळ गेलेला आहे. त्याला राज्याची काही इच्छा नव्हती असं नाही. तरी त्यांनी राज्याकरता युद्ध जाहीर केलं, त्याला मिळालं सहाय्य. युद्धही झालेलं आहे. राज्य मिळालं. परंतु धर्माविरूद्ध काही करायचं नाही. युद्ध सुरू होण्याची वेळ आली. अर्जुनाचा मोह गेला, अर्जुन तयार झाला, रथामध्ये बसला, ते एक एक संकट टळले देवाच्या कृपेने. सेनापतीने आज्ञा केल्याबरोबर युद्धाला सुरवात होणार इतक्यात धर्मराजानी आपल्या अंगावरचं ते चिलखत वगैरे सगळं काढून ठेवलं. धनुष्य बाण वगैरे सगळे काढून ठेवलं. हात जोडून

आणखी भीष्माचार्यांच्या रथाकडे निघाला.हे सगळे कौरव म्हणाले हा धर्मराज भ्यालेला आहे. शरण येतो आहे भीष्माचार्यांना. आले भीष्माचार्यांच्याजवळ, ' पितामह, युद्धाला आरंभ करायचा आहे. आपले आशीर्वाद घेण्याकरता मी आलेलो आहे. '

'तू आला नसतास तर काय झालं असतं' म्हणाले. 'कर्तव्याची जाणीव तुला आहे' द्रोणाचार्यांच्याकडे गेले, कृपाचार्य वगैरे सर्वांना वंदन करून आलेले आहेत. नंतर युद्धाला सुरवात झाली. भ्याले नाहीत. आपल्याकडे सामर्थ्य आहे, अर्जुन आहे आणि साक्षात योगेश्वर कृष्ण आहेत. तरीसुद्धा अहंकार नाही. कर्तव्य करायचंय. भीष्म, द्रोण जरी शत्रूपक्षाला असले तरी ते गुरू आहेत ही भावना मनामध्ये धरून, धारण करून त्यांनी ते आपलं कर्तव्यकर्म केलेले आहे. त्यामुळे त्यांना विजय मिळाला. अर्जुनाच्या पराक्रमामुळे विजय मिळाला असे नाहीये. कृष्णाचे ऐकले म्हणून अर्जुनाला विजय मिळालेला आहे. आपलीच बुद्धि, आपलाच आग्रह चालवला तर काही फरक पडला नसता. सबंध गीतेचा उपदेश केला आणि शेवटी त्यांनी सांगितले हे जे आतापर्यंत मी सगळा तुला उपदेश केला आहे त्याचा चांगला विचार कर. तुझी बुद्धि या ठिकाणी चालेल इतकी मी सांगितलेले आहे आणि मग तुझ्या बुद्धिला वाटेल त्याप्रमाणे कर. ईश्वररूप दाखवून त्यांनी सांगितले. मी महाकाल आहे. माझा संकल्प झालेला आहे. तुझ्या विचारांचा इथे काहीही याच्यामध्ये उपयोग नाही. सृष्टीचे कार्य मला चालवायचंय. ती शक्ती तुझ्याजवळ नाहीये. असेल पराक्रम अस्त्रविद्या. अर्जुन जरी गेला तरी हे सगळे लोक यांना आणखी मृत्यू येणार आहे, ही माझी इच्छा. माझा संकल्प झालेला आहे, हे त्याला दाखवलं. त्यावेळेला त्याचा अहंकार कमी झालेला आहे. देवाची आज्ञा आपण



मानली पाहिजे. ईश्वराची आज्ञा पालन करणे हा खरा धर्म आहे, हे शास्त्र म्हणजे ईश्वराची आज्ञाच आहे. म्हणून सर्वही साधूसंत, महात्मे हे सत्कर्म जे आहे, स्वधर्माचरण जे आहे इकडे लक्ष आहे त्यांचं.

सर्वांच्या मनामध्ये परस्परांविषयी प्रेम उत्पन्न व्हावं. अशी ज्ञानेश्वर महाराजांची प्रार्थना आहे. ' भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे ' राष्ट्राला उपयोगी नाही का हा गुण? सर्वांची मैत्री, जीवाभावाची मैत्री असावी म्हणजे सगळे जर परस्परांबद्दल प्रेम करणारे झाले, ऐक्य जर झाले तर जगातले कोणते राष्ट्र आपल्याकडे वाकड्या नजरेने पाहू शकेल? पहाणं तरी शक्य आहे का? सर्वांच्या मनामध्ये एकमेकांविषयी आणखी प्रेमभावना ही निर्माण व्हावी. ऐक्य निर्माण व्हावे हे कायद्यानीही करता येत नाहीये. राष्ट्रपतींचा जरी वटहुकूम असला तरी सगळ्यांनाच ऐक्य, निर्माण व्हावे हे कायद्यानीही करता येत नाहीये. राष्ट्रपतींचा जरी वटहुकूम असला तरी सगळ्यांनाच ऐक्य होतच नाही, शक्यच नाही. बुद्धि आमची स्वार्थाकडेच जाते ना! त्यामुळे स्वार्थाला जे अनुकूल असेल तेवढ्या पुरतं प्रेम दुसऱ्यावर करायचं. राष्ट्रपतींचा हुकूम असला म्हणून कुणी काही प्रेम करणार नाही. प्रेमभावना ही ईश्वराची कृपा आहे म्हणून ईश्वराजवळ ज्ञानेश्वर महाराज पसायदान मागताहेत. दुसऱ्याजवळ कुणाकडे नाही. राजसत्ता नको, काही नको. कुणी करू शकणारच नाही. आणि सगळा दुरितक्षय झाला पाहिजे. अनेक दुरितं असतात. काया वाचा मनाने आपल्या हातून कितीतरी आणखी दोष घडताहेत सारखे. अनेक जन्मांचे दोष तर साठलेले आहेत. पुन्हा या जन्माला येऊन काही विचार करून त्याच्यातून बाजूला होणं, ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता काहीतरी आयुष्यातला

आणखी भाग खर्च करणं हे आपण काही करत नाही. तेच संस्कार पूर्वीचे. त्याप्रमाणे सगळे आणखी अर्थकामाकरता सर्वही प्रयत्न आमचे अहोरात्र चाललेले आहेत. धर्माकडे लक्ष नाही. मोक्ष तर काही लक्षात, विचारातच आपण घेत नाही. इच्छा नाही. मोक्ष शब्दाचा अर्थ शास्त्रकारांनी केला आहे. सर्वही दुःखं कायमची संपणं, याला मोक्ष म्हटलेलं आहे. दुःखं कायमची संपणं, पुन्हा दुःखाचा संबंध नाही, हे कोणाला नको आहे? सगळी दुःखं कायमची संपणार आहेत अशी एक अवस्था प्राप्त करून घेता येते किंवा असे एक फल आहे हे सगळ्यांनाही दिसतं पण ते प्राप्त करून घेणं किती कठिण आहे. शरीरसंबंध आल्याबरोबर सुख, दुःखाला सुरवात होतीये. मृत्यूनी शरीरसंबंध कायमचा सुटत नाही. हे शरीर संपलं. पुन्हा दुसरं शरीर, ते सुद्धा मानवाचंच येईल याचा काही नेम नाही. कोणच्यातरी पशूच्या जन्माला गेल्यानंतर तिथे तर विचार बिलकुल नाहीयेत. काही विचार नाही. विचार करण्याची शक्ती फक्त मानव जन्मामध्ये आहे. कारण तेवढी बुद्धी फक्त ईश्वरानी मानवाला दिलेली आहे. त्या जन्मामध्ये जर चांगल्या महात्म्यांची संगती झाली, मार्गदर्शनाचा लाभ झाला तर आणखी ती बुद्धी चांगल्या मार्गानी जाते, सत्कर्मे घडतील. आणि ती घडण्याकरता ईश्वराची उपासनाही तो करू लागेल. ईश्वराच्या कृपेने पापक्षय त्याचा होईल आणि त्याचं फळ ज्ञानेश्वर महाराजांनी दाखिवलय. 'दुरितांचे तिमिर जावो, विश्वस्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांछिल तो ते लाहो, प्राणीजात.' म्हणताहेत. त्यांना माहिती आहे. शास्त्रांनी जे फळ सांगितलेले 'आहे स्वधर्माचरणाचं, सत्कर्माचरणाचं. इच्छा जी होईल ते सगळं इच्छेप्रमाणे मिळतं म्हणतात. तसं आपल्या हातून आचरण घडावं म्हणाले. हे त्याचं फळ सांगताहेत. ज्ञानेश्वर



महाराज, मागताहेत देवाजवळ मागणी याची करतात. तर अशी सत्कर्मं झाली पाहिजेत हा कर्मयोग आहे. पहिल्या प्रथम कर्मयोग हा मुख्य म्हणून भगवंतानी अर्जुनाला सांगितलेला आहे. ज्ञानयोग आहे, उपासना योग आहे. कर्मयोगाच्या बरोबरच उपासना, उपासना-योगही असावा असाही सिद्धांत आहे. केवल कर्म हे सिद्ध रहात नाही. पुष्कळ कितीतरी पठण करताना काही, स्खलन होतंय, क्षय होतो, रोग होतो, हे जे होतं ते सगळे कुठून ज्ञान आपल्याला असते म्हणून शेवटी आपण प्रार्थना करून, स्मरण करून, ईश्वराला हे कर्म निवेदन करायचंय. 'तुमचं तुम्ही शुद्ध करून घ्या, काय चांगलं असेल ते घ्या' अशी प्रार्थना करावी म्हणाले. म्हणजे कर्माच्या बरोबर भक्ति, उपासनाही जरूरी आहे. ईश्वराच्या भक्तिशिवाय कर्मंही व्यवस्थित होत नाहीत, पूर्ण होत नाहीत. म्हणून कर्म आणखी भक्ति यांचा समुच्चय सांगितलेला आहे शास्त्रकारांनी. भक्ति सहीत कर्म पाहिजे. केवळ कर्म म्हणजे भक्ति नाही असे काही लोक समजताहेत. नुसतं कर्म काय करायचं? भक्ति केली म्हणजे झालं. पण नुसती भक्ति होऊ शकत नाही. केवळ भक्ति म्हणजे फार अवघड आहे. कर्मयोग सुद्धा भक्ति आहे. देवाची जी आज्ञा आहे शास्त्राची. ब्राम्हणांनी कसं वागावं, क्षत्रियांनी कसं वागावं, त्याचं कर्तव्य कर्म कोणचं हे सगळं वेदशास्त्र रुपांनी ईश्वरानी सगळे सांगून ठेवलेले आहे. सृष्टीच्या आरंभीच हे सगळंही व्यवस्थित सांगून ठेवलेले आहे. तर ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे आपण जर वागलो, ती कर्मं केली, धर्माचरण केले, म्हणजे ते कर्माचरण सुद्धा धर्माचरण होतं, कर्मयोग तो सुद्धा भक्ति आहे. त्याला दास्ययोग म्हणतात. दास्यभक्ति मध्ये त्याचा अंतर्भाव करतात. नवविधा भक्तिमध्ये दास्यभक्ति आहे. जो दास असेल, सेवक असेल

त्यानी आणखी स्वामीची आज्ञापालन करायला पाहिजे. हेच त्याचं कर्तव्य आहे, हीच त्याची भक्ति आहे. तर हे कर्माचरण जे सांगितले आहे, ब्राह्मणादिक सगळ्या वर्णांना, आश्रमांना, ते त्या त्या वर्णाचं, आश्रमाचं अनुष्ठान करणं ही सुद्धा ईश्वराची भक्ति आहे. दास्यभक्ति मध्ये त्याचा अंतर्भाव होतो. ईश्वराच्या आज्ञेचे पालन केल्याचे फळ आपल्याला मिळत आहे, तर अशा रितीने कर्मयोग हा स्वतः भक्तियोगही आहे. या रुपानी ईश्वराची आज्ञा म्हणून मी कर्म करतोय, ही बुद्धि ठेऊन, जर कर्म केली तर त्याला काही नाही. दोष नाही. बंधन नाही. उलट मागे झालेल्या सगळ्या कर्मांचा नाश होऊन जातो. 'मी कर्ता आहे, मी कर्म करणारा आहे, मी इतका दानधर्म केला, अमुक केला, तमुक केला' अशी जी अहंकार बुद्धि असेल, कर्तुत्व, अभिमान असेल आणि याच्यापासून मला फळ मिळालं पाहिजे ही फलाची इच्छा असेल तर हाच कर्माचा बंध आहे म्हणतात. ज्ञानेश्वर महाराज! 'मी कर्ता आहे, हे मी कर्म केलेले आहे.' ही वृत्ति गेली पाहिजे.

असुर आणि भक्त यांच्यामध्ये अंतर हेच आहे. हिरण्यकश्यपूनीही तपश्चर्या केली. देव मानला त्याने. त्याला देव मान्य होता. कितीतरी अवघड तपश्चर्या केली. अन्न नाही, पाणी नाही. उभा राहिलेला आहे. शरीरातलं सगळं रक्त मांस सगळं नाहीसं झालं. ब्रह्मदेव आले वर द्यायला, त्यांना सुद्धा आश्चर्य वाटले. 'काय बाबा केवढं तप केलेस तू ऋषींना सुद्धा करता येणार नाही,' आणि त्यानी मागितल्याप्रमाणे वर दिला. वर दिल्यानंतर याची बुद्धि बदललेली आहे. अगोदरच तशी असली पाहिजे. ईश्वरानी आम्हाला काय उगीच वर दिला काय? आम्ही तपश्चर्या केली म्हणून वर दिला. म्हणजे आमचे कर्तुत्व,



आमची बुद्धि मोठी आहे. आम्ही तपश्चर्या करतो, आम्ही कष्ट सहन केले म्हणून आम्हाला फल मिळाले. ईश्वर पुन्हा बाजूला राहिला, कृतज्ञता संपली. पण प्रल्हादजींची तशी बुद्धि नाहीये. ते म्हणतात, 'मी भक्ति करतंच नाही, भजन करतंच नाही.' गुरूजींनी त्याला विचारले,'अरे काय हे करतोस? तुझ्या बापाला पसंत नाहीये. तू काय हरीचे भजन करतोस?' त्यांनी सांगितले,'गुरूजी मी भजन करत नाही. ईश्वराचे नाव हृषिकेश आहे. हृषिक म्हणजे इंद्रिय. त्या सगळ्या इंद्रियांचा नियामक तो आहे.' इंद्रियं आमची आहेत ही नुसती समजूत आहे. डोळे आमचे झाल्यानंतर त्यावेळेला आमचा अधिकार कुठे गेला? आमची जर सत्ता त्याच्यावर आहे तर त्यांचा दोष दूर करता आला पाहिजे.

प्रल्हादजींची बुद्धि अशी आहे. प्रथमपासूनच साधना अभ्यास सुद्धा,'मी करत नाही ईश्वर करून घेतो,' ही प्रथमपासूनच ज्यांची बुद्धि आहे, अहंकार बिलकुल नाही, ते भक्त ठरलेले आहेत. आणि शेकडो वर्षे तपश्चर्या केली, अन्नपाणी नाही, काही नाही शेवटी ईश्वरालाच आम्ही बाजूला ठेवलं. 'मी तपश्चर्या केली म्हणून ईश्वरानी मला वर दिला. तपश्चर्या न करताना कसा दिला असता म्हणजे माझाच मोठेपणा आहे,' हे म्हणणारे असुर ठरलेले आहेत. म्हणून सत्कर्म जे आहे ते कसं व्हावं, चांगलेपणा त्याला येण्याकरता हे सगळे त्यांनी समजावून सांगितलेले आहे.

आणखीन सुद्धा ईश्वराची एक भक्ति आहे. शेवटी त्यांनी "सर्वांमुखी मंगल बोलवावे" हे एक मुद्दाम सांगितलेले आहे. ईश्वर भक्ति, कर्मात्मक भक्ति किंवा कर्मयोग म्हणा ईश्वराची आज्ञा म्हणून स्वतः तर करावं, पण सर्व जे इतर लोक आहेत त्या सर्वांच्या कडूनही आणखी ईश्वराचं हे मंगल नाम, मंगल

चरित्र वगैरे सांगावं. त्यांच्याकडूनही हे करवून घ्यावं. हा ही एक मोठा त्यांनी आदेश दिलेला आहे. वैयक्तिक साधनाभ्यास तर आहेच आहे, पण तो वैयक्तिक साधनाभ्यास करताना जर आपल्या मनामध्ये काहीही अभिमान राहिलेला नसेल, फलाचीही इच्छा नसेल, 'त्याची इच्छा नाही. त्याला इच्छेला येईल त्यावेळेला तो फल देईल.' अशी बुद्धि झाली असेल तर ती भक्ति मोठी आहे. सिद्धिबुद्धिपती म्हणतात ना त्याला ईश्वराला. कोणचेही प्रयत्न करण्याच्या वेळेला लागणारी जी बुद्धि ती बुद्धि देणाराही तो आहे आणि त्या बुद्धीने कर्म, प्रयत्न व्यवस्थित झाल्यानंतर त्याचं फल देणाराही तो आहे. फल सिद्धिही त्याच्या आधीन आहे. ऋद्धिही त्याच्या आधीन आहे. ही भावना जर मनामध्ये आलेली असेल तर त्यानी लोकसंग्रह करण्याकरता हरकत नाही. त्यांना उद्देशून आहे. स्वतःची मानसिक शुद्धि नाही, आणि लोकांच्याकरता प्रयत्न करायला लागल्यानंतर स्वतःचाही उद्धार नाही आणि लोकांचाही उद्धार नाही,पुन्हा काही गोंधळ होतातच शरीरात. हे मुद्दाम त्यांनी सांगितलेले आहे. म्हणजे ईश्वराची उपासना महात्मे जे आहेत सद्‌गुरूस्वरुप, ईश्वरस्वरुप त्यांची उपासना, त्यांची संगती आणि त्यांच्यापासून मार्गदर्शन घेऊन स्वतःचे आचरण शुद्ध करणं हे मुद्दाम सांगितलं आहे. ही सत्कर्म म्हणजे स्वतः आचरण केले पाहिजे. आणि मग लोकांना "सर्वामुखी मंगल बोलवावे" हा उपदेश नंतर करायचा.

व्यावहारिक दृष्टीने संतांचे सगळ्यांकडे लक्ष आहे. केवळ व्यक्तीला उपदेश केला, तुम्ही नुसतं ईश्वराचं भजन करा, हे करा. व्यावहारिक काही प्रयत्न करू नका. संपवा. सगळे राष्ट्र आणखी या संतांनी निष्क्रिय करून टाकलं असं अगदी मोठे मोठे कर्तुत्व असलेले, प्रसिद्ध असलेले बुद्धिवादी लोक सांगतात



आणि लिहून ठेवलेले आहे म्हणतात. पण संतांनी प्रयत्नच करायला सांगितलाय. तो प्रयत्न, तुम्हाला व्यावहारिक प्रयत्न करायचा असेल, तरीसुद्धा ईश्वराची जरुरी आहे. व्यवहारात तुम्ही अर्थ, कामाकरता करा ते. पारमार्थिक प्रयत्न हा तर कितीतरी मोठा प्रयत्न आहे. अनेक जन्म करावा लागतो अभ्यास. जीवित कालापर्यंत अखंड अभ्यास करावा लागतो. श्रद्धा, भक्तीने करावा लागतो. हा प्रयत्नच आहे. संतांनी,'स्वस्थ रहा, कर्म सोडून द्या' असं कधीही सांगितलं नाही. शास्त्राचा एकंदर सिद्धांत त्यांना माहिती आहे. परंतु भगवंतांचं अधिष्ठान पाहिजे म्हणतात. तुम्ही काहीही करा, परमार्थ तुम्हाला आवडत नाही. तुम्हाला तसे संस्कार नाहीत, राहू देत, पण कोणाचेही व्यावहारिक कर्म किंवा कोणाचीही उन्नती तुम्हाला करून घेण्याची इच्छा असेल तर भगवंताचं अधिष्ठान घेऊन चला.

भगवान सांगताहेत,' माझं स्मरण करून तू युद्ध करायला लाग, तुला काहीही दोष लागणार नाही,' स्वतःच्या अभिमानानी युद्ध करू नकोस, एवढं त्यांना सांगायचं तर ईश्वराची भक्ती ही भारत वर्षामध्ये वाढावी ही आणखी संतांची इच्छा आहे आणि हा खरा बुद्धिवाद आहे. संपूर्ण पसायदान म्हणजे बुद्धिकरताच सांगितलेले आहे. दाखवलेले आहे, ज्ञानेश्वर महाराजांनी. भौतिक विकास राष्ट्राचा होत राहील. आणखी काही धरणं झाली, अमुक झालं, वीज आली हे सगळं झालं. विज्ञानवाद मोठा झालेला आहे. वाढत चाललेला आहे. चंद्रावरती लोक जाऊन आलेले आहेत. हे झाले हे आपण ऐकतो. पण त्या अणुबॉंब शोधून काढणाऱ्या वैज्ञानिकांना अजून काही समाधान नाही. एक लाख वस्तीचे शहर पाच मिनिटामध्ये उध्वस्त झाले. दहा लाख वस्तीचे शहर एका मिनिटामध्ये कसं उध्वस्त करता

येईल, असा शोध चाललेला आहे अजून चालू आहे. बुद्धिमध्ये उत्पन्न होणारे जे काही अहंकारादिक दोष आहेत, ते दोष कमी झाल्याशिवाय शांती उत्पन्न होत नाही. तर लोकांचा संहार करण्याकरता विज्ञानवादाचा जर उपयोग होणार असेल तर ते विज्ञान काय करायचंय? त्याचा उपयोग काय? आयुष्यात शांती मिळाली पाहिजे.

दारिद्र्य जरी असले तरी सुद्धा शांती प्राप्त करुन घेता येते. तुकाराम महाराजांच्या घरी काय होतं? काही नव्हतं. शिवाजी महाराजांनी आणून दिलेले परत करुन टाकले. नको म्हणाले. हे विष आहे. बुद्धि केव्हा बदलेल याचा काहीही नेम नाहीये. जास्ती अनुकूलता संसारात असावी किंवा जास्ती प्रतिकूलता असावी हाही मोठा विचार आहे. खरे जे आणखी महात्मे असतील, केवळ ईश्वराची भक्ति करणारे त्यांना काही अनुकूलता नको. 'काही जरूर नाही', म्हणून त्यांनी सांगितले. ते ईश्वराचे स्मरण करुन राहिलेले आहेत. म्हणून कर्तव्य कर्म जे शास्त्रकारांनी सांगितलेले आहे. व्यवहाराचाही संबंध पुष्कळ आहे. इतिहास, पुराणादिकांचा अभ्यास त्यांनी सांगितलेला आहे. गृहस्थाश्रमातली कर्तव्य कर्मं करावी, आपल्या पोष्य वर्गाचे पोषण करण्याकरता उद्योग करावा हेही त्यांनी दिलेले आहे. परंतु काही काळ तरी ही सगळी कर्मं त्या त्या वेळेला करावीत, त्या योगाने आपला दुरितक्षय होतो आहे. दुरितक्षय झाल्यानंतर आपल्या बुध्दीचा विकास होतो आहे आणि तो बुद्धीचा विकास म्हणजे धर्मराजाच्या त्या चरित्राप्रमाणे स्वतःच्या वैयक्तिक सुखाकडे किंवा अनुकूलतेकडे लक्ष नाहीये. केवळ धर्माचरण करायचं, ही बुद्धि! अशाप्रकारची बुद्धि तयार करण्याकरता मानव धर्म आहे. दुसऱ्या योनीत जन्म आला तर बुद्धिवरती परिणाम करण्याचा



प्रयत्नच होणं शक्य नाही. अज्ञान आहे नुसते. अज्ञान. बाकी काहीही नाही. मानव जन्मामध्ये हे अज्ञान दूर करणे, विकार मनामध्ये असलेले दूर करणे, विचार, सद्विचार मनामध्ये उत्पन्न होणे आणि त्या प्रमाणे वागण्याचे धैर्य असणे आणि तसे वागणे, हे सगळे मानव जन्मामध्ये करता येते म्हणून ईश्वराची भक्ति हा एक मोठा मार्ग संतांनी दाखिवलेला आहे.

कलियुगामध्ये तर भक्तीयोगालाच प्राधान्य सांगितलेले आहे. व्यास महर्षींनी. नामस्मरण आहे, नामस्मरणाने सगळ्या आणखी पापांचा क्षय होतो. असे अनेक मार्ग संतांनी दाखविलेले आहेत. तर ती भक्ति, ईश्वरप्रेम आपल्या अंतःकरणामध्ये निर्माण झाले पाहिजे. आणि कर्तव्य कर्मं सगळी शास्त्राने सांगितली आहेत. शास्त्र प्रत्येकजण काही वाचू शकत नाही म्हणून तर या मोठ्या संतांच्या संगतीची जरुरी आहे. त्यांच्याजवळ राहिले म्हणजे आपोआपच कर्तव्य कर्मं सगळी समजून येतात आपल्याला.

स्वभाव उत्तम पाहिजे. कुणाही जीवाचा मत्सर वाटणार नाही असं माझं मन आहे. मला शत्रू नाही. मला मित्र नाही. काही नाही. जे जे होतय ते ते मी पहातोय. सहन करतोय. तपस्या आहे साक्षी रुपाने. तेव्हां हेच माझ्या जवळ आहे. तंत्र नाही, मंत्र नाही, काही नाही म्हणाले. या संसारामध्ये आपण जी बुद्धि घेऊन आलेलो आहोत. जीवदशा त्या बुद्धिमध्ये आहे. मनाचा संबंध तुटणे म्हणजे जीवभाव नाहीसा होणे. जोपर्यंत मनाचा संबंध आहे, बुद्धिचा संबंध आहे तोपर्यंत चांगले वाईट अनेक विचार त्या बुद्धिमध्ये आहेत. संस्कार चांगलेही आहेत, वाईटही आहेत. संगती जशी घडेल त्याप्रमाणे कर्मं घडतात आणि तसे संस्कार त्या बुद्धिमध्ये होऊन चांगली बुद्धि वाईट होती. वाईट बुद्धि चांगली होती.

वाल्याकोळी मारणारा सगळ्यांना पण एकदा त्याची आणि नारदाची भेट झाली. त्याला रामनाम सरळसुद्धा घेता येईना. नारदांनी सांगितलेले त्याच्या मनाला पटलेले आहे. नारद म्हणाले, 'बाबा तू घरी जाऊन विचारून ये. इतके लोक मारलेले आहेस या तुझ्या पापापैकी तुझी बायको म्हणा मुलं म्हणा, काही घ्यायला तयार आहेत का? एवढं विचारून ये.' तो गेला. त्याच्या बायको मुलांनी सांगितलं,'पाप बिप आम्हाला माहीत नाही. तुम्ही पैसा मिळवून आणता तेवढा आम्ही घेतो. पाप, पुण्य तुमचं तुम्ही बघा.' तेव्हां त्याच्या मनावर परिणाम झाला. नारदांची कृपा झाली. बीड जवळ एक नावलगाव जे आहे गणेशांचं. तिथेही असेच एक खुनी होते म्हणतात. नामाकोळी आणि मुद्‌गल ऋषींची भेट झाली. त्यांनी गणेश मंत्राचा उपदेश केला. आणि त्या उपदेशाप्रमाणे अखंड आणखी उपासना गणेशांची झाल्यामुळे त्यांना सोंड उत्पन्न झाली. गणेशाप्रमाणे रुप त्यांना उत्पन्न झालं. 'भृशुंडी ' त्यांना म्हणतात.

तर हे जे आहे बुद्धीचं परिवर्तन होणं, बुद्धि शांत होणं, समाधान बुद्धिमध्ये होणं हे महत्वाचं आहे. तत्कालिक समाधान असणं चांगलं किंवा पूर्ण समाधान असणं चांगलं हा विचार करता आला पाहिजे. इह लोकातली सुखं किंवा स्वर्गादिक सुखं ही मागितली तरी मिळतील म्हणाले. जगदंबेच्या कृपेने हे ही मिळेल. पण ते तात्कालिक समाधान झालं. महिषासूर गेला नि पुन्हा शुंभनिशुंभ आलेच की! म्हणजे समाधान कायमचं मिळत नाही. त्यापेक्षा विचार करून जर खरोखर बुद्धिमध्ये बदल घडला आणि हे जे काही आपण मिळवायचं आहे ते सगळं तात्कालिक समाधान, तेवढ्यापुरतं सुख देणारं आहे. पूर्ण सुख, कायमचं सुख ऐहिकापासून मिळणार नाही, अशी बुद्धीला खात्री



पटल्यानंतर ती बुद्धि जर जगदंबेच्या उपासनेकडे वळली, आणखी 'ते ज्ञान आपल्याला पाहिजे,' असं जर मागून घेतलं, तर ते ज्ञान, त्याचं फळ म्हणजे मोक्ष, हे सगळं प्राप्त होतं. त्याकरिता मनाची, बुद्धीची भूमिका तयार होण्याकरता म्हणून अनेक जन्म जावे लागतात. अनंत संस्कार त्या बुद्धिमध्ये आहेत. वासना पुष्कळ आहेत त्या सगळ्याही वासना नाहीशा व्हायच्या, निर्वासन मन करायचयं. त्याकरता, उपासना आहे. उपासना कशाकरता आहे? वासना जितक्या मनामध्ये अधिक आहेत तितकं मन किंवा बुद्धि चंचल आहे. ती टिकत नाही. एकदा'असं करावं' असं वाटतं. एकदा,'तसं करावं' असं वाटतं. कधी हे बरं कधी ते बरं, वाटतं म्हणजे बुद्धीची निश्चिती नाही.

अर्जुनाची बुद्धिसुद्धा निश्चित नव्हती सुरवातीला. ते सगळे आप्तेष्ट पाहिल्याबरोबर त्यालाही मोह झाला. अर्जुनासारखा एवढा मोठा योद्धा ' मी काही युद्ध करणार नाही. माझ्याच हाताने माझेच लोक मारायचे आणि नरकामध्ये जायचं काय? हे मला पसंत नाही.' असं म्हणाला. अगोदर अगदी आपलं मत त्याने उत्तम मांडलं. मी युद्ध करणार नाही. धनुष्यबाण टाकून दिलं, बसून राहिला. ते सगळं ऐकून घेतल्यावर भगवान् म्हणाले,' मी मोठा आणखी विचार करणारा आहे, मला सगळं कळतं आहे असं ज्या बुद्धीला वाटते, अहंकार त्या बुद्धिमध्ये उत्पन्न झालेला आहे,' त्या अवस्थेमध्ये प्रत्यक्ष जवळ देव असताना सुद्धा अर्जुन त्याला सांगतोय की' काही मला मान्य नाही. शास्त्र-बिस्त्र मला काही माहीत नाही. मला ही हिंसा करायची नाही.' आणि लगेच पुन्हा म्हणायला लागला,'माझ्या मनाचा गोंधळ झालाय. देवा! काय मी करावं हे मला समजावून सांगा तुम्ही.' म्हणजे थोडा वेळ गेला तरी सुद्धा आपलं मत सोडून

दिलेलं आहे. आज हा पक्ष आहे, उद्या तो पक्ष आहे, हे काय चाललं आहे? आणि अशा बुद्धीनं राष्ट्राचं कल्याण होणार आहे का? कसं शक्य आहे? निश्चित बुद्धिच नाही. तो अर्जुन ज्यावेळेला अहंकार सोडून देऊन सर्वार्थाने शरण येऊन म्हणाला,'माझं कल्याण करा, माझं संरक्षण करा देवा.' तेव्हा मग गीता ज्ञानाला सुरवात झालेली आहे. तोपर्यंत असे अर्जुन पन्नास जरी आले असते आणि गेले असते त्यांना काही काळजी नाही. त्यांचा संकल्प होऊन गेलेला आहे. 'कोणीही जिवंत राहणार नाही. तू गेलास तरी हरकत नाही.' असे सांगून टाकले. 'तू जरी युद्ध सोडून निघून गेलास तरी हे जिवंत कोणी राहाणार नाहीत. कर्तव्य आहे, ईश्वराची आज्ञा समजून जर युद्ध तू करशील, तर तुला विजय मिळेल, कीर्ती होईल. कर्तव्य पालनाचं पुण्य मिळेल, पदरात पडेल.' तर अशी ही बुद्धि बदलणं, यावरही उपाय आहेत. उपासना मार्ग जो सांगितलेला आहे तो निश्चित आहे.

**।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।।**



# क्रीडा भगवतीची

**नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।**
**नमः प्रकृत्यैभद्रायै नियता प्रणतास्मतः।।**

**देवी भागवताच्या** प्रथम चरित्रामध्ये आणखी मार्कण्डेय ऋषींनी जो विषय मांडलेला आहे. प्रलय झालेला आहे. ब्रह्मदेवांचा एक दिवस संपला, रात्र झाली की त्रैलोक्याचा प्रलय होतो. ते पुन्हा झोपेतून उठल्यानंतर पुन्हा त्रैलोक्य निर्माण करतात. असं हे कार्य चाललेलं आहे. तसाच प्रलय झालेला होता. जलप्रलय. सगळे जीव आणखी अव्यक्तामध्ये विलीन झालेले आहेत. शरीर नाही. काही नाही. भगवान विष्णू संरक्षण करणार! आता कोणी जीवच नाहीये म्हणून संरक्षणाचं काम थांबलेलं आहे. म्हणून ते योगनिद्रेमध्ये आणखी निघून गेले. योगनिद्रेमध्ये शेषावर आपले स्वस्थ निजून राहिलेले आहेत. विष्णूंच्या कानातल्या मळापासून मधू,कैटभ दैत्य निर्माण झाले. बाकी कोणी जीव नाहीयेत. ब्रह्मदेव एका नाभीकमळावर उत्पन्न झालेले आहेत. आता हा प्रलयकाळ संपल्यानंतर सृष्टी पुढे करायची आहे. अशा वेळेला हे दोन दैत्य उत्पन्न झाले आणि ब्रह्मदेवालाच मारावे म्हणून त्यांचा प्रयत्न चालू आहे. ब्रह्मदेवांचा केवढा मोठा अधिकार आहे. जीवकोटीमध्ये जन्मलेला आहे, आदिजीव! पंचमहाभूतं परमेश्वरानी निर्माण केली म्हणजे नुसता संकल्प झाला. बहुरुपी आपण व्हावं. संकल्प होण्याबरोबर आकाश,

वायु, तेज, जल, पृथ्वी ही पंचमहाभूतं तयार झाली. आणि नंतर ब्रह्मदेवांना आज्ञा केली की या पंचमहाभूतांच्या पासून सगळी भौतिक सृष्टी तुमची तुम्ही करा. त्यांनाही वेदाचा उपदेश केला. ते वेदज्ञान आपल्या मनाच्या संकल्पांनीच भगवंतांनी त्या ब्रह्मदेवाला दिले.

ईश्वर सृष्टीकर्ता आहे तसा ईश्वर सद्‌गुरूस्वरुपही आहे. संत, महात्मे ईश्वररूप झालेले आपल्याला दिसतात. ते संत महात्मे म्हणजे मानव जीव नाहीयेत. जीवदशा त्यांची संपलेली आहे. ईश्वररुप असे होऊन गेलेले आहेत. ज्ञान होईल पुढे, पण उपासना भूमिकेवर असताना सुद्धा कितीतरी प्रकारची विघ्नं येतात. वासना मनामध्ये असतात. त्यामुळे जास्ती सुख मिळावं असं वाटतं. उपासना राजाने केली पण देवी प्रसन्न झाल्यानंतर,'मागलं राज्य मला या जन्मामध्येही मिळावं' हे मागणं मागितलं. या वासना मनामध्ये आहेत. देवी प्रसन्न झाल्यानंतर आणखी मोक्ष मागून घेतला असता तर काय हरकत होती? त्याला मोक्ष मिळाला असता.'अधिकार तुझा व्हायचाय पुढच्या जन्मामध्ये बघू' असं काही देवी सांगणार नाही. ईशकृपा अधिकार उत्पन्न करू शकते. तर उपासनामार्गामध्ये असताना सुद्धा जास्तीत जास्त आणखी आपल्याला सुख मिळावं, संसारसुख मिळावं अशी इच्छा आहे. त्या सगळ्या वासना बुद्धीतल्या नाहीशा झाल्यानंतर ती बुद्धि शुद्ध झाल्यानंतर ते आणखी जे खरं स्वरुप आहे त्याचे ज्ञान संत महात्म्यांना आहे.

भगवती चैतन्यरुपानी, सच्चिदानंदरुपानी सर्व जगामध्ये भरून राहिली आहे. सगळ्या जगाला अधिष्ठान, सर्व विश्वाभास ज्या चैतन्यामध्ये आणखी भासतो आहे ते चैतन्य रुप असं हे भगवतीचं रुप आहे. बाह्य जे रुप आहे, ते दशभुजा, अष्टभुजा



आहे, महाकालीच्या दशभुजा आहेत म्हणे. तर ही वेगळी वेगळी रुपं ही काही कार्याकरता स्वतःच्या इच्छेने आणखी घेतलेली आहेत. ही काही कर्मांनी घ्यावी लागलेली नाहीत. ईश्वराला, भगवतीला कर्माचं बंधन नाही. पण खरं जे मुख्य स्वरुप आहे सच्चिदानंदघन स्वरुप, सर्व जगामध्ये व्यापून राहणारे, त्या स्वरुपाचे ज्ञान झाले पाहिजे. त्या स्वरुपाचे ज्ञान झाले की संसार मनातला संपला. बुद्धीच्या पुढे संसार संपला. संसारातली बुद्धीही संपली. जीवभावही संपला. काही मागायचही उरले नाही. देणाराही कुणी नाही. ही अवस्था आपल्याला मिळावी अशी त्या वैश्याला इच्छा उत्पन्न झाली. राजाला झाली नाही.

याचे कारण काय आहे? ह्यानी काही उपासना पूर्वीही केलेली असेल. उपासनेनेही आणखी चित्त शुद्ध होतं पुष्कळ. हा भक्तिमार्गही मोठा फलदायक आहे. ज्ञान हे त्यामुळे उत्पन्न होतं. खरी बुद्धीची शुद्धी, परिवर्तन बुद्धीचं त्यामुळे होतं. आरंभाला आणखी संसारात राहून सुद्धा कुळधर्म, कुळाचार भक्तीने करावे वगैरे सांगितलेले आहेत. तर संसारामध्ये राहून जर आपल्याला करता आलं तर काही हरकत नाही. करता येत नाही असं नाही. पण जास्ती धन मिळावं, जास्ती सुख मिळावं, अशा इच्छेमध्ये त्याची बुद्धि जर गुंतून राहिली तर मिळालेल्या साधनांचा उपयोग याकरताच होईल असे सांगता येणार नाही. संसारामध्ये आणखी उत्कर्ष झाला, अभ्युदय ज्याला म्हणतात, सगळं मिळालं ईश्वराच्या कृपेने. पण ते मिळाल्यानंतर ती बुद्धि, त्याचा उपयोग चांगल्या प्रकारानी करील की नाही, कोणास ठाऊक!

गोपालकृष्ण ज्यावेळेला द्वारकेला जाण्याकरता निघाले. धर्मराज राजा झालेला आहे. पांडव आणखी विजयी झाले. कौरव सगळे गेले. आणखी आत्याबाई जवळ आले. कुंतीला

नमस्कार केला आणि म्हणाले,' आत्याबाई आता येतो, तुमचा मुलगा राजा झालेला आहे. तुम्ही आता सुखाने राहा.' गोपालकृष्ण आपला भाचा आहे अशी बुद्धि नव्हती कुंतीची. ते ज्ञान तिला पहिल्यापासून आहे. हा प्रत्यक्ष परमेश्वर आहे. ओळखलं आहे तिने. म्हणून तिनं मागितलं,'देवा, मला कायम दुःखातच ठेव. कारण दुःखातच मला तुझे सतत स्मरण राहील.' कुंतीची बुद्धि कशी आहे! लोकदृष्टीने हे अगदी वावगं आहे. कुंतीचे मागणे. चुकीचे आहे असं म्हणू आम्ही संसारी लोक. आम्हाला नेहमी संकटाचाच प्रसंग आठवतो. 'नेहमी आम्हाला तुम्ही वनवासात ठेवा' म्हणती आहे कुंती. हे मागणं काय बरोबर वाटेल आपल्याला? एखादा आमच्यासारखा संसारी, अज्ञानी मनुष्य म्हणणार,'कुंतीला एकदम एवढे सुख मिळाले म्हणून त्याच्यामध्ये काहीतरी वेड्यासारखं मागितलं.' कारण सांगते आहे ती वनवासात आम्ही असतांना तुमची आठवण आम्हाला नेहमी होत होती, ती होणार नाही.

अहंकार! अनेक प्रकारचे अहंकार असतात. चांगल्या कुळामध्ये आमचा जन्म झालेला आहे हा एक पहिला अहंकार आहे. सत्ता हातामध्ये आल्यानंतर मी ज्याप्रमाणे वागेन त्याप्रमाणे आहे. हा एक दुसरा अहंकार आहे. ज्ञान मिळालेलं आहे. उत्तम व्याख्यान देता येतं. उत्तम आणखी हे करता येतं, हा एक अभिमान उत्पन्न होतो. जास्ती जास्ती आणखी अहंकार ज्या बुद्धिमध्ये आहे त्या बुद्धिकडून ही सगळी साधने मिळाली असतानासुद्धा योग्य कर्म होईल असं सांगता येणार नाही, हा तिचा विचार आहे. त्यापेक्षा वनवासच बरा.

हा अत्यंत मोठा विवेक आहे. तो विवेक बुद्धिमध्ये उत्पन्न होणं ही जगदंबेची कृपा आहे. पण हा विवेक उत्पन्न जरी झाला नाही, इतरच काही सांगितलं तरीसुध्दा देवीला किंवा उपास्यदेवतेला



कंटाळा नाही येत. माऊली आहे ती. हळूहळू त्यांची बुद्धि यातून अलिप्त होण्याच्या मार्गावर लागेल. एकदम कस संसार नको म्हणता येईल आणि नको म्हटलं की तो सुटणार थोडाच आहे. तोंडानी नुसतं संसार नको म्हणायचं, आणखी मनात संसार असायचा. काय उपयोग आहे? ब्रह्मदेवांच्यावर प्रसंग आलेला आहे. पूर्ण ज्ञान आहे. संकल्पशक्ती मोठी आहे, संकल्पानी सगळी सृष्टी करताहेत. महर्षि त्यांनी आपल्या संकल्पानी अगोदर निर्माण केले.

मोठे मोठे योगी महात्मे, नाग वगैरे सगळे, अशी सगळी शक्ती ज्यांच्याजवळ आहे त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न हे मधु,कैटभ दैत्य करायला लागले. पण त्यांच्याजवळ तसं सामर्थ्य नाही. मधु,कैटभांना मारण्याची शक्ती त्यांची नाही. म्हणून त्यांनी या जगदंबेची स्तुति केलेली आहे. श्रीसूक्त म्हणून जे आहे ते हेच आहे. ज्ञानी आहेत ते महात्मे आहेत. सृष्टी करण्याचं सामर्थ्य त्यांच्याजवळ ईश्वरानी दिलेले आहे. पूर्ण ज्ञान आहे म्हणून शक्ति आहे. ज्ञानाशिवाय क्रिया होत नाही कधी. तर स्तुति त्यांनी केली. 'निद्रारूपेण संस्थितः' हे आहे भगवतीचं स्वरुप! तर निद्राही योग-निद्रा ही बाजूला झाली पाहिजे म्हणजे विष्णू हे जागे होतील. आणखी यांचा नाश करतील. म्हणून त्यांनाही स्तुति करावी लागली. मोठी स्तुती आहे. सर्व स्वरुपी भगवती आहे हे त्यांनी दाखविले. पुढे जे,'सृष्टीरुपेण संस्थितः, शांतीरुपेण संस्थितः' ही निद्रारुपच आत्ता सध्या आहे. निद्रेमुळे भगवान विष्णूसुद्धा आणि आपलं महात्म्य विसरुन गेले. म्हणून आपण यांना जागे करा. विष्णूंना सुद्धा जागे करा अशी प्रार्थना ब्रह्मदेव करताहेत. म्हणजे विष्णूही आपली शक्ति विसरुन जातात. या जगदंबेच्या योगाने पुन्हा ती जागृत होते. मग ब्रह्मदेवांनी सगळी

आणखी स्तुति केल्यानंतर, ती त्याच्या शरीरातून, निरनिराळ्या अवयवातून ती निद्रा, योगनिद्रा, महामाया या योगनिद्रेलाच महामाया म्हटलेलं आहे त्यांनी- ती बाहेर पडली आणखी विष्णू जागृत झाले. त्यांनी पाहिले, दोन दैत्य आहेत. पण मोठे आहेत. ब्रह्मदेवसुद्धा काही त्यांना प्रतिकार करु शकत नाहीत. मग त्यांचं आणखी विष्णूंचं युद्ध झालं. मधू दैत्य आणखी हे पाच हजार वर्षे पर्यंत युद्ध केलं म्हणतात. म्हणजे दोघांची शक्ति किती असेल?

आणि त्यांच्या मनामध्ये या मायाशक्तीने प्रेरणा केली. त्या दैत्यांना वाटलं आणि त्यांनी सांगितलं, तुम्ही म्हणाले चांगले युद्ध करता. आमच्या मनाचं समाधान झालं, काय वाटेल तो वर मागून घ्या म्हणाले. ते दैत्य म्हणताहेत. त्यांनी लगेच सांगितलं तुम्ही माझे वंध्य व्हा वा माझ्या हातून तुमचा नाश झाला पाहिजे. हाच मला वर पाहिजे. वर असा मागा म्हणून सांगणं हे सुद्धा जिच्यामुळे बुद्धिमध्ये ही जी भक्ति उत्पन्न झाली, हा विचार उत्पन्न झाला त्या महामायेचं कार्य आहे. मग यांनीही मागितलं, वर मागितला तर, यांनी सांगितलं की पाणी नसेल तिथे आमचा नाश करा. मग विष्णूंनी आपल्या हृदयावरती घेऊन त्यांचा शिरच्छेद केला म्हणतात. म्हणजे या कथेवरून प्रत्येक जीवाच्या बुद्धिला जीवाची असो किंवा ईश्वररुप जे भगवान विष्णू आहेत त्यांच्याही बुद्धिला अशा प्रकारचं निद्रेने आवरण घातलं. मधू,कैटभ उत्पन्न झालेले आहेत. इकडेही त्यांचं लक्ष नाही. ज्यावेळेला ब्रह्मदेवांनी त्या महामायेची आणखी जगदंबेची स्तुति केली निद्रारुपाने सर्व शरीरामध्ये व्यापून राहाणारी ती ज्यावेळेला बाहेर पडली त्यावेळेला आणखी यांचं रक्षणाकडे लक्ष गेलं. आणि ते रक्षण पूर्ण त्यांनी केलं. ब्रह्मदेवांचं संरक्षण केलेले आहे. संरक्षण संरक्षण करणं म्हणजे जगाचं रक्षण करणं.



सज्जनांच्या संरक्षणाकरता 'परित्राणाय साधूनाम' हे त्यांनी वचन दिलेले आहे. साधूंचं संरक्षण करण्याकरता मी अवतार घेतो. भगवान सांगताहेत. धर्माचं संरक्षण हे मुख्य आहे. धर्माचरण करणारे जे आहेत त्यांच्या आचरणावरुन धर्माची कल्पना येईल. ते कसं वागतात? कसं वागत नाहीत? धर्म कोणता? अधर्म कोणता? त्यांच्या आचरणावरून कळून येतं. तेव्हां नेहमी धर्मशील असणारे महात्मे त्याचं संरक्षण हे धर्माचं संरक्षण आहे. त्याकरता अवतार आहे. जगदंबेचा अवतारही त्याचकरता झालेला आहे. याठिकाणी मात्र अव्यक्तरुपानी जगदंबेचं दर्शन झालेलं आहे. पण या प्रथम चरित्राची देवता म्हणजे महाकाली आहे. ते त्या स्तुतिमध्ये महाकाली हे सुद्धा या योगनिद्रेचं, स्वरुप आहे असं सांगितलेलं आहे. आणखी ही महाकाली सर्व जगतकार्य चालवणारी, योगनिद्रारुपानी विष्णूंना जिने आणखी आच्छादन केलेले होते, ती बाहेर पडल्याबरोबर विष्णूंच्याकडून हे काम झाले. दैत्याचा नाश झालेला आहे आणि संरक्षण म्हणजे जगाचं संरक्षण झालेलं आहे. असा एक पहिला, प्रथम चरित्रामध्ये उल्लेख केलेला आहे. मोठी स्तुति आहे ब्रह्मदेवांची. त्याच्यावरतीही पुष्कळ आणखी निरनिराळे ग्रंथ वगैरे झाले असतील, भाष्य वगैरे त्याचं चिंतन करण्यामध्ये आपल्याला पुष्कळ त्याचा खुलासा होईल. आज देवी महात्म्याच्या निमित्तानी काहीतरी देवीच्या चरित्रांचं चिंतन व्हावं अशी इच्छा सर्वांची असल्यामुळे थोड्याश्या भागांचं चिंतन झालं. ईश्वराचं चरित्र हे चिंतन करण्याच्या पलिकडचं आहे. वेदव्यासांनी भागवत ग्रंथ लिहिला त्याच्यावर कितीतरी टिका आहेत. महिषासुराचा नाश करण्याकरता हा अवतार झालेला आहे. महिषासुर नावाचा एक असुर त्याने तपश्चर्या केली. हे सगळे दैत्य वगैरे जे आहेत ते उगीच नास्तिकपणाच्या

पाठीमागे लागत नाहीत. हे कशाला पाहिजे? यानी काय होणार आहे? त्यानी काय होणार आहे? तपश्चर्या शास्त्रानी सांगितलेली आहे. त्यानी बल वाढते. शरीरबल वाढते. मानसिक शक्तीचा विकास म्हणजे सर्वही सिद्धी आहेत, योगसिद्धि. त्याकरता मोठी मोठी महर्षि मंडळी ही तपश्चर्या पूर्वी करीत असत. त्यांच्या आश्रमामध्ये हे दैत्य वगैरे जाऊ शकत नव्हते. कदाचित दैत्यांनी त्यांच्या यज्ञामध्ये विघ्न उत्पन्न केले तरीसुद्धा स्वतःच्या तपाचा उपयोग काही ते करीत नव्हते त्या दैत्यांना मारण्याकरिता. विश्वामित्रांच्या यज्ञामध्ये दैत्य विघ्न उत्पन्न करायचे. विश्वामित्र दशरथ राजाकडे गेले आणि म्हणाले,'माझ्या यज्ञाचे संरक्षण करण्याकरता दोन मुले दे.' आणखी त्यांचा काही हेतू होता. तर ही सर्व ऋषिमंडळी सामर्थ्यसंपन्न असायची. पण त्या सामर्थ्याचा राग आला, शाप दिला असा उपयोग ते करत नव्हते. एखादे दुर्वासऋषिंसारखे महर्षि. ज्यांच्या जवळ कोट्यावधी रुपये आहेत त्यानी दहा लाख रुपये उधळले तरी काही होत नाही, संपत नाहीत. तशापैकी आहे. मंत्रसिद्धि आहे, तपसिद्धि आहे. पण हे सगळं लक्षात आणून, हे दैत्यसुद्धा जास्तीत जास्त सामर्थ्य आपल्याला मिळालं पाहिजे म्हणून, शास्त्रीय मार्गावर विश्वास ठेवून तपश्चर्या करीत होते. देवांच्या बरोबर संघर्ष करायचा, देवांना घालवून द्यायचं. त्यांची स्थानं घ्यायची, तिथे आपण अधिकार चालवायचा, त्याकरिता काही तपश्चर्या केली पाहिजे. विश्वास ठेवून तप करीत असत आणि धैर्यही मोठं आहे. सकाम का असेना पण तप झालं तरी त्याचे फळ मिळतंय. धैर्यानी व्यवस्थित झाले पाहिजे. प्रयत्न करणारे आहेत दैत्य. म्हणजे तपश्चर्या करावी आणखी आपण त्याचं फळ मिळवावं. इथपर्यंत त्यांची बुद्धि जाती. पण बरोबर देवांवर विश्वास मात्र नाही.



तपश्चर्या केल्यानंतर जर वर मिळाला आणि कुणी सांगितलं,' हो तुम्हाला इतका देवाचा वर मिळाला.' तर लगेच म्हणत"देवानी काय फुकट दिलाय का वर? मी इतकी तपश्चर्या केली म्हणून मला वर दिला." म्हणजे पुन्हा देवाच्या विरुद्ध वृत्ति आहे की! याला काय म्हणायचं

?

त्यावेळेला ही देवी कशी निर्माण झाली? याचे वर्णन मार्कंडेय ऋषींनी केलेले आहे. महिषासुराचं पारिपत्य, त्याचा नाश झाला पाहिजे हा सगळ्यांच्या मनामध्ये आणखी विचार उत्पन्न झाला आणि प्रत्येकाच्या शरीरातून तेज बाहेर पडलेले आहे. विष्णू- शंकर त्याचप्रमाणे यमधर्म, ब्रह्मदेव सगळीजणं सर्व देवांच्या शरीरातून तेजोराशी निघाल्या. सबंध तेज पसरलेलं आहे. आणि सगळं तेज एकत्र होऊन हे देवीचं, महालक्ष्मीचं स्वरुप तयार झालं. समुद्रमंथनाच्या वेळेला एक लक्ष्मीचा अवतार आहे तोही निराळा आहे. हे महालक्ष्मीस्वरुप जे आहे ते महिषासुराचा नाश करण्याकरता तसं झालेलं आहे.

अगदी आरंभाला देवांनी स्तुति केलेली आहे. सर्व देवांचं तेज एकत्र होऊन आणखी ते स्वरुप तयार झालं. कोणच्या कोणच्या तेजानी, कोणता अवयव तयार झाला हे सविस्तर वर्णन मार्कण्डेय ऋषींनी केलेलं आहे. मग प्रत्येकांनी आपलं शस्त्र, आपली आयुधं जी आपल्याजवळ होती, तशी तशी त्यातून नवीन आयुधं निर्माण करून तिला दिली. आणि तेजस्वी अशा प्रकारचं ते महालक्ष्मीचं स्वरुप सगळीकडं पसरलेलं आहे. ते तेज पसरलेलं आहे.महिषासुर वगैरे सगळ्या दैत्यमंडळींना राज्य मिळालं, स्वर्ग मिळाला. देव सगळे निघून गेले आता काही आपल्याला कोणी शत्रू नाही. असा अभिमान, विश्वास त्यांना

वाटत होता,पण इतक्यात हे देवीचं स्वरुप तयार झाल्यामुळे ते सगळेही दैत्य असुर, सशस्त्र तयार झालेले आहेत.महिषासुर हाही मोठा महिषरुप धारण करीत होता. आणि त्याचे सेनापती, कितीतरी मोठे मोठे सेनापती, अनेक दैत्य त्याच्या हाताखाली सैन्य घेऊन त्याला येऊन मिळालेले होते. शंभर वर्षापर्यंत देव दैत्यांचं युद्ध झालं म्हणे. काही थोडं थोडका काळ नाही. चालू आहे. कधी विजय, कधी पराजय असं दोन्ही पक्षाचं चालू आहे. पण शेवटी दैत्यांचा विजय झाला. त्यांनी सगळ्या देवांना घालवून दिलं स्वर्गलोकातून आणि तो लोक ताब्यामध्ये घेतलेला आहे. सगळे आपले लोक नेमणार. जो पक्ष येणार त्याचे लोक असणार हे आतासुद्धा आहे, त्यावेळेलाही सगळे पहिल्यापासूनच आहे. सोय असती, सोईच्या दृष्टीने पहातात. त्यांनी फितुरी केली तर काय करणार. राजकारणाच्या दृष्टीने ते अयोग्य म्हणता येणार नाही. त्या एका कोणाचे उदाहरण आहे म्हणे, म्हणून काहीतरी गोष्ट पूर्वीच्या लहान मुलांच्या बोलण्यात आली होती. अमेरिकेचा तो राष्ट्रपती झाला आणि त्यांनी आपल्याविरुद्ध पक्षातल्या मनुष्याला गृहमंत्री नेमलं. त्याच्या मित्रानी सांगितलं,'अरे! याला तू गृहमंत्री नेमलं? हा तर तुझी सारखी निंदा करतो. लोकांच्यापुढे हा राष्ट्रपती चांगला नाही वगैरे तुझी निंदा करतो.' तो म्हणाला,'माझी निंदा करतो, पण राष्ट्राचं तो कल्याण करणार आहे, राष्ट्राचा मित्र आहे म्हणून त्याला नेमलं.' असा एखादाच आहे.

तर अशा रीतीने सगळे देव बाजूला झालेले आहेत. मग आता विचार करायला पाहिजे ना! सत्ता गेली. हा एक मोठा प्रबल असुर तयार झालेला. संपणार नाहीत असे भाते दिले. अर्जुनाला सुद्धा ते मिळाले होते, देवाच्या कृपेने. कारण किती बाण हा सोडणार, हजारो सैनिक पुढे उभे असायचे. बाणाचा



पुरवठा करणाऱ्या कितीतरी गाड्या त्या रथाच्या पाठीमागे ठेवाव्या लागतील. पण याला काही नाही, एकदा ते भाते अडकवले की बाण संपायचेच नाहीत.

तर हा महिषासुर आणि त्याचे सगळेही सैनिक म्हणा, सेनापती वगैरे सगळे या सगळ्यांचा नाश होण्याकरता सर्व देवांच्या शरीरातून उत्पन्न झालेले तेज एकत्र झालं. एक व्यक्ती आहे पण देवांचं तेज आहे. सर्व देवांची शक्ति एकत्र होऊन महालक्ष्मीचं स्वरुप तयार झालेलं आहे. ते असुरही प्रयत्नवादी आहेत. प्रयत्नाला प्राधान्य आहे त्यांचं. ईश्वर, दैव वगैरे इकडे काही लक्ष नाही. आणि प्रयत्न करताना नीती, अनीतीचाही विचार नाही. ईश्वराची खरी भक्ति असणारा नीति, अनीतीचा विचार करुनच वागणार. पण यांचं तिकडे लक्ष नाहीये. केवळ आपलं रक्षण झालं पाहिजे. त्याची सत्ता टिकली पाहिजे. आपण सुखी झालं पाहिजे. एवढीच इच्छा आहे. आणखी एक स्त्री आहे, ही भावना आहे ना! पाहिल्याबरोबर एक स्त्री आहे, सशस्त्र आहे, स्त्रीच्या ठिकाणी सुद्धा काही सामर्थ्य आहे याची कल्पना त्या असुरांना नव्हती. सीतेचं सामर्थ्य रावण जाणीत होता. लांबून धाक दाखवितो आहे, बोलतो आहे. पण तिला स्पर्श करण्याचं सामर्थ्य त्याच्यात नाही. तर सगळ्या दैत्यांना आणखी ही कोणीतरी एक सशस्त्र स्त्री आलेली आहे एवढचं दिसलं, आणि सगळे जे सेनापती आहेत त्या सेनापतींनी आणखी युद्धाला सुरवात केली. सर्व दैत्यांचा नाश करायचा होता. किती हजारो लोक आहेत. लक्षावधी. प्रत्येक दैत्याचं सैन्य, ते सगळं सैन्य मारायचंय. ते सेनापती सगळे मारायचे आणि महिषासुराचा नाश करायचा. संख्याबल जास्ती आहे. रामाच्या कडे संख्याबलाची अपेक्षा नव्हती. ते दोघेच निघालेले आहेत आणि त्यांच्याबरोबर

कोण होतं अरण्यात. पण या शत्रूचा प्रतिकार करायचा, शत्रूला शासन करायचं एवढं त्यांनी ठरविलं. नंतर तो सुग्रीव वगैरे वानरराजा मिळाला. त्याचं सैन्यही पुष्कळ होतं. वानरही मिळालेले आहेत. सन्मार्गांनी जाणारे होते रामचंद्र म्हणून त्यांना वानरांनीही सहाय्य केले. आणखी सन्मार्ग ज्यांनी सोडलेला आहे अशा रावणाला त्याच्या, बिभिषण नावाच्या भावानीही सोडून दिलं. तर एक स्त्री आहे कोणीतरी. सामर्थ्याची काही जाणीव, कल्पना त्या दैत्यांना नाही. स्त्री काय करणार आहे? असे म्हणाले. काही थोडं शिक्षण घेतलं असेल शस्त्रांचं वगैरे म्हणून युद्धाला सुरवात झाल्यानंतर काय शक्ति आहे हे कळायला लागलं. त्या सगळ्या दैत्यांचा नाश व्हायला लागला.

एक राजा सुरथ नावाचा आणि दुसरा व्यापारी वैश्य 'समाधि' नावाचा. त्या दोघांची परिस्थिती आरंभाला त्यांनी वर्णन केली. ही जी भगवती देवी, मायाशक्ति जिला म्हणतात, अनेक रुपं सप्तशतीमध्ये तिची दाखवलेली आहेत. अंतःकरणामध्ये जे वेगवेगळे आणखी गुण सांगितलेले आहेत. श्रद्धा पाहिजे, दया पाहिजे, शांती पाहिजे ते सगळही भगवतीचं स्वरुप आहे. तो सुरथ राजा आणि समाधि वैश्य हे दोघेही आणखी संसारी होते. राजा तर राज्य करणारा होता. परंतु परिस्थिती संसाराची काही सारखी राहत नाही. संसार म्हणजे बदलणारच आहे.

सांगताहेत सुभाषितकार. चाक फिरत आहे. खालचा आरा वरती, वरचा खाली असं चाललं आहे. चांगली अवस्था ही प्राप्त होती, तीही जाती. पुन्हा दुसरी अवस्था, कमी अवस्था येती, सुखाची अवस्था दुःखाची अवस्था. त्याप्रमाणे सुरथ राजा मोठा पराक्रमी. त्याच्या शत्रूंनी आणखी त्याचा पराजय केला. अत्यंत कमी शक्तिचे शत्रू, पण त्यांचं बळ वाढलं आणि त्यांनी



सुरथ राजाचा पराजय केला. हे बाहेरच्या शत्रूंचं. पण राज्यामध्ये जे काही मंत्रिमंडळ वगैरे होतं प्रधान वगैरे मंडळी, तीही शत्रूला सामील झाली. हा राजा म्हणजे अगदी प्रजेचे पुत्राप्रमाणे पालन करणारा, चांगला धर्मशील राजा होता. पण यांचे अंतरंग असणारी सगळी जवळची मंडळी शत्रूला वश झाली. बाहेरून तर शत्रूंनी हल्ला केलाच होता. म्हणून कमी शक्तीच्या शत्रूंना याचा पराजय केला. आतच भेद आहे, फितुरी आहे. राजा आणखी वनामध्ये गेला. घोड्यावरनं शिकारीला जातो म्हणून सांगून गेला. आणखी दैवयोगाने एका महर्षिंच्या आश्रमामध्ये येऊन पोहोचलेला आहे. शांत आश्रमस्थान आहे.

त्यांचं वर्णन करताहेत मार्कण्डेय ऋषि. पशु- पक्षी सुद्धा शांत आहेत. मग तिथं जाणाऱ्या माणसाला शांती का मिळणार नाही?हा त्या ऋषींचा तपभाव आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य हे जे यमनियम सांगितले योगशास्त्रामध्ये या यमनियमांचाच ज्यांनी अभ्यास केलेला आहे त्याला ह्या सगळ्या सिद्धी मिळतात.

अहिंसा प्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः

पतंजली महर्षि सांगतात. अहिंसा जर पक्की झाली, कोणालाही पीडा द्यायची नाही. शरीरानी, वाणीनं, मनानी, दुसऱ्याचं आणखी अमंगल कधीही करायचं नाही. हिंसा होणारच नाहीये. इतकी सवय सगळ्या इंद्रियांना, मनाला, शरीराला अशी ज्यांनी लावून घेतली, ती अहिंसा सिद्ध जर झाली, तर त्याचं फल म्हणजे त्याच्या वातावरणामध्ये असणारे जे काही पशुपक्षी, यांच्या मनातलं सुद्धा वैर जातं म्हणून पुराणादिकांमध्ये पूर्वीच्या ऋषींच्या आश्रमाचं वर्णन करत असताना, वसिष्ठ ऋषींच्या आश्रमामध्ये कण्व

ऋषींच्या आश्रमामध्ये वाघ आणि गाय एकाच ठिकाणी चरतायत, पाणी पितायत असं सांगतात. ही काही नुसती अतिशयोक्ती नाहीये, अर्थवाद नाहीये. त्या आश्रमाचा जो मुख्य अधिपती आहे. त्याची तपश्चर्या इतकी झालेली आहे की त्याच्या मनामध्ये हिंसा कुणाचीच नाही. स्वतःचा प्रभाव त्या पशुपक्ष्यांवर होऊ घातला आहे. हा सुरथ राजा त्या आश्रमामध्ये आला. पहातो आहे.कोणाच्याही मनामध्ये वैर नाही. हा राजा स्वतःच्या राज्यामध्ये अनुभव घेऊन

आलेला आहे. जवळची मंडळी वैरी झाली याची.मंत्रिमंडळातली, शत्रूला सामील झाली, म्हणून याचा पराजय झाला. पण इथे कोणाच्याही अंतःकरणामध्ये वैर नाही. हिंसा नाही. मुनींचे शिष्यही मोठे अधिकारी आहेत. तिथे येऊन पोहोचलेला आहे.

त्याची हकीकत समजली, रहा म्हणाले. राजाला त्यांनी सांगितलेले आहे. आनंदाने राजा त्या तिथे आश्रमात राहिला. असाच एकदा फिरायला गेलेला असताना 'समाधि' नावाचा एक वैश्य त्याला भेटला. तो ही असाच दुःखी संसारातून आणखी निघून आलेला. कोण आहेस बाबा तू? तुला काय दुःख काहीतरी झालेले दिसतंय? दुःखी दिसतो आहेस. कसलं दुःख आहे? राजानी विचारलं प्रेमाने. त्यांनी सांगितलं,'राजेसाहेब मी पुष्कळ संपत्ति मिळवली. सगळी मंडळी आणखी माझी सुखी व्हावीत याकरता मी पुष्कळ प्रयत्न केला. संपत्ति मिळवली. त्याच मुलांनी, स्त्रीनं, आणखी सगळ्याही नोकर-चाकरांनी मला घालवून दिलं घरातून. धनामुळे, धन आपल्याला मिळालं पाहिजे. याला घालवून दिलं म्हणजे झालं. सगळं धन आपल्याला मिळेल.' एवढं सांगून तो थांबला नाही. तो म्हणाला,' आता मी इकडे निघून आलेलो आहे. ती माझी मुलं म्हणा, पत्नी म्हणा, यांची



काय स्थिती असेल? त्यांच्यावर काही संकट तर आलं नसेल? चांगले सुखात आहेत की नाहीत?' असंही बोलून दाखिवलं त्यांनी राजाला. आणि राजाच्या मनातही असेच विचार येत होते. 'मी इतकी संपत्ति मिळवली, इतका खजिना मिळवून ठेवला, हा जो माझा प्रधान आहे, मोठा पराक्रमी आहे आणखी बाकीची मंडळी, यांनी तो सगळा खजिना रिकामा तर केला नाही. काय झालं असेल?' तिथून आला आहे आता हा. तिथल्या खजिन्याची आता ह्याला काय जरुरी आहे. याच्याही मनात तिकडंच लक्ष. तो वैश्य. सगळ्यांनी घरातून घालवून दिलेलं आहे. हे सांगतोय तोंडानी, 'सगळ्या आप्तेष्टांनी मला घालवून दिलं.' पण तिकडे त्या लोकांची स्थिती कशी आहे? दोघांनी ठरविलं ऋषिंना आपण विचारूया. चिक्कार ज्ञानी महर्षि आहेत आणि असंग आहे, अलिप्त बुद्धि आहे त्यांची, सर्वांना समाधान देऊ शकतात, आनंद देऊ शकतात. म्हणून दोघेही बसले ऋषिंच्या जवळ येऊन आणि राजानी हा प्रश्न मांडला ऋषिंच्यासमोर. हा वैश्य आणि मी म्हणाले घरातून दुःखी होऊन बाहेर पडलो. संसारामध्ये सुख नाही. हा अनुभव घेऊन बाहेर पडलो म्हणाले. पण आमचं मन तिकडेच गुंतलं आहे, हे काय आहे म्हणाले. विषयामध्ये, संसारामध्ये दोष आहे. सगळ्यांची बुद्धि चांगली राहात नाही. हे अनुभव घेऊन आम्ही आलेलो असतानासुद्धा तिकडेच आमचं लक्ष आहे. ही ममता का उत्पन्न झाली? आमचा संसार, आमची मुलंबाळं, आमचं हे, त्याचं कसं कल्याण आहे की नाही, सुखी आहेत की नाहीत हे आमच्या मनात येतं. हा आणखी राजाने प्रश्न केला. त्या वैश्याचाही. हाही मनुष्य तसाच आलाय म्हणाले दुःखी होऊन, तर संसारामध्ये असं का होतं? हे राजाने विचारले आहे. संसाराची स्थिती अशीच आहे फक्त

माणसाचाच का संसार आहे? देव आहेत, ब्रह्मदेवांपर्यंत अगदी सगळ्यांची स्थिती अशीच आहे. त्यांनाही अनुकूल प्रतिकूल काल आहे. इंद्रादिक देवांनाही दैत्यांपासून दहशत वाटते. एखादा कोणीतरी तपश्चर्या करणारा दैत्य होतो वर मिळवणारा. की त्याला सेनापती करून हे दैत्य आलेच समजा. स्वर्गाचं राज्य आम्हाला का मिळू नये? असं त्यांना वाटतं. त्यांच्याकरता परमेश्वराने स्वतंत्र स्वर्गासारखाच 'रसातळ' लोक निर्माण केलेला आहे. इथं तुम्ही रहा. सगळ्या सोई आहेत. पण देवांचं हे राज्य आम्हाला का मिळत नाही? आमचंही आम्हाला पाहिजे आणि देवाचंही पाहिजे अशी वृत्ति आहे जगामध्ये. हे बुद्धिवर अवलंबून आहे. संसारामध्ये दुःख आहे म्हणून हा संसार सोडला पाहिजे. वस्तुतः दुःख कशाला घ्यायचं? तिथे पण दुःखाचा अनुभव घेऊन आलेले हे दोघे सांगताहेत की आमचं मन तिकडेच आहे. घरात सगळं कुशल, सगळ्यांची खुशाली आहे की नाही, असंच आम्हाला वाटतं म्हणाले. मन हे कठीण आमचं होत नाहीये. कठोर होत नाहीये याचं कारण काय? ही जन्म माया जी आहे, महामाया जिला म्हणतात पुष्कळ रुप सांगितलेली आहेत. ब्रह्मदेवांच्या स्तुतिमध्ये पुष्कळ रुपं आहेत तिची. तर तिचे हे कार्य आहे, ही एक क्रीडा चाललेली आहे. सृष्टी, स्थिती, प्रलय म्हणजे ईश्वराची किंवा भगवतीची लीला आहे. त्यात कोणाला सुखी करावं, कोणाला दुःखी करावं, कोणाला श्रीमंत करावं, गरीब करावं याचं त्याला काही नाही. ईश्वराला काही नाही, भगवतीलाही नाही.

इंद्रिय, बुद्धि ही ज्ञानाची साधनं आहेत. त्यांनी ज्ञान होतं. त्याप्रमाणे कर्म घडतात, बरी वाईट कर्मं घडतात. याचही फळ पुन्हा पुन्हा मिळतं आपल्याला, जीवाला. या जन्मात, पुढच्या



जन्मात. सुख दुःख हे फल प्राप्त होतं, परंतु हा द्वंद्वात्मक संसार आहे. केवळ सुख नाही आणि केवळ दुःखही नाही. केवळ सुख मिळवायचं झालं तर संसारात मिळणार नाही. सतत सुख पाहिजे, दुःख नको अशी इच्छा मात्र आमची आहे. पण कोणालाही तसं मिळत नाही. रावणालाही मिळालं नाही आणि रामचंद्रांनाही मिळालं नाही. किती दुःखं त्यांना भोगावी लागली? सीतेला रावणानी नेल्यानंतर तिचा शोध करण्याकरता किती कष्ट पडले? हे त्यांनी जगाला दाखिवलंय म्हणतात मारुतीराया. केवळ रावणाला मारण्याकरता काही राम जन्माला आले नाहीत. त्याला काय सहज मारलं असतं.

सगळ्या मानवांना, सगळ्या संसारी जीवांना आणखी मार्गदर्शन करण्याकरता हा अवतार घेतला म्हणाले. मी म्हणाले या स्त्रीच्या ममते मध्ये सापडलो आणि शेवटी 'सीते, सीते' करुन आणखी दुःख करीत बसलो म्हणाले. शोध करायचा त्या रावणाला मारायचं हे किती कष्ट करावे लागले. तर असे सर्वही अवतार घेऊन जरी भगवान आले तरी त्यांनाही हे आहे कष्ट आहेत. देवीने अवतार धारण करुन अनेक असुरांचा नाश केला पण किती कष्ट पडले. किती मोठे मोठे त्याने या ठिकाणी त्यांनी दाखविले आहेत. त्यांची संख्या किती दाखविलेली आहे लक्षावधी दैत्य त्यांच्या सैन्यात होते आणि असे मोठे मोठे सेनापति. त्या सगळ्या सैन्याचा नाश करायचा, सगळ्या दैत्यांचा नाश करायचा म्हणजे हे काय सुखाचं काम आहे का? तर ही सगळीही स्थिती जी आहे त्या स्थितीचा विचार करणारी बुद्धि स्थिर झाली पाहिजे.

**।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।।**

# धर्मे प्रीतिं...

**धर्मे प्रीतिं सन्मतीं देव भक्तिम्।**
**सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम्।**
**भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते।**
**घोरात्कष्टादुद्धरास्मानमस्ते।।**

**तैत्तिरीय उपनिषदांमध्ये** आनंदाची मीमांसा केली आहे. देवांचा आनंद निराळा, मनुष्यांचा आनंद निराळा, गंधर्वांचा निराळा. परंतु हे सर्वही आनंद ज्याचे अंतःकरण निष्काम झालेले आहे, ज्याला पूर्ण ज्ञान झालेले आहे अशा महत् श्रोत्रीय महात्म्याला मिळतात असे सांगतात. पण असा आनंद मला मिळावा अशी ज्याच्या मनात तळमळ निर्माण होईल आणि त्यासाठी जो शास्त्रीय प्रयत्न दृढ बुद्धीने करील त्यालाच तो मिळेल असे म्हटले आहे. नाहीतर देवीसुद्धा स्वतः होऊन कशाला देईल? सक्ती केली तर तो आनंद नको म्हणायची पाळी येते ना!

अर्जुनाने प्रथम श्रीकृष्णांना विश्वरुप दाखवण्याची विनंती केली पण प्रत्यक्ष ते दर्शन झाल्यावर तो घाबरला. त्याला ते तेज सहन झाले नाही आणि त्याने देवाला आपले नेहमीचेच रुप दाखवण्यास सांगितले. आपली जर योग्यता नसेल तर प्रत्यक्ष



ईश्वर दर्शन होऊन सुद्धा एखादा जीव कल्याण करुन घेऊ शकेल की नाही हे सांगता येत नाही.

प्रत्यक्ष गोपालकृष्णांनी उपदेश करुन अर्जुनाला ज्ञान झाले नाही. त्याचा तो प्रासंगिक मोह दूर झाला. कर्तव्याची जाणीव झाली. युद्ध झाले, विजय मिळाला, सगळं झाले. पुढे श्रीकृष्ण निजधामाला गेल्यावर अत्यंत शोकाकुल झाल्यावर अर्जुनाच्या बुद्धीत ते खरं ज्ञान पुन्हा प्रकट झाले.

धर्माचरणाचे फल लगेच मिळत नाही. ताबडतोब कोणचेच फल मिळत नाही. पेरल्या बरोबर लगेच धान्य उगवत नाही. पण काही महिन्यानंतर पीक तयार होईल हा विश्वास आहे. तसे धर्माचरणाचे फळ आपल्याला निश्चित मिळेल असा विश्वास पाहिजे. धैर्य पाहिजे. ज्याच्या मनांत धर्माचरणाबद्दल प्रेम आहे तो, अमुक एक दिवसातच मला फल मिळाले पाहिजे अशा अटी घालत नाही.

एका डॉक्टरचे औषध घेऊन गुण नाही आला तर आम्ही दुसऱ्या डॉक्टरकडे जातो आणि त्याचाही गुण नाही आला तर तिसऱ्याकडे. कारण आमचा ठाम विश्वास कोणावरच नाहीये.

पण असे धर्माच्याबाबत होऊ शकत नाही. शास्त्राने सांगितलेले फल निश्चित मिळते. त्यात अप्रामाण्य असे काहीच नाही. कारण ईश्वराची निर्मिती आहे ना ती! ईश्वर भक्तीने काय काय मिळते याची एक यादीच भगवंतांनी गीतेच्या दहाव्या अध्यायात दिली आहे.

धर्मराजांनी प्रेमाने धर्माचरण केल्यामुळे मोठी धर्मशक्ति त्यांना प्राप्त झाली होती. त्या शक्तीच्यामुळे यक्षाने विचारलेल्या प्रश्नांची विवेकपूर्ण उत्तर देऊन त्याचे समाधान केले व त्यामुळे यक्षाने त्यांच्या चारही भावांना परत जिवंत केले. धर्माचरण

मनःपूर्वक झाल्यामुळे त्या जीवाच्यात एक मोठा विश्वास निर्माण होतो. 'धर्मे प्रीतिं सन्मतीम्..' यात 'धर्मे प्रीति' हे पहिले मागणे त्याकरता आहे. धर्माबद्दल प्रेम निर्माण होऊन धर्माचरण झाले पाहिजे. उपासना याकरता करायची आहे. ज्ञानेश्वर महाराजही तेच मागणे मांगताहेत-जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रति वाढो... सत्कर्माबद्दल प्रेम निर्माण होऊन सत्कर्म घडली पाहिजेत.

एकदा सुकन्या नावांची राजकन्या मैत्रिणींबरोबर फिरत फिरत वनांतल्या एका वारुळाजवळ आली. मोठे वारुळ पाहून तिला आश्चर्य वाटले आणि तिने सहज म्हणून एक काडी त्या वारुळात खुपसली. दुर्दैवाने ते वारुळ च्यवन ऋषींच्या शरीरावर निर्माण झाले होते. दीर्घ काळ ते तप करीत बसले होते. ती काडी नेमकी ऋषींच्या डोळ्यांना लागली आणि ते अंध झाले. सुकन्येला फार पश्चात्ताप झाला. तिने शाप देण्याची प्रार्थना केली. ऋषि म्हणाले,"मी कशाला तुला शाप देऊन माझे तप खर्च करु? तू कर्म केलेले आहेस तुला फळ भोगावे लागेलच." हा एक मोठा सिद्धांत आहे कर्मफलाबद्दल, लक्षात ठेवण्यासारखा आहे. पुढे प्रायश्चित्ताचा भाग म्हणून सुकन्येने त्या अंध च्यवन ऋषींच्याबरोबर विवाह केला आणि सर्व राजसुखे सोडून ती त्यांची सेवा करीत वनांत राहिली. सुकन्या मोठी देवीभक्त होती आणि मनापासून धर्माचरण करुन पतीची सेवा करीत होती. असे करीत असताना एक दिवस अश्विनीकुमारांची तिच्यावर दृष्टी पडली आणि त्यांच्या मनांत तिच्याबद्दल अभिलाषा निर्माण झाली. ते तिला म्हणाले, या अंध पतीची सेवा करण्यात कसले आयुष्य फुकट घालवतेस? आमच्या बरोबर चल. आम्ही तुला पूर्ण सुखी करु.



धर्माचरण करताना असे बुद्धिभेद होण्याचे अनेक प्रसंग येतात आणि काही वेळेला लोकांच्याकडून, आप्तेष्टांकडून होणाऱ्या या बुद्धिभेदाला आपण बळी पडतोही पण तीच वेळ सांभाळण्याची असते.

वनवासात असताना पांडवांच्यावर आलेल्या प्रसंगामुळे द्रौपदीच्या मनांतही, धर्माचरणाचे फळ हेच का, असा संदेह निर्माण व्हायचा. पण धर्मराज तिची समजूत काढीत, ते सांगत, 'फल मिळण्यासाठी मी धर्माचरण करीतच नाही. ईश्वराची आज्ञा म्हणून धर्माचरण करतो आहे.' धर्मराजाच्या या धर्मनिष्ठेचे, ईश्वरावरच्या प्रेमाचे, श्रद्धेचे फल त्यांना शेवटी मिळाले. मनापासून केलेल्या, प्रेमाने केलेल्या धर्माचरणाने धर्मराजाचे आत्मबल वाढले, धैर्य वाढले, ईश्वराबद्दल संदेह निर्माण झाला नाही.

तसेच या सुकन्येचे आहे. अश्विनीकुमारांच्या बोलण्यामध्ये ती संशयात सापडली नाही, तिचा बुद्धिभेद झाला नाही. तिने तर त्यांना तात्काल निघून जाण्याची ताकीद दिली. तेही घाबरले. तिने शापबिप दिला तर या भितीने ते निघून गेले. तिचे धर्माचरणाने मिळालेले सामर्थ्य त्यांच्या लक्षात आले. नंतर सुकन्येने आपल्या पतिला झालेला प्रसंग सांगितला. च्यवन ऋषिंनी अश्विनीकुमारांचे आवाहन केले. ते दोघे ऋषींच्या समोर प्रकटले. ऋषि म्हणाले, ' तुम्हाला देवांच्या यज्ञात सोमरस मिळत नाही. तुम्ही जर माझे अंधत्व नष्ट करून तारुण्य प्राप्त करून दिले तर तुम्हाला मी तो सोमरस मिळण्याची व्यवस्था करतो.' अश्विनीकुमारांनी मान्य केले पण त्यांनी यातले सुकन्येला काहीच सांगितले नाही. तिघे एका जलाशयात जाऊन स्नान करून आले. बाहेर आल्यावर पहातात तो तिघांचे रुप एकसारखे. त्यांनी सुकन्येला सांगितले, 'यातला तुझा पति कोण ते ओळख.' मोठी पंचाईत झाली. जर

ओळखण्यात चूक झाली तर !

पण बुद्धीला प्रेरणा करणारी जी भगवती स्वरुप ईश्वरशक्ती आहे तिची सुकन्या मोठी भक्ति करीत होती, उपासना करीत होती. सुकन्येने त्या भगवतीलाच शरण जाऊन प्रार्थना केली, 'हे माते, आता तूच मला योग्य बुद्धि दिलीस तरच मी ह्या परिक्षेतून पार पडेन.' आणि त्या प्रमाणे त्या जगदंबेच्या प्रेरणेने त्या तिघांतून तिने आपल्या पतीला बरोबर ओळखले.

म्हणजे पूर्वी सुखाच्या मोहाला बळी न पडण्याची बुद्धि आणि आता तिघा एकाच सारख्या दिसणाऱ्यांच्यातून आपल्या पतीला अचूक ओळखण्याची बुद्धि भगवतीच्या उपासनेमुळेच मिळाली याचा मुद्दाम उल्लेख चरित्रकारांनी केला आहे.

सुकन्येच्या पित्याला एकदा एक यज्ञ करण्याची इच्छा झाली म्हणून त्याने च्यवनऋषींना बोलावणे पाठवले. च्यवनऋषींचे वृद्धत्व आणि अंधत्व जाऊन सुकुमार रुप प्राप्त झाल्याचे राजाला काहीच माहीत नव्हते. त्यामुळे जेव्हा च्यवन ऋषि सुकन्येला घेऊन राजवाड्यात आले तेव्हा, आपली मुलगी कोणा एक तरुण परपुरुषाबरोबर पाहिल्यावर त्याच्या मनात तिरस्कार निर्माण झाला आणि तो सुकन्येला म्हणाला,'तूं अशी वागशील याची कल्पना नव्हती. तुझे नांव मी सुकन्या ठेवले तेव्हां तूं नांवाप्रमाणे वागशील याची खात्री होती. तरुण माणसाशीच लग्न करायचे आहे असे जर सांगितले असतेस तर मी तेव्हांच तुझे एखाद्या तरुणाबरोबर लग्न लावून दिले असते.' वगैरे, वगैरे.

एखादी गोष्ट पाहिल्यावर लगेच आपल्या मनावर परिणाम करुन घेऊन उपयोग नाही. परशुराम आपल्या पित्याचे शव आणि मातेला कावडीत घेऊन माहूरला आले. आईने सांगितले होते की जमदग्नींचे और्ध्वदेहिक माहूरला कर तिथे श्रीदत्तात्रेय



स्वतः आचार्य होतील आणि तुला विधी सांगतील.' त्याप्रमाणे ते माहूरला आले. श्रीदत्तात्रेयांच्या दर्शनासाठी गेल्यावर पहातात तो मायामुक्त अवधूत एक सुंदर युवतीला मांडीवर घेऊन प्रणयक्रिडा करताहेत. परशुरामाने नमस्कार करुन येण्याचे कारण सांगितले. श्रीदत्तात्रेय म्हणाले,' या स्त्रीच्या नादी लागलेला भ्रष्ट मनुष्य आहे मी कसा आचार्य होऊ?' परशुरामजी स्वतः अवतार असूनसुद्धा त्या दृश्याला पाहून फसले आणि त्यांच्या मनांत भ्रम निर्माण झाला. मग रेणुकामातेने श्रीदत्तात्रेयांची प्रार्थना केला,'आपण श्रेष्ठ आणि पवित्र आहात. बाह्य दृष्टीने आपण भ्रष्ट भासता. ती स्त्री प्रत्यक्षात नसून आपली माया आहे.' श्रीदत्तमहात्म्यामध्ये ही कथा विस्ताराने आली आहे. पण प्रत्यक्ष असे दृश्य दिसल्यानंतर परशुरामजीसुध्दा संभ्रमात पडले. तसे या राजाचे झाले. त्याला वाटले आपली मुलगी बिघडली. पण मग सुकन्येने आपल्या पित्याला सर्व हकीकत सांगून खुलासा केला.

आचार्य महाराजांनी'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' असे जरी सांगितले असले तरी ती फार पुढची भूमिका आहे. सुरवातीला गृहस्थाश्रमी लोकांना पंचायतनाचीच पूजा सांगितली आहे. स्त्रियांनाही आपल्या इष्ट देवतेची पूजा करायची उपासनामार्गात मोकळीक आहे. ज्या स्वरुपावर आपले मन स्थिर होईल त्या ईश्वरीस्वरुपाची उपासना करायची. पूर्वीच्या काळी आयुर्मर्यादा वाढविण्याचे शास्त्रीय मार्गही ऋषींना माहीत होते. परमेश्वरभक्ति त्यांच्या बुद्धिमध्ये, मनामध्ये निर्माण व्हावी असा ते प्रयत्न करीत आहेत. विरुद्ध वागणारे, ईश्वराबद्दल ज्यांच्या मनामध्ये प्रेम नाही, धर्माबद्दल प्रेम नाही, दया, क्षमा वगैरे हे जे काही महत्वाचे गुण आहेत हे ज्यांच्याजवळ नाहीत, असेही आणखी जीव जन्माला येतात. आणि दोष सगळे दूर करुन त्यांची बुद्धि ईश्वराकडे वळावी.

शरीरामध्ये जे मन आहे ते मात्र राक्षसी आहे. कठोर आहे, निर्दय आहे. अनेक दोष त्या मनामध्ये, बुद्धिमध्ये भरलेले असल्यामुळे लोकांना अत्यंत त्रास त्यांच्याकडून होतो आहे. म्हणून काही सात्विक देव वगैरे असतील, भगवद्भक्त जे असतील मानव त्यांनी ईश्वराची प्रार्थना केल्यानंतर अवतार परमात्मा घेऊन येतो.

महिषासुरमर्दिनी म्हणून जो अवतार झालेला आहे, महालक्ष्मी अवतार आहे. त्या महालक्ष्मी अवताराचे चरित्रही देवीमहात्म्यामध्ये मार्कण्डेय महर्षींनी सांगितलेलं आहे. देवी महात्म्यामध्ये आणि देवी भागवतामध्ये शुंभनिशुंभांचं चरित्र, महिषासुराचं चरित्र हे सगळही आलेलं आहे. देवीची कृपा ज्यांच्यावर झाली ते संकटातून कसे मुक्त झाले हे त्यांनी पुढे मांडलेलं आहे. ती पूजा, ती भक्ति, आपण करावी म्हणजे आपलंही दुरित संपेल. ही दृढ बुद्धि, अशी श्रद्धा, असा विश्वास उत्पन्न होण्याकरता ही चरित्रं आहेत.

ईश्वराची कृपा झाल्यानंतर बुद्धिमध्ये बदल होतो. मानवाला जीवाला जी बुद्धि प्राप्त होती त्याबद्दलचा एक सिद्धांत शास्त्रकारांनी सांगितलेला आहे, "बुद्धि कर्मानुसारिणि" पापकर्म झाली तर तशी तामस बुद्धि राहाणार. पुण्यकर्मं झाली तर चांगली पुण्यकर्माची वासना असणारी बुद्धि मिळणार. कर्माप्रमाणे बुद्धि, मन हे आणखी त्या जीवाच्या बरोबर येतं. म्हणून चांगली कर्मं व्हावी आपल्या मनाने, वाणीने, शरीराने म्हणजे बुद्धि चांगली उत्पन्न होते. तर हा एक सिद्धांत जरी असला तरी दुसरी एक प्रकारची बुद्धि अशी आहे. भगवतगीतेमध्ये भगवान सांगताहेत-

**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते।।**



जीवांना बुद्धि मी देतो म्हणाले. म्हणजे ईश्वराकडून मिळालेली बुद्धीही आहे जीवाकडे. तो जीवात्मा परमेश्वराजवळ जाऊन पोहोचतो, परमेश्वराचं दर्शन त्याला होतं. ईश्वरदत्त बुद्धि आणि आपण केलेल्या कर्माप्रमाणे मिळणारी बुद्धि असे दोन प्रकार बुद्धिचे आहेत. कर्मं चांगली करावी, चांगली बुद्धि घ्यावी, त्या चांगल्या बुद्धिने पुन्हा चांगली कर्मं करावी असा मार्ग ज्यांनी धरलेला आहे, त्यांची प्रगती ईश्वराच्या कृपेनं होईल. कारण पापकर्म होणारच नाही त्यांच्याकडून.

पुण्यकर्म करण्याची बुद्धि ज्यांची आहे, पुण्यकर्म त्यांच्याकडून होत रहाणार, ती बुद्धि तशीच, पुण्यकर्म करणारीच त्यांना मिळणार. शुभ वासनाच बुद्धिमध्ये आहे.

म्हणून महिषासुरासारखे जे असुर उत्पन्न झाले त्यांची जन्मापासून तमोगुणी बुद्धि होती. आणि त्यामुळे सर्वही जीवांना पीडा उत्पन्न झाली म्हणून जगदंबेचा अवतार झाला. सर्व देवांच्या शरीरातून तेज बाहेर पडलं आणि ते सगळं एकत्र होऊन महालक्ष्मीचा अवतार झालेला आहे. म्हणजे महालक्ष्मीचं स्वरुप सर्व देवांचच स्वरुप आहे. देवांची सगळी शक्ती एकत्र होऊन महालक्ष्मी निर्माण झाली. आणि त्या महालक्ष्मीने महिषासुर आणि त्याच्या सहाय्याला असणारे, त्याच्या बरोबर रहाणारे सर्व दैत्य यांचा नाश केला आणि जगाला, सज्जनांना त्याच्या संकटातून मुक्त केले.

म्हणून ही अशी बुद्धि असणारी माणसं त्या वेळेला होती, सगळेच काही महिषासुरासारखे झाले असं नाहीये. चांगली माणसं देव वगैरे होते. आणखी सत्कर्म करणारे, सद्बुद्धि असणारे अशाप्रकारचे असल्यामुळे, त्यांचं संकट दूर करण्याकरता आणखी जगदंबेचा अवतार झाला. म्हणून सद्बुद्धि आपल्याला देवांनी

द्यावी. कर्माप्रमाणे सद्बुद्धि मिळती. पण तशी कर्मं घडली तर मिळेल. तशी सत्कर्मं घडण्याकरता सज्जनांची संगती झाली पाहिजे. सज्जनांच्या संगतीमुळे मनावर परिणाम होऊन आणखी ते जसे वागतात तसे वागण्याची इच्छा उत्पन्न होती आणखी त्याप्रमाणे कर्मंही घडून येतात. म्हणून देवांनी बुद्धि द्यावी, देवापासून बुद्धि प्राप्त व्हावी अशी इच्छा धरून जे देवाची भक्ति करतात, उपासना करतात त्यांना देवही तशी बुद्धि देतात.

## "बुद्धि दे रघुनायका"

समर्थांनी आणखी रघुनायकाची प्रार्थना केली की मला चांगली बुद्धि द्या. देवाने दिलेली बुद्धि, त्या कर्माप्रमाणे मिळणाऱ्या बुद्धिपेक्षा वेगळी असती. ईश्वराचं लक्ष आहे ना! यालाही बुद्धि दिलेली आहे हा चांगला वागतो की नाही हे सगळं तो ईश्वर पहातो. ईश्वरापासून मिळालेल्या बुद्धिने वागणं हे चांगलंच असणार. म्हणून ईश्वराच्या कृपेने आपल्याला चांगली बुद्धि मिळावी, चांगलं मन आमचं तयार व्हावं अशी प्रार्थना करणारे भगवत्‌भक्त हे ईश्वरकृपेने आणखी सर्वही समाजाचे कल्याण करताहेत. सामर्थ्य त्यांना असतं ईश्वराकडून मिळालेलं.

सद्‌गुरू वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी केलेल्या एका स्तोत्रात सद्‌बुद्धिमध्ये कोणचे कोणचे गुण असतात आणि ती बुद्धि देवानी द्यावी म्हणून देवाजवळ काय प्रार्थना करतात ते सांगितलं आहे.

**धर्मे प्रीतिं............घोरात्कष्टात उद्धरास्मान्नमस्ते।।**



हे स्तोत्र प्रसिद्ध आहे. शेवटचा श्लोक आहे. ज्या बुद्धिमध्ये चांगले गुण आहेत, चांगली बुद्धी कोणाला म्हणायचं. ती बुद्धि मागण्यापेक्षा ते गुणच मागितलेले आहेत देवाजवळ. "धर्मे प्रीतिं देही" पहिली मागणी आहे.मनामध्ये धर्माबद्दल अत्यंत प्रेम, श्रद्धा, आदर पाहिजे. प्रेमाने धर्माचरण जर घडले तर त्याचं फळ आपल्या पदरात पडतं. करायचं, लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून चांगलं वागायचं असं नाही. देवाची, ईश्वराची आज्ञा आहे म्हणून आपण जर त्या आज्ञेचं पालन केलं, तसं जर आपण वागलो तर ईश्वराची कृपा आपल्यावर होईल. म्हणून अत्यंत प्रेमाने धर्माचरण झालं पाहिजे. म्हणून पहिली मागणी, पहिला गुण बुद्धिमध्ये हा पाहिजे, धर्मे प्रीतिं देही. नुसतं धर्माचरण घडू दे असं नाही. धर्माबद्दल माझ्या अंतःकरणामध्ये अत्यंत प्रेम, श्रद्धा, आदर निर्माण झाला पाहिजे हा गुण माझ्या बुद्धिमध्ये द्यावा.

ज्ञानेश्वर महाराजांनीही तसंच मागितलेलं आहे.

**"जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रति वाढो।।"**

सत्कर्म करताना अत्यंत प्रेम उत्पन्न झालं पाहिजे. आणि प्रेमांनी सत्कर्म म्हणजे धर्माचरण झालं पाहिजे. जरी असत्कर्म झालं, समजा पाप घडलं, पण ते पाप चांगल्याकरता आहे, धर्म घडावा म्हणून पाप घडलं तर त्याचे फलं वेगळं आहे. कबीरांचं उदाहरण सांगतात ना! कबीरांच्या घरी साधुसंत आले. यांच्या घरात काही नाही. धान्य नाही. काही नाही. त्या साधुसंतांना जेवायला घालायचं दुसऱ्या दिवशी आमंत्रण दिलं होतं. मग हे पिता-पुत्र रात्री दुकानात चोरी करण्याकरता गेले. तो मुलगा आत शिरला. धान्य बिन्य काही असेल मिळालं त्याला. त्याने ते बापाकडे

दिलं. कबीरांनी त्याचे गाठोडं बांधले आणि ते बाहेर यायला लागले. काहीतरी वाजलं. तो मालक जागा झाला. कमाल त्याचं नांव. कमालनी कबीराच्या मुलाचे पाय पकडले. आता हा बाहेर पडू शकत नाही. त्याला जर कमालने ओढून घेतले तर तो त्याला ओळखणार. सगळीकडे सांगणार तो कबीराने चोरी केली. म्हणून त्याने पित्याला सांगितले माझे मस्तक कापून घेऊन जा. कबीरांनीही काही विचार केला नाही. मस्तक कापून घेतलं, घेऊन गेले घरी, धान्याचं गाठोडही घेऊन गेलेले आहेत. दुकानदाराने आत त्याला ओढलं. त्याला मस्तक नाही, कोण चोर? मग त्या धडालाच सुळावर द्यायला सांगितलं. नुसतंच धड होतं. इकडे कबीरांनी सगळ्या संतमहात्म्यांना जेवायला घातलं. मुलगा गेलेला आहे पण मनामध्ये आणखी शोक सगळा आवरुन ठेवूंन कर्तव्य कर्म केलं. अतिथी आपल्या घरी आलेले महात्मे त्यांना जेवण द्यायचं आहे हा धर्म आहे. ईश्वराची आज्ञा आहे "अतिथी देवो भव", तर हा धर्म आपल्या हातून घडावा म्हणून चोरी केली. स्वतःला पोटाला मिळावं म्हणून चोरी केली नाही. हा एक विचार आहे. पण तोही धर्म चांगला घडावा, मध्ये काही विघ्न येऊ नये म्हणून मुलाचं मस्तकही तोडून घेऊन गेले. ही मनाची केवढी तयारी आहे! मुलगा सापडला असता तर ते सगळं धान्यही गेलं असतं. कबीरांनाही तुरुंगात जावं लागलं असतं.

तर धर्माचरण आपल्या हातून ईश्वरानी सांगितल्याप्रमाणे झालं पाहिजे ही आवड आहे, धर्माबद्दल प्रेम आहे, त्या प्रेमामुळे आणखी ही चोरीही घडली. मुलाचं मस्तकही तोडलं. सगळ्या साधुसंताच्या कृपेने तो मुलगा जिवंत झाला ही गोष्ट निराळी. तर हा गुण आपल्या बुद्धिमध्ये असेल तर ती बुद्धि चांगली



आहे. ईश्वराचे त्याच्याकडे लक्ष आहे. ईश्वरानी दिलेली बुद्धि कोणची म्हणायची तर ज्या बुद्धिमध्ये, ज्या मनामध्ये, धर्माचरणाकरता अत्यंत प्रेम वाटतंय, आदराने धर्माचरण होतंय ती बुद्धि!

"सन्मतिं देही", "धर्मे प्रीतिं देही" हे पहिले मागणे आहे, पहिला गुण आहे. धर्माबद्दल अत्यंत प्रेम अंतःकरणामध्ये उत्पन्न झालं पाहिजे तर ती देवानी दिलेली बुद्धि असे म्हणतात. ईश्वराची भक्ति माझ्या मनामध्ये असू दे, ईश्वराबद्दल प्रेम असू दे. धर्माबद्दलही प्रेम पाहिजे आणि ईश्वराबद्दलही प्रेम पाहिजे. ईश्वराबद्दल अंतःकरणामध्ये भक्ति, प्रेम ज्यांच्या मनात उत्पन्न झालेले आहे ते ईश्वराच्या कृपेने निर्भय राहू शकतात. म्हणून ईश्वरभक्तिची प्रार्थना मुद्दाम केली. ईश्वरभक्ति हाही देवानी दिलेला गुण आहे. देवानी दिलेली बुद्धि कशी आहे, ज्या बुद्धिमध्ये ईश्वराची भक्ति आहे, ईश्वराबद्दल प्रेम आहे. ही देवाने दिलेली बुद्धि. शुक्राचार्यासारखे ज्ञानी महात्मे जे आहेत तेही ईश्वराची भक्ति करतात आणि संसारी जीव तर पुष्कळ आहेत सगळे ईश्वराची भक्ति करतात. संसार हा सुखाचा व्हावा या उद्देशाने भक्ति करणारे आहेत की अर्थार्थी भक्त त्यांना म्हणतात. पण तोही चांगला आहे. माझ्याकडे मागायला येतो ना. दुसरीकडे जात नाही त्याची निष्ठा चांगली आहे देव त्याला काही नावं ठेवत नाही. सारखे मागतो असं म्हणत नाहीत. तर असे जे सर्व प्रकारचे लोक संसारी आहेत, मुमुक्षु आहेत, मुक्त झालेले ज्ञानी महात्मे आहेत. देवाची भक्ति करतात त्यामुळे अंतःकरणामध्ये समाधान आहे. देवभक्ति ज्या मनामध्ये, बुद्धिमध्ये आहे ती देवानी दिलेली बुद्धि आहे हा एक गुण आहे. "सत्संगाप्तिं देहि" सत्संगति आपल्याला मिळावी, ती करावी असं मनामध्ये वाटलं

पाहिजे. संत महात्मे काय सांगताहेत. त्यांचं मार्गदर्शन आपल्याला मिळावं हे ज्या बुद्धिला वाटतं अशी बुद्धि म्हणजे ईश्वरानी दिलेली बुद्धि. संतांना मान देणं, संतांच्याबद्दल आदरार्थी प्रेम निर्माण होणं महत्वाचं आहे. धर्माबद्दल प्रेम पाहिजे. ईश्वराबद्दल प्रेम पाहिजे, संतमहात्म्यांबद्दल प्रेम पाहिजे. तर ती बुद्धि चांगली आहे. संतमहात्म्यांच्याबद्दल केव्हां प्रेम उत्पन्न होईल? मी मोठा आहे. माझी बुद्धि चांगली आहे. मला सगळा विचार करता येतो, माझ्या बुद्धिने मी सगळी कार्य करू शकतो. असा अभिमान ज्याच्या मनामध्ये राहिलेला नाही त्याला संतमहात्म्यांबद्दल प्रेम वाटते. नाहीतर तेही आमच्याप्रमाणे मनुष्यच आहेत. आम्ही माणूस, तेही माणूस त्यांच्याबद्दल आणखी इतकं प्रेम कशाला, आदरभाव कशाला पाहिजे? असे बुद्धिला वाटून उपयोग नाही. योग्य मार्गदर्शन करणाऱ्याबद्दलही अत्यंत प्रेम निर्माण झालं पाहिजे. ही बुद्धि आणखी चांगली बुद्धि आहे. "सत्संगाप्तिं देही आणि भुक्तिं च मुक्तिम्" भुक्ति म्हणजे भोग, संसार. संसारही आम्हाला द्या म्हणतात. ही बुद्धि चांगलीच आहे. ईश्वराच्याजवळ आणखी मागतो आहे. संसार द्या म्हणून. आणि ईश्वर संसार देतोच आहे.

संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागून चांगली कर्मे जर घडली तरी संसार हा सुखाचा होतो. परमार्थही सुखाचा होतो. पण ईश्वराचीच प्रार्थना तो करतो आहे की "भुक्तिम् देहि" विषयभोग म्हणजे संसार मला चांगला पाहिजे आहे. हे देवाजवळ मागणे हीसुद्धा चांगली बुद्धि म्हणतात. "आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, ज्ञानींच भरतर्षभ" चार भक्त सांगितले भगवंतांनी. आर्त म्हणजे अगदी संकटात सापडलेला, जिज्ञासू जो आहे त्याला काय आहे, सृष्टीकर्ता कोण आहे, हे कळावं अशी इच्छा आहे. तिसरा अर्थार्थी भक्त



आहे. आपल्या संसारात हे कमी आहे मागायचं देवाला, सांगायचंय हे आम्हाला द्या. ते द्या. आणि चौथा ज्ञानी आहे. तर आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी म्हणजे मागणारा देवाला याबद्दल सुद्धा भगवान सांगताहेत.

**चतुर्विधा भजन्ते माम जनानां सुकृतेर्जुन ।।**

हे चौघेही भजन करणारे भक्त हे सुकृती म्हणजे पुण्यवान आहेत.

पुण्यकर्म झाल्याशिवाय आणखी देवाकडे जाण्याची इच्छा होत नाही. अहंकार आहे. संतांकडे, महात्म्यांकडे जाण्याची इच्छा होत नाही. अहंकारामध्येच त्यांची बुद्धि वाहून जाती, पण ईश्वराकडे सर्व समर्थ तो आहे. एवढी मोठी सृष्टी ज्याने निर्माण केली त्याच्याजवळ मागण्याची लाज कशाला पाहिजे? तो काय असमर्थ नाहीये. काहीही मागितलं तरी देण्याचं सामर्थ्य आहे ना!

संसारामध्ये जे जे कमी आहे ते देवाजवळ सांगायचं तुम्हीच. संसारी आहात. तुमचा संसार आहे. 'हा संसार, ह्याच्यामध्ये हा कमीपणा आहे. एवढा भरून काढा, पूर्ण करा.' असं देवाजवळ देवाला बोलायला सांगायला काय हरकत आहे? कारण देवाजवळ शक्ति नाही असं नाही. कोणतीही शक्ति आहे. म्हणजे संसारामध्ये असलेली जी न्यूनता आहे ती न्यूनता भरून काढण्याकरता ईश्वराची प्रार्थना करणं चांगलं, का आपल्याला आपल्या संसारातील पैसा कमी आहे, दुसऱ्याच्या पैशाचे हरण करणे किंवा पापकर्म करून पैसा मिळवणे चांगले? मुलगा गेलेला तर मिळणे शक्यच नाही. कितीही बुद्धि तुमची चांगली असो, सत्ता असो, सामर्थ्य तुमच्या जवळ पुष्कळ असले तरीही मेलेला मुलगा कोणी परत

आणू शकणार नाही. ते देवाजवळच मागायला पाहिजे. त्यांची श्रद्धा आहे. सांदिपनी गुरुमहाराज त्यांचे गुरु होते तरी श्रीकृष्ण म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आहेत याची जाणीव त्यांना आहे, हा सामान्य मानव नाहीये, हे मनामध्ये अत्यंत आणखी घोळत असल्यामुळेच श्रद्धेनेच त्यांनी मागितलं आहे. देव काही असमर्थ नाही. मुलगा गेलेला आहे कसा आणू, म्हणून काही देवांनी सांगितलं नाही. आणून दिला लगेच म्हणून संसाराबद्दलसुद्धा ईश्वराला सांगायला हरकत नाही.

कर्माप्रमाणे संसारामध्ये सर्व सुख-दुःख प्राप्त होतात. ईश्वराचा तो नियम आहे. कायदा आहे. जशी कर्म केली त्याप्रमाणे सुख-दुःख मिळणार आणि पण तो जो सृष्टीकर्ता आहे त्यालाच जर सांगितलं, त्याच्या जवळ गाऱ्हाणे गायले, तर तो कर्माकर्माचा विचार करु शकतो. न्यायाधीश उत्तम बुद्धिमान आहे, त्याला प्रार्थना केली तर अपराध्याचा दोष जरी असला तरी तो बाजूला करुन त्याला निर्दोष तो सोडतो. त्याच्याजवळ बुद्धिमत्ता आहे, तसं त्याच्या कर्मामध्ये कमीजास्त काय आहे हे पहाण्याचं कामसुद्धा ईश्वर करतो. 'कर्माप्रमाणे आणखी तुला फल प्राप्त होईल,' असं सांगून ईश्वर काही निराश करत नाही आपल्या भक्ताला. म्हणून भुक्तिच देहि मागा म्हणतात. पण तो जो मिळालेला संसार आहे ईश्वराच्या कृपेने जर पूर्ण झाला तर त्याचा उपयोग इतरांनासुद्धा होऊ शकतो अशी बुद्धिही त्याच्याबरोबर देव देतो ना! धर्मप्रेम दिलेले आहे. ईश्वराबद्दलची भक्तीही आहे. साधूसंतांच्याबद्दल अंतःकरणामध्ये प्रेम, आदर आहे. हे सगळं ज्यांनी दिलं त्यांनी संसार दिला. पूर्ण संसार आहे, सबंध संसार असताना ह्याला अहंकार कसा होईल? हे सगळे गुण ज्यांनी बुद्धिमध्ये दिले आणि शेवटी मुक्ति. मुक्ति म्हणजे सर्वही दुःखांचा



कायमचा नाश होणे. ही मुक्ति मागतात. सर्वही दुःखं कायमची गेली पाहिजेत.

नैसर्गिक आपत्ती आली, घरं वाहून गेली, पाऊस कोसळला, तात्पुरतं आणखी आणून तेवढ्यापुरती घरं लावली, सगळं झालं. पण अशी आपत्ती कधीही येऊ नये ही इच्छा चांगली. ही सगळी आधिदैविक दुःखं आहेत. आधिभौतिक दुःखं आहेत. आध्यात्मिक दुःखं आहेत. चालू असतात. सारखी दुःखं एक ना दोन चालू असतात. ही सगळीही दुःखं संपून गेली पाहिजेत. त्याला मुक्ति म्हणतात. आणि ही स्थिती, सर्व दुःखं कायमची जाणं, इथे शरीराचा संबंध संपलेला आहे. जन्ममृत्यू संपले आहेत. पुन्हा शरीराचा संबंध या जीवाला नाही. पूर्वीच्या कर्माप्रमाणे शरीर मिळालेलं आहे. शरीर घ्यावंच लागतं म्हणजे जन्माला जावंच लागतं. शरीराचा संबंध आल्याबरोबर आणखी सुखदुःखाची संवेदना होऊ लागते. तेही अपरिहार्य आहे. सर्व दुःखं कायमची जायची, याचा अर्थ शरीराचा संबंध कायमचा सुटला पाहिजे. पुन्हा शरीरामध्ये जीवात्मा नाही. शरीराशी कायमचा संबंध सुटणे हे झाल्याशिवाय सर्व दुःखांची निवृत्ति म्हणजे मुक्तिही प्राप्त होणार नाही. हे अत्यंत मोठं अशक्य कर्म आहे. किती काल लागेल याचा नेम नाही, किती जन्म घ्यावे लागतील काहीही सांगता यायचं नाही. असं मोठं आहे ते. चुकीचं मागणं देवाजवळ मागायचं. आपण मुक्त व्हावं अशी तळमळ मनामध्ये उत्पन्न झाली म्हणजे सगळी साधना करतात, काही अनुष्ठानं करतात. ईश्वरकृपेने सर्व दुःखातूनही पूर्ण मुक्त होतात. ही मुक्तिची इच्छा म्हणजे सर्व दुःखातून आपण मोकळं झालं पाहिजे. ही इच्छा सुद्धा आणखी मनामध्ये बुद्धिमध्ये असणं हीसुद्धा ईश्वराची कृपा आहे.

शेवटी सांगतायत "भावासक्ति" हा मोठा गुण आहे. भाव म्हणजे परमेश्वराबद्दल अत्यंत प्रेम. तिकडेच आणखी मन आसक्त आहे. संसारातल्या आणखी पदार्थांची आसक्ति सोडावी. आणखी ईश्वराबद्दलच्या प्रेमाची आसक्ति मिळावी. ज्याच्या अंतःकरणामध्ये ईश्वरप्रेम निरंतर राहिलेले आहे, त्यांचं मन संसारामध्ये कधी जात नाही.सांसारिक अनुकूल प्रतिकूल घटना अनेक जरी घडत असल्या नेहमी, तरीसुद्धा अंतःकरणामध्ये ईश्वरप्रेमाची आसक्ति आहे. ईश्वरप्रेम अखंड रहावं, जास्तीत जास्त रहावं, सर्वच रुपं ईश्वराची आहेत. जगदंबेचं रुप आहे ती जगन्माता आहे. त्या मातृरुपाने आणखी जगदंबेची भक्ति करणारे जे आहेत देवीभक्त ते प्रेम त्यांच्या अंतःकरणामध्ये उत्पन्न झाल्यानंतर त्यांचे दुसरीकडे लक्षच नाहीये. कर्माप्रमाणे जशी जशी सुखदुःखं मिळायची असतील तशी मिळतात. जातात. ईश्वरप्रेमामध्ये, जगदंबेच्या प्रेमामध्ये, ज्यांचे अंतःकरण स्थिर होतं त्याला संसारातील कोणतेही आघात सहन करायचे धैर्य उत्पन्न होते. त्या प्रेमामुळे तर हे गुण आहेत.

धर्मप्रेम पहिले. सन्मती म्हणजे त्यामध्ये अनेक गुणांचा अंतर्भाव आहे. शांत बुद्धि रहाणं, सहनशील बुद्धि रहाणं, आपल्याप्रमाणे सर्वांचहही कल्याण व्हावं अशी बुद्धि राहाणं हे सगळे गुण सन्मतीमध्ये येतात. भक्ति देवभक्ति हाही मोठा गुण आहे. संतांच्याबद्दल आदरबुद्धि उत्पन्न होणं हाही गुण आहे. त्यानंतर संसार मागतो आहे. पण देवाजवळ संसार मागतो आहे. ईश्वरापासूनच आपल्याला संसार मिळावा. शंकराचार्य महाराजांच्या चरित्रामध्ये जगदंबेबद्दल किती प्रेम त्यांच्या अंतःकरणामध्ये होते, याबद्दल एक कथा आलेली आहे. एक गाव केरळ देशामध्ये आहे. त्या गावाचे नाव कालडी म्हणून आहे. त्या कालडी गावामध्ये शंकराचार्यांचा जन्म झाला. त्यांचे



मातापिता दोघेही शिवभक्त. शंकरांची उपासना करताहेत. तपश्चर्या चालू आहे म्हणून भगवान शंकर त्यांच्या पोटी जन्माला आले. दोन-तीन वर्षं त्यांच्या वयाला झाली. सगळी विद्या, सगळं त्यांना जन्मतःच प्राप्त होतं. ज्या बुद्धिमध्ये असे सगळेही ईश्वरदत्त गुण आहेत अशी दैवी संपत्ती घेऊन ते जन्माला आलेले आहेत. घराजवळ देवीचं एक मंदिर होतं. त्या मंदिरामध्ये आणखी आचार्य महाराजांचे पिताजी रोज पूजा करून यायचे. आणि दूध आणून बालशंकराला द्यायचे. देवीचा प्रसाद घे म्हणायचे. दररोज त्यांना मिळत असे. एके दिवशी त्यांना आणखी परगावी जायचे असल्यामुळे त्यांनी यांना सांगितलं, शंकरांना. 'बाळ शंकरा, उद्या तू जाऊन देवीची पूजा करून ये.' हे सुद्धा केव्हां केव्हां जात होते मंदिरात. घरातही आपले पिताजी पूजा कशी करतात ते पाहात होते. दुसरे दिवशी पिताजी गावाला गेले आणखी बाळ शंकर आईनं ताटामध्ये दिलेली सगळी पूजा सामुग्री घेऊन निघाले. फुलं आहेत, हळदी कुंकू आहे, धूप, दीप, नैवेद्य सगळं आहे. ते आले घेऊन. जगदंबेला आणखी स्नान घातलेलं आहे. पुसलेले आहे. ती एक अचेतन मूर्ति आहे ही भावना नाही. जगन्माताच या ठिकाणी आहे. हळदी कुंकू लावलं, फुलाची माळ घातली गळ्यामध्ये. निरांजन लावलेले आहे. धूप दीप झाला. नैवेद्याची आणखी दुधाची वाटी पुढे ठेवलेली आहे आणि प्रार्थना केली. 'घ्या आईसाहेब, दूध घ्या.' ही भावासक्ति आहे. आणि अत्यंत प्रेमाने जगदंबेची प्रार्थना करताहेत. आता कसं कोण दूध घेणार? त्यांना तर वाटतंय देवी आहे, इथेच आई आहे, इथेच. आणि मी इतकी प्रार्थना करतो आहे परंतु ही काही दूध घेईना. म्हणून रडायला लागले. काय झालं असेल. पिताजी पूजा करीत असतील त्यांना सगळं ज्ञान आहे. मंत्र तंत्र सगळं

त्यांना माहिती आहे, मला माहिती नाही. माझ्या हातून काय चूक झाली असेल तर क्षमा करावी माताजी. माझी पूजा बरोबर झाली नाही म्हणून रागावून कसं होईल म्हणाले, हे प्रेमाने आणखी सांगतायत,'घ्या दूध.'

अतिशय रडायला लागल्यानंतर जगदंबा प्रगट झालेली आहे. तो दुधाचा प्याला लावला ओठाला. सबंध दूध पिऊन टाकलं. आणि वाटी ठेवली. आचार्य महाराजांनी हे पाहिलं. आणि जास्तीच रडायला सुरवात केली. जगन्माता म्हणाली,"बाळ, काय झालं? तुझ्या इच्छेप्रमाणे मी दूध प्याले आणि रडतोस काय?" शंकराचार्य महाराज म्हणताहेत, बालबुद्धि आहे. शुद्धबुद्धि आहे. अंतःकरणामध्ये कोणत्याही प्रकारचा विकार नाही. ईश्वरसाक्षात्कार झालेला आहे. ब्रह्मज्ञान झाल्यानंतर त्यांनी कसं वागावं तर बालबुद्धिने वागावं म्हणून सांगताहेत. अगदी निर्विकार अंतःकरण बालकांचं असतं, तसं आचार्य महाराज म्हणाले,"आईसाहेब, सगळं दूध तुम्ही प्यायलं! अहो रोज आमचे पिताजी तुमची पूजा करून यायचे आणि घरी आल्यानंतर दूध द्यायचे. हे आईचा प्रसाद आहे म्हणून सांगायचे. मला आधी वाटायचं माझी आई किती दयाळू आहे. प्रेमळ आहे. सगळं दूध पीत नाही. माझ्याकरता थोडं दूध शिल्लक ठेवते. असं म्हणून मला सुद्धा अत्यंत प्रेम तुमच्या बद्दल वाटायचं. आज इतका वेळ मी रडलो आणखी तुम्ही सगळं दूध पिऊन टाकलंत? थोडंसुद्धा शिल्लक ठेवलं नाही? शुद्ध बुद्धि आहे. भावासक्तिच आहे. देवीला दोष दिला नाही त्यांनी पण आई म्हणून त्यांनी आणखी सांगितलेलं आहे, हे आईला वागणं शोभतं का? सगळं दूध ...... रोज पाठवून देत होतात आणि आज सगळं कसं प्यायलात? मग आपल्या स्तनातून त्या पात्रामध्ये दूध काढलं



जगदंबेने आणि ते आचार्य महाराजांना प्यायला दिलं. आचार्य महाराजांनी स्तुति केली त्यावेळेला सौंदर्यलहरी मध्ये हा श्लोक आहे.

**तव स्तन्यं मन्ये धरणीधरकन्ये हृदयतः।**
**पयः पारावारः परिवहति सारस्वतमिव।**
**दयावत्या दत्तं द्रविडशिशुरास्वाद्य तवयत्।**
**कवीनां प्रौढानं अजनिकमनीयः कवयितः।।**

आई! हे जे तुझे दूध आहे ते सामान्य दूध नाही. तुझे हे पूर्ण ज्ञानरुप दूध मी प्यायलो त्यामुळे आज जगामध्ये मोठे मोठे जे काही ज्ञानी म्हणून समजले गेलेले लोक आहेत त्यांनासुद्धा मी मान्य ठरलेलो आहे. तो तुझ्या दुधाचा परिणाम आहे. "भावासक्ति चाखिलान्दमूर्ते" जगदंबेच्याबद्दल अंतःकरणामध्ये अत्यंत प्रेम आहे. नितांत प्रेम आहे आणि ते अधिकाधिक वाढले पाहिजे याकरता सगळी प्रार्थना, सेवा ही त्याकरताच आहे.

आचार्य महाराजांनी संन्यास जरी घेतला असला तरी अंतःकरणामध्ये ही जगन्मातेची भक्ति आहे. सर्वस्वरुप ईश्वराची जेवढी रुपं आहेत त्या प्रत्येक स्वरुपाबद्दल त्यांच्या चित्तामध्ये तितकच प्रेम आहे. गणेश आहे त्याचप्रमाणे आणखी विष्णू आहे, शंकर आहे, सूर्यनारायण आहे, देवी आहे. सर्वांची स्तोत्रं आणखी आचार्य महाराजांनी केलेली इतकी आणखी सरस स्तोत्रं आहेत की, वाचता वाचता अंतःकरणामध्ये अत्यंत स्थिरता निर्माण होते. शांत अंतःकरण आहे. सर्व विकार निघून जातात. सगळीच ईश्वराची रूपं आहेत. तर जगन्मातेची भक्ति लहानपणापासूनच त्यांना होती. आणि त्या भक्तीच्या योगाने

त्यांना ते दूध म्हणजे साक्षात ज्ञान, सगळं मिळालेलं आहे. आणि त्यांनीही कबूल केलं. माझी योग्यता नाही म्हणाले. जगन्मान्य मी झालो. सगळं जग माझी आणखी स्तुती करतंय, हा तुझ्या दुधाचा प्रभाव आहे.

तर आपल्या मनामध्ये, बुद्धिमध्ये असे गुण मिळावे. कर्माप्रमाणे येणाऱ्या बुद्धिमध्ये चांगले गुण असतील असे नाही. चांगली कर्मं घडलेली असतील तर चांगले गुण मनामध्ये, बुद्धिमध्ये उत्पन्न होतील. आणि त्याप्रमाणे पुन्हा पुढेही चांगली कर्मं घडतील. ईश्वराने अशी बुद्धि द्यावी म्हणून त्याच्याजवळ प्रार्थना केली पाहिजे.

**धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिम् सत्संगाप्तिं देहि भुक्तिं चमुक्तिम्**
**भावासक्तिं चाखिलानन्दमूर्ते घोरात्कष्टादुध्दरास्मान्नमस्ते**

सगळेही गुण आमच्या बुद्धिमध्ये, मनामध्ये असावेत अशी ईश्वराजवळ, जगदंबेजवळ प्रार्थना करायची आहे. म्हणजे तीच अशाप्रकारच्या बुद्धिरुपाने आपल्या बुद्धिमध्ये आणखी येऊन रहाणार आहे. असे उत्तम गुण अंतःकरणामध्ये, बुद्धिमध्ये, मनामध्ये उत्पन्न झाले ईश्वराच्या कृपेने, तर सर्वही संसार जो आहे तो अत्यंत कष्टाचा आहे, त्या कष्ट दशेपासून मानव मुक्त होईल. सर्वही दुःखं त्याची कायमची आणखी निघून जातात. काहीही दुःख शेवट शिल्लक राहात नाही. तोच जन्म त्याचा शेवटचा ठरतो आहे. पुढचा जन्म नाही. पुढचं शरीर नाही. काही नाही. सर्व कर्मं संपून जातायत. ही ईश्वराची कृपा होती आहे आपल्यावर.

याकरता 'आई ह्या रुपाने आणखी ईश्वराची उपासना जर झाली जगदंबेची उपासना, तर त्यामध्ये आणखी पूर्ण प्रेम आहे.



भक्ताच्या मनामध्येही बालकाच्या मनामध्येही आईबद्दल प्रेम आहेच. पण आईच्या मनामध्येही त्या बालकाबद्दल प्रेम आहे. म्हणून बाह्य, बाकीच्या रुपापेक्षा मातृरुपाने जगन्माता भगवतीची उपासना, ईश्वर उपासना ही करावी असे मुद्दाम सांगितलेले आहे.

## कलौ चंडीविनायकौ

कलियुगामध्ये विनायकांची उपासना आलेली आहे. आणि चंडी भगवती जी आहे, जगदंबा आहे, त्या जगदंबेची उपासना आहे. आणि फलप्राप्ती त्याच्यापासून आहे. भारतवर्षामध्ये अशाप्रकारचे महात्मे पुष्कळ झालेले आहेत. मार्गदर्शन करणारे आहेत.अद्यापिसुद्धा दक्षिणेकडे, उत्तरेकडे देवीभक्ति जास्तीत जास्त आहे. शतचंडी, सहस्त्रचंडी वगैरे मोठी मोठी अनुष्ठानं होत असतात. वेदमार्ग आणि तंत्रमार्ग दोन्ही मिळून आहे. केवळ तंत्रमार्गानेही आणखी उपासनाही चालू आहे. वेदोक्त मार्गाप्रमाणे, तंत्रमार्गाप्रमाणे मिळून सुद्धा ही उपासना चालू आहे. तर त्या उपासनेची पद्धती पुष्कळ विशाल आहेत. कशी देवाचा भक्ति करायची? काय करायचं? याचा विचार करणारी मंडळीही पुष्कळ आहेत. आणि यथाविधी त्यांची पूजा अर्चाही हे लोक करत असतात. पण आचार्य महाराजांच्या बुद्धिप्रमाणे बुद्धि ठेवून जरी पूजा झाली तर त्याच्या न्यूनाधिकतेविषयी देवी पहात नाही. 'माझ्या प्रेमाकडेच तिचे जास्त लक्ष आहे.' त्यामुळे काहीही जरी चूक झाली तरी तिकडे काही लक्ष रहाणार नाही. आई म्हणून आपण पूजा करणार मग आई सगळे अपराध क्षमा केल्याशिवाय कशी राहील. अशी भक्ताची बुद्धि असते म्हणून भारतवर्षामध्ये सर्वांना उद्धाराचा मार्ग म्हणजे हा भक्तिमार्ग आहे.

संतांनी हा मार्ग दाखिवलेला आहे. स्वतः त्या प्रमाणे भक्तिमार्गाने गेलेले आहेत. आचरण केलेले आहे. भगवंताच्याबद्दल प्रेम अंतःकरणामध्ये जास्तीत जास्त वाढवण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. आणि सर्वही लोकांच्या पुढे हा मार्ग कसा सरळ आहे हे समजावून दिले आहे. ईश्वर समर्थ आहे तेव्हां अशीही भक्ति अंतःकरणामध्ये आपल्या वाढावी याकरता आणखी प्रयत्न करायचा आहे. ईश्वराने अशी भक्ति आपल्या बुद्धिमध्ये ठेवावी. अशी बुद्धि देवापासून आपल्याला मिळावी ही प्रार्थना आहे.

**।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।।**

# भूतां परस्परे पडो। मैत्र जीवांचे।

**या श्रीः स्वयं सुकृतीनां भवनेष्व लक्ष्मीः**
**पापात्मनां कृतधियां ह्रदयेषु बुद्धिः**
**श्रद्धा सतां कुलजन प्रभवस्य लज्जा**
**तां त्वां नतास्मपरिपालय देवी विश्वम्।**

**दैवी प्रकृतीचे** हे मुख्य लक्षण आहे. ईश्वरशक्तीवरती पूर्ण विश्वास असणे. अनुकूल परिस्थितीमध्येही पाहिजे, तो कदाचित कमी जास्ती होतो. पण प्रतिकूल परिस्थितीमध्ये मात्र निराश न होता ईश्वरशक्तीवर पूर्ण विश्वास ठेवून जर प्रार्थना अशा प्रकारची झाली तर त्या प्रार्थनेने कार्य होते. हा अनुभव सांगण्याकरता म्हणून अशा प्रकारची पुराणे मार्कंडेयांसारख्या ऋषींनी लिहिलेली आहेत. निरनिराळ्या पुराणातून अशा प्रकारच्या कथा ज्या आलेल्या आहेत त्या दृष्टीने आलेल्या आहेत. पुढचे जे जीवात्मे आहेत जन्माला आलेले, त्यांची बुद्धि चांगली बनविण्याकरता, आयुष्य असेपर्यंत जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे. बुद्धीची सुधारणा करण्याकरता मनुष्य जन्म आहे. पशुपक्षांच्या जन्मामध्ये ती कल्पनाच नाहीये. गुणदोषाची कल्पनाही त्यांना नाहीये. ही कल्पना फक्त आणखी मनुष्याला दिलेल्या बुद्धीमध्ये येती. पण असेनात, चांगलं वाईट जरी आणखी आपल्याला कळलं तरी आपण चांगलंच आचरण करतो असं नाहीये. राजस, तामस, संस्कार प्रकृती, ती प्रकृती आणखी बदलली पाहिजे आपली आणि त्याकरता प्रयत्न झाला पाहिजे. त्या प्रयत्नांमध्ये यश येण्याकरता

म्हणून आणखी जगन्मातेची प्रार्थना ही करायची आहे. देवांनी प्रार्थना केली आणखी ते कृतकृत्य झाले. त्यांचे कार्य होऊन गेले आणखी पुन्हा पूर्वीप्रमाणे त्यांना त्यांचे त्रैलोक्य मिळाले, त्यांचे अधिकार मिळाले, सर्व झालं. माँ सरस्वतीचं वर्णन करताना आणखी मार्कंडेय ऋषींनी सांगितले आहे की माँ सरस्वतीची जर पूजा, आराधना, उपासना झाली तर ही देवी ब्रह्मरुप परमात्म्याचे ज्ञान करुन देणारी आहे.

पुण्यवान लोक जे आहेत त्या पुण्यवान लोकांना पाहिल्यानंतर मनाला समाधान वाटलं पाहिजे. हा एक मनाचा, मनाला शांती समाधान मिळण्याचा उपाय योगसूत्रकारांनी सांगितला आहे. सुखी मनुष्याला पाहिल्याबरोबर त्याच्याबद्दल आनंद वाटला पाहिजे. पुण्यवान लोक आहेत. पुण्य करणारे लोक आहेत. पुण्याची इच्छासुध्दा होत नाही माणसाला, पण इच्छा उत्पन्न होऊन त्याप्रमाणे पुण्यकर्म घडावं अशी जगदंबेची प्रार्थना करुन आणखी त्याप्रमाणे पुण्यकर्म पूर्ण करणारी मंडळी आहेत. त्यांना पाहून आणखी मुदिता, म्हणजे आनंद वाटला पाहिजे आपल्या मनाला हा एक अभ्यास आहे. आपल्याकडून पुण्य होत नाही, पण ते पुण्य करतायत त्यांना पाहून आनंद वाटणे म्हणजे मन तयार होणे, मनाचा बुद्धीचा उत्कर्ष हा या ठिकाणी आहे. पापकर्म करणारे, त्यांच्याबद्दल रागावण्यातही अर्थ नाही. भ्रष्टाचार झाला, अमुक झालं तरी रागावून काय करायचं? होणारंच तो, चालायचच. त्याच्याबद्दल उपेक्षा करायची. सांगून पहायचं. नाही ऐकलं तर नाही ऐकलं, त्याचं काय? जर त्याच्याबद्दल रागावून म्हणा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला म्हणजे काय? अशांती होणार. म्हणून पुण्यकर्म करणाऱ्यांच्याबद्दल आनंद बुद्धीला वाटला पाहिजे. पापकर्म करणारे जे आहेत त्यांच्याबद्दल उपेक्षा वृत्तीचा अभ्यास



करायला पाहिजे. सुखी जे लोक आहेत, पूर्व पुण्य करुन आलेले आणखी सध्या सुखामध्ये असलेले, त्यांच्याशी मैत्रीने वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा आपला मित्रच आहे. दुर्योधनाला ते सहज साध्य झालं नाही. पांडव सुखी होते. स्वतःच्या पराक्रमाने आणि ईश्वरी कृपेने स्वतःबद्दल लोकांच्या मनामध्ये त्यांनी आदरबुद्धी निर्माण केली होती. त्याबद्दल आणखी मैत्रीनं राहिला असता दुर्योधन, तर किती चांगलं झालं असतं! त्यालाच राजा केले असते. रामचंद्रांनी सगळ्या भावांनाच मोठेपणा दिला. तुम्हीच हे करत चला. मी नामधारी राजा आहे म्हणाले, तुम्हीच खरे राजे आहात. असे हे कौशल्य आहे. तर तो तसा वागला नाही. सुखी मनुष्याला पाहिल्याबरोबर तो आपला मित्रच आहे, आपलाच आहे हा जर अभ्यास झाला तर मन चांगलं तयार होतं. आपली नोकरी संपली बाबा. आता पगार मिळत नाही. पण मुलांना नोकरी लागल्याबरोबर आनंद होतो की नाही? मुलगा म्हणजे काय हा आहे का स्वतः? स्वतःची नोकरी गेलेली आहे तरी आपल्या मुलाला नोकरी लागली आणि मुलाला पैसा मिळतो आहे याचा आनंद वाटतो की नाही आपल्याला तसाच कोणीही जगामध्ये सुखी असलेला, आपल्या पुण्य उत्कर्षानी जर त्याला सुख मिळत असेल तर त्याला पाहून मैत्री उत्पन्न झाली पाहिजे.

आपल्याला मत्सर उत्पन्न होऊन उपयोग नाही. " त्याचे सुख घालविलं पाहिजे," अशा प्रकारची इच्छा उत्पन्न झाली कौरवांना, त्यामुळे सर्वनाश झाला. तर अशाप्रकारचे हे अभ्यासही योगशात्रकारांनी सांगितलेले आहेत. मन हे शांत, समाधानयुक्त अशाप्रकारचे बनण्याकरता तसे तसे अभ्यास व्हायला पाहिजेत. आणि त्यापेक्षाही जगदंबेची उपासना ही मुख्य आहे. कलीयुगामध्ये "कलौ चंडी

विनायकौ" हे मुद्दाम शास्त्रकारांनी सांगितलेले आहे. ही गणेशांची उपासना, जगदंबेची उपासना ही याठिकाणी झालेली आहे. त्यानिमित्तानी आणखी काही सेवा थोडीशी करण्याची इच्छा यांनी व्यक्त केल्यामुळे थोडे हे तीन-चार दिवस ही थोडी वाङमय सेवाही या ठिकाणी झालेली आहे. पुण्याहून मुद्दाम आपलं यांनी बोलावलं म्हणून आलो. आम्हाला पहायला मिळालं हे पुण्यकर्म कसं असतं, जगदंबेची कृपा असल्यानंतर ते कसं पार पडलं, अहंकार रहित अशा रितीनं होऊन कसं पुण्यकर्म केलं पाहिजे. हे सगळही पाहून आणखी आपल्याला शिक्षण मिळतं ना, पहाणं हे सुद्धा एक शिक्षणच आहे. तर अशा दृष्टीने हे जगदंबेच्या कृपेने, आणखी तिची कृपा या रुपाने पहायला मिळाली हे ही मोठ यजमानांचं पुष्कळ कल्याण होईल. कृत, कारिक आणि अनुमोदित कर्मामध्ये तीन प्रकार सांगितले. पुण्यामध्ये स्वतः पुण्य करणं, दुसऱ्याकडून करिवणं हे ही पुण्यच आहे. नुसतं 'बराय बुवा, तुम्ही चांगलं केलं' असं नुसतं अनुमोदन झालं, हे सुद्धा पुण्य आहे. कशाला इतका पैसा खर्च केला? काय जरुर होती? संसारात काही हे लागत नाही काय? किती महागाई आहे. बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करायचा. देणारी समर्थ आहे जगदंबा. ती देणारी आहे. ती सगळं करुन घेती. उगीच काहीतरी मनामध्ये दुर्विचार उत्पन्न होतात. ते सगळे विचार नाहीसे होण्याकरता ईश्वराची आणखी भक्ति आम्हाला मिळावी म्हणून संतांनी भक्तीमार्गाचा पुरस्कार केलेला आहे. सर्वही संत या भक्तीमार्गातच येतात.

**किंबहुना सर्व सुखी पूर्ण होऊनी तीहीं लोकी**
**भजिजो आदि पुरुषी अखंडीत**



ज्ञानेश्वर महाराज शेवटी सांगताहेत. सर्वही सुख मिळू देत लोकांना. आम्हाला सुख मिळू नये, असे म्हणतं नाही. त्यांनी संसार केला नाही, तरी आम्हाला संसार करु नका असं काही ते सांगत नाहीत. परंतु हे सगळं मिळालेले असताना सुद्धा तो जो जगत्कर्ता आहे, सृष्टी ज्यांनी निर्माण केलेली आहे त्याला विसरु नका एवढेच त्यांचे सांगणे आहे. हे लक्षात ठेवायचं आहे. आपल्या मनाची शुद्धि, मनाचं आणखी संशोधन करणं योग्य आहे. चांगली बुद्धि बनवण्याकरता मनुष्यजन्म, आयुष्य असेपर्यंत प्रयत्न केला पाहिजे. ती चांगली बुद्धि बनवण्याकरता ईश्वराचे भजन आहे. जे काही असे ईश्वरभक्त असतील, त्यांची संगती आहे, त्यांचं आचरण पाहून त्या आचरणाप्रमाणे, त्यांच्या सांगण्याप्रमाणे आचरण करणे ही सगळी साधना आपल्या भारतामध्ये सगळी सांगितलेली आहे. आशावाद हा भारतातच फक्त आहे. ही अतिशयोक्ती नाहीये किंवा हा अहंकार नाहीये. निराशावाद हा इतका पसरलेला आहे. पाश्चात्य देशांमध्ये आत्महत्येचं प्रमाण किती आहे आणि इकडे किती आहे या एकाच गोष्टीवरुन दिसून येतं. आमच्या जीवन दृष्टीत निराशा नाहीये. कशीही परिस्थिती आली तरीसुद्धा काही मार्ग सांगितलेला आहे. कारण आमच्या विचारसरणीत देह म्हणजे आत्मा नाहीच. देहापेक्षा मी निराळा आहे ही बुद्धि पहिल्यापासून भगवंतांनी अर्जुनाला शिकविली. हा देह जाईल म्हणाले. आणि हा देह गेला तरी दुसरा देह मिळणार आहे. माझ्या बुद्धीने मी माझा उत्कर्ष करुन घेण्याला समर्थ आहे. हा आशावाद भारतामध्ये ऋषीमुनींनी, प्राचीन शास्त्रज्ञांनी आणखी दाखविलेला आहे. त्याप्रमाणे आचरणही लोकांनी करुन आपला उत्कर्ष करुन घेतलेला आहे.

अनंत काळापासून मोठेमोठे ऋषी, महर्षि उत्तम वेदशास्त्राचे ज्ञान संपादन करून आपली बुद्धि चांगली बनवून आणि मग लोकांचे हित काय आहे हे सांगत आलेले आहेत. मोठे मोठे अनेक ज्ञानी महात्मे आपल्यामध्ये आहेत. मनु आहे, अत्री आहेत, पराशर आहेत, वसिष्ठ आहेत, गौतम ऋषींनी अभ्यास संपादन करून, तपश्चर्या करून आणि त्याप्रमाणे निर्णय मांडलेला आहे. तर ही आपली आचार संस्कृती आहे. केवळ विचाराला फारसे महत्व नाहीये. विचाराप्रमाणे आचार झाला पाहिजे. आणि आचार आचरणात आणणे म्हणजेच तपश्चर्या आहे.

सद्‌गुरू वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांचे चरित्र उद्‌बोधक आहे. लहानपणापासून ते वेदांनी, शास्त्राने सांगितल्याप्रमाणे आचरण करायचे. एकादशीच्या दिवशी झोपायचे नाही असे शास्त्र सांगते. उपवास म्हणजे देवाच्या जवळ रहायचे. त्यावेळी झोप नाही, जागरण करायचे. रात्रभर ते बसून रहायचे, काहीतरी नामस्मरण देवाचे करीत. शेंडीला एक दोरीचे टोक बांधायचे आणि दुसरे टोक खुंटीला बांधायचे. पेंग आली तर लगेच झटका बसायचा, झोप जायची. आता शेंडीच कोणाला नाहीये. शेंडीपण एक प्रतीक आहे, चिन्ह आहे. कोणची संस्कृती आहे हे दाखविणारी काही चिन्हं आहेत. तर शास्त्राप्रमाणे वर्तन करायचे आहे. झोपेचा निग्रह करायचा आहे. आहाराचा निग्रह करायचा आहे. पवित्र आहार पाहिजे. पवित्र आचार पाहिजेत. पवित्रपणा हा शास्त्राशिवाय समजत नाही. उत्तम फूल आहे. त्याचा वास घेतल्यानंतर देवाला ते घालता येईस काय? काय हरकत आहे? बुद्धिवाद असे सांगणार. वास घेतला म्हणून काय झाले? पण ती पवित्रता गेली. स्वच्छता निराळी आणि पवित्रता निराळी. भांडी स्वच्छ झाली ते डोळ्यांनी दिसू शकते.



पण पवित्र किंवा अपवित्र हे बुद्धिनं ठरविता येणार नाही.

रावणाला बिभीषणाने सांगितले,'बाबा ही परस्त्री आहे. तू दुसऱ्याची स्त्री आणली आहेस' त्याच्या बायकोने मंदोदरीने सांगितले, त्याच्या मुलांनीसुद्धा सांगितले पण त्यानी ऐकले नाही. तो म्हणाला,"परस्त्री आम्हाला कोणचीच नाही. सर्व स्त्रिया आम्ही आणू शकतो." ही जर संस्कृती राहिली असती भारतात तर काय झालं असतं? म्हणून बिभीषणाने त्याची संगती सोडली. रामचंद्रांनीही प्रतिज्ञा केलेली आहे की अशा संस्कृतीचे जे जे लोक आहेत त्यांना जिवंत ठेवायचे नाही. अरण्यात जाऊन रहाणारे ऋषी, 'सर्वेपि सुखिनः संतु। सर्वे संतु निरामयः।' या भावनेने आणखी तपश्चर्या करणारे, त्यांना मारणारे हे असुर लोक होते. म्हणून कोणच्याही अशा संस्कृतीच्या माणसाला जिवंत ठेवायचे नाही. राक्षस जिवंत ठेवायचे नाहीत. बिभीषण शरण आला. रामाची प्रतिज्ञा आहे, राक्षसांचा नाश करायचा पण बिभीषण म्हणाला,"मी आपल्याला शरण आलेलो आहे, रावणाचा भाऊ मी आहे, राक्षस आहे." त्याला आश्रय दिलेला आहे. राक्षस झाले तरी त्यांच्यातही काही चांगले विचार चांगले संस्कार असणारी मंडळी असतात. नाही असे नाही. अर्जुन हिंसा, अहिंसा करत बसला होता. त्याला हे उत्तर दिले. हिंसा, अहिंसा बुद्धिने ठरविता येणार नाही. जो काही अशाप्रकारचा दुसऱ्याला पीडा देणारा आणि अत्यंत दुर्विचार ज्याच्या मनामध्ये आहे त्याची संस्कृती तशाच प्रकारची आहे, त्याला शासन केले पाहिजे म्हणून त्याला बोध करून, त्याचा मोह बुद्धितला दूर करून आणि त्याच्याकडून लढाई करविली. जे काही धर्मविरोधी लोक होते त्यांचा नाश करविलेला आहे. आणि धर्मराजाला राजा केलेले आहे. त्यात धर्मराज म्हणजे आपला आत्तेभाऊ

आहे म्हणून तो राजा झाला पाहिजे असा श्रीकृष्णाचा बिलकुल आग्रह नाही. धर्मराज धर्मनिष्ठ आहेत. धर्माकरता प्राण गेला तरी हरकत नाही. पण धर्म संरक्षण केलं पाहिजे ही बुद्धि ठेवणारा राजा पाहिजे, तर धर्माचे संरक्षण होईल.

महिषासुरमर्दिनीचे वाहन म्हणजे सिंह आहे. सिंह हे धर्माचे रूप आहे. धर्मानेच सिंहाचे रूप धारण केलेले आहे. त्या सिंहाच्या आश्रयाने महिषासुरमर्दिनीने महिषासुराचा नाश केला. कुठे दया करायची, कशी दया करायची, शासन करायचे हे सगळे बुद्धिला समजण्याकरता शास्त्र संस्कार बुद्धिमध्ये पाहिजेत. ते संस्कार बुद्धिमध्ये असल्यानंतर बुद्धिने कार्य होत आहे. पूर्वीचे मोठे मोठे राजे वगैरे हे सगळेही ज्ञान संपादन करायचे. शास्त्रज्ञान, राजनीती सगळी समजली पाहिजे ना! राजनीती समजल्याशिवाय आणखी त्याप्रमाणे राजकारण कसे होणार? त्यात स्वार्थ येणारच. स्वार्थ नको म्हणून कायदा करून उपयोग होत नाही. स्वार्थाकडे वृत्ती माणसाची जाणारच. स्वभाव आहे. तेव्हां हे मानसिक विकार हे सगळे नाहीसे झाले पाहिजेत. पापभिरूता मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. तर राज्य व्यवस्थित चालू राहील. केवळ कायद्याने राज्य चांगले ठेवता येणार नाही याचा अनुभव स्वराज्य मिळाल्यानंतर, या अलिकडच्या आठ-दहा वर्षात पुष्कळ आला. निष्कारण आणखी अशाप्रकारचे लोक नाहीसे होतात, मारले जातात. राजनीतीचे ज्ञान नाहीये, अभ्यास नाहीये, केवळ आणखी जे काही आपण तयार केलेली घटना त्याच्यावर बोट ठेवूनच वागायचे आहे. हे कर्म नको, ते कर्म नको, करायला कोणी सांगितले? पूर्वी सगळी आमची राजनीती मार्गदर्शन करायला असताना त्याचा अभ्यास नसल्यामुळे आम्ही ती राजनीती सोडून दिली. आणखी परदेशात कशी राजनीती आहे त्याला अनुसरून



ही राजनीतीची घटना तयार केली तर असे त्याच्यामध्ये कितीतरी दोष आहेत. दोष दिसायला लागले की ती बदलायची. बदलली जाणारी घटना आमची नाहीये.

आज किती लक्षावधी वर्ष झाली योगशास्त्राची परंपरा अजून भारतामध्ये अखंड चालू आहे. भगवद्गीतेलासुद्धा पुष्कळ वर्षे झाली. आजही भगवद्गीतेवरती श्रद्धा ठेवणारी मंडळी आहेत. लहान लहान मुले पाठ करतात पंधरावा अध्याय. त्यांचे ते एक प्रकारे वाङमय तप होतंय, वाणीची शुद्धि होतीये. तर हा सगळा अभ्यास करून ती बुद्धि तयार झालेली आहे. तो बुद्धिवाद भारताला मान्य आहे. त्या बुद्धिवादाने कुणाचेही नुकसान केले जाणार नाही किंवा जास्ती कोणालाही सवलत दिली जाणार नाही. अपराधी मनुष्य असेल त्याला सवलत मिळायची नाही. असे कितीतरी राजनीतीचं ज्ञान नसल्याकारणाने स्वार्थ बुद्धिमध्ये उत्पन्न होतात आणि त्या स्वार्थाकरता राष्ट्राचीसुद्धा पुष्कळ हानी होतीये. त्याकरता हे सबंध ज्ञान मिळविले पाहिजे. संत महात्म्यांच्या ग्रंथावरूनसुद्धा हे पुष्कळ ज्ञान आपल्याला मिळते आहे.

## "भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे"

ज्ञानेश्वर महाराजांचा हा जो उपदेश आहे तो राष्ट्राला कितीतरी उपयोगी आहे. सगळ्यांनी परस्परांच्या बरोबर मैत्री करावी, प्रेम करावे हे जे सांगताहेत ते, ते राष्ट्राच्या कल्याणाकरताच आहे. परस्पर सौहार्द्रभाव जर राष्ट्रामध्ये निर्माण झाला तर दुसरा कोणचाही शत्रू येऊ शकणार नाही. पण तो सौहार्द्रभाव निर्माणच होत नाही. कारण बुद्धिभेद असल्याकारणाने आपला पक्ष,

आपल्याला अनुकूल असलेले लोक तेवढे आपले, आणखी आपल्याशी विरुद्ध विचार असलेले लोक आपले नाहीत. त्यामुळे बुद्धिवरती चांगले संस्कार नसल्याकारणाने राष्ट्राचे खरे कल्याण कोणते, हित कशाला म्हणायचे याची काही कल्पना नाही. त्यामुळे आणखी कितीतरी अशाप्रकारचे दोष निर्माण होतात. तर ईश्वराला आपण शरण जायचंय. सर्वांच्या बुद्धिला प्रेरणा करणारी शक्ती म्हणजे ईश्वरशक्ती आहे. हे संतांचे अनुभवाचे सांगणे आहे. ईश्वराचे अस्तित्व सगळ्यांनी मान्य केले पाहिजे. भारतात ज्यांचा जन्म झालेला आहे, त्यांचे हे कर्तव्य आहे. ईश्वराची आस्तिक्य बुद्धि ही प्रत्येकाच्या अंतःकरणामध्ये निर्माण व्हावी याकरता सर्व संत, महात्मे प्रयत्न करताहेत. त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांचे ग्रंथ त्यांनी याकरताच लिहिलेले आहेत. ईश्वरशक्ती कशी आहे ती सर्वांपुढे त्यांनी मांडलेली आहे.

मराठवाडा म्हणा, विदर्भ प्रांत म्हणा, सद्‌गुरू वासुदेवानंदसरस्वती महाराजांचा संचार या भागात अधिक झालेला आहे. पण ते कोणच्याही वाहनात कधी बसले नाहीत. आसेतुहिमाचल त्यांचा संचार झाला. पण पायानीच सगळ्या तीर्थयात्रा केल्या. या प्रांतामध्ये जास्तीत जास्त त्यांचा संचार झाला. कारण काय की त्यांनाही अशाप्रकारची संस्कृत बुद्धि या भागात दिसली. शास्त्रसंस्कार, शास्त्रज्ञानाचे संस्कार या बुद्धिवर झालेले आहेत अशी बुद्धिची परंपरा त्यांना पसंत होती. अशी संस्कृत बुद्धि कल्याणकारक आहे, समाजाचे कल्याण करणारी आहे, राष्ट्राचे कल्याण करणारी आहे. परंतु ही जी बुद्धि आहे, ती बुद्धि आपली चांगली टिकली पाहिजे, संस्कार बुद्धिमध्ये चांगले झाले पाहिजेत. ही बुद्धिच आमच्याबरोबर येणार आहे ना! आपण भौतिक दृष्टीने पुष्कळ संग्रह केला तरी तो मृत्यूनंतर



आपल्याबरोबर काही येत नाही. स्वतःचा देहसुद्धा येत नाही. बुद्धि म्हणून जी दिलेली आहे ती बुद्धि किंवा मन ज्याला म्हणतात तेच आमच्या बरोबर येते दुसऱ्या जन्मामध्ये. या जन्मामध्ये चांगले संस्कार, ईश्वरभक्ति झालेली आहे, चांगले धर्माचरण झालेले आहे. तसेच संस्कार झालेली बुद्धि परत दुसऱ्या जन्मामध्ये आपण घेऊन गेलो. असेच पुढे संस्कार वाढत जाणारे आहेत आणि ईश्वराचा साक्षात्कार, आत्मसाक्षात्कार आपल्या बुद्धिने होणार आहे. म्हणून एका जन्मामध्ये इहलोकापुरता विचार करुन चालणार नाही. अर्थकामाकरताच प्रयत्न करुनही काही पूर्णता मिळत नाही. कल्याण होत नाही. परदेशातल्या लोकांना धर्माच्या काही विशेष भावना नाहीयेत. संस्कार नाहीयेत. मोक्ष, पुरुषार्थ हा त्यांच्यामध्ये नाहीच आहे. अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थ डोळ्यांसमोर ठेऊन प्रयत्न चाललेला आहे त्यामुळे तिकडच्या देशात ज्या ज्या काही सुधारणा म्हणून आम्ही समजतो आणि तशा सुधारणा इथे झाल्या पाहिजेत तसे आपल्याला वाटते.

आधुनिक बुद्धिवाद जरी असला तरी आधुनिक बुद्धिवादात सगळाच दोष आहे असे नाहीये. तर सांगायचे म्हणजे काही तरी परमार्थ दृष्टीने, पारलौकिक दृष्टीने हा विचार केला गेला पाहिजे. आपल्याला किती लांब जायचंय, किती मोठा प्रवास आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. त्याकरता कसे वागले पाहिजे आपण, हे वागणे पारमार्थिक दृष्टीनेही आपल्याला उपयोगी पडते आणि सामाजिक दृष्टीनेही समाजाला उपयोगी पडणार आहे. हाच आमचा धर्म आहे भारतीय धर्म. हा सर्व समाजाला उपकारक धर्म आहे. त्यात कुणाचाही आणखी द्वेष नाही, विरोध नाही, हे समजून घेतले पाहिजे. तर याकरता काही तरी माणसांची बुद्धि

धर्मानुकूल झाली पाहिजे.

इहलोकामध्ये असेपर्यंत केवळ आपण एकट्यानेच सुखी रहावे ही ज्याला इच्छा आहे त्याला लोक म्हटलेले आहे. तो दैत्य आहे. मनुष्यसुद्धा नाही, देव तर नाहीच नाही. त्याकरता ही असुरी वृत्ती गेली पाहिजे आणखी देव बुद्धि निर्माण झाली पाहिजे. निदान मनुष्य बुद्धि तरी निर्माण झाली पाहिजे. दैत्य बुद्धि जाण्याकरता संतांचे प्रयत्न झालेले आहेत, चालू आहेत. ईश्वराची तशी इच्छा आहे. ईश्वरसुद्धा त्याकरताच अवतार घेऊन येत असतो. हे लक्षात ठेवून आपण वागायचे आहे.

शंकराचार्यांच्या चरित्रामध्ये एक गोष्ट आहे. शंकराचार्य लहान होते. पाचव्या वर्षी त्यांचे उपनयन झाले. पिताजी गेल्यानंतर गुरुजींच्या आश्रमामध्ये आचार्य शिक्षणाकरता जाऊन राहिले. रोज मध्यान्हकाली भिक्षेला जायचे. भिक्षान्न मागून आणायचे. ते पवित्र अन्न सेवन करायचे. गुरुंच्या बरोबर राहून अभ्यास करायचा. शुद्ध वृत्ती आहे. एके दिवशी एका मोठ्या वाड्यात भिक्षेला गेलेले असताना मालकीण बाई भिक्षा वाढायला आली. तिने पाहिले मोठा तेजस्वी ब्रह्मचारी भिक्षेला आलेला आहे. साक्षात सूर्यनारायणासारखा. ती बाई हात जोडून म्हणाली,'बाबा तुला काय देऊ? तुझ्या झोळीमध्ये काय टाकू? माझ्या घरामध्ये काहीही नाही. सगळे गेलेले आहे. दरिद्री मी आहे. लक्ष्मीची माझ्यावर कृपा नाही.' शंकराचार्य म्हणाले,' तुमच्याकडे असेल ते द्या. अमुकच दिले पाहिजे असे नाही.' एक वाळलेला आवळा होता म्हणे. ती बाई म्हणाली,' हा आवळा एवढा आहे.' भिक्षा म्हणून तो आवळा त्या झोळीत टाकल्याबरोबर आचार्यांनी त्यावेळेला महालक्ष्मीची स्तुति केली. लगेच महालक्ष्मी समोर येऊन उभी राहिली. 'काय बाळ, मला कशाला बोलावलंस?'



या बाईवर काही कृपादृष्टी करा' म्हणाले. महालक्ष्मीने सांगितले,' सात जन्म जरी या बाईने घेतले तरी तिच्यावर माझी कृपा होणार नाही. तिचे कर्मच तसे आहे.' ऐकून घेतले त्यांनी. आचार्यमहाराजांची इच्छा आहे. तिच्यावर देवीने कृपा केली पाहिजे.. म्हणून त्यांनी विचारले देवीला,'आईसाहेब या बाईवर तुमची कृपा होणार नाही, माझ्यावर तर कृपा आहे की नाही?' देवी म्हणाली,'हो'. तू बोलावल्यावर मी आले नाही का? हो ना!' आचार्यांनी देवीला प्रार्थना केली,' मग महालक्ष्मीची कृपा ज्याच्यावरती आहे असा माझ्या झोळीमध्ये ह्या बाईने जर भिक्षा घातलेली आहे तर हिचे पाप शिल्लक कसे राहील?' बटू असा भेटला पाहिजे तो लगेच सुधारणा करु शकतो. कोर्टाच्या पुढे जरी काही विरुद्ध असतील तरी त्यातून मार्ग काढू शकतात. 'ही पापी आहे म्हणून हिच्यावर मी कृपा करणार नाही' असे म्हणणाऱ्या महालक्ष्मीने या प्रश्नाला काय उत्तर द्यायचे? या बाईने मला भिक्षा घातली आहे. किती घातली, काय घातली हे धर्मशास्त्रामध्ये नाहीये. दान करायचे झालं तर ते शुद्ध भावनेनं केलं म्हणजे दान झालं आणि पुष्कळ अगदी लक्षावधी द्रव्य दिलं आणखी मनामध्ये जर अभिमान असेल ,'मी दान करणारा आहे. मी सांगेन तसे वागले पाहिजे. अमुक दान दिले पाहिजे,' तर ते दान होऊ शकत नाही. ते दान म्हणजे जगासारखा व्यवहार झाला तो. शुद्ध धर्म आहे. त्या धर्माला अडचण काही नाही. तुमची कृपा का होऊ नये? काही बोलता आले नाही लक्ष्मीला आणि लगेच कृपादृष्टी झाली. महाराजांच्या इच्छेप्रमाणे सोन्याच्या आवळ्यांचा पाऊस पडला तिच्या वाड्यापुरता! वाड्याच्या बाहेर मात्र नाही. सबंध वाडा तिचा सोन्याच्या आवळ्यांनी भरुन गेला. आचार्य महाराजांनी त्या बाईने झोळीमध्ये टाकलेला

तो वाळलेला आवळा तेवढा घेतला आणि बाहेर पडले. हे सोन्याचे आवळे आम्हीच दिलेले आहेत, आमचाही त्यात हिस्सा आहे वगैरे असा काही संबंध नाही. म्हणून देवीची, महालक्ष्मीची कृपा आहे. सांगेल त्याप्रमाणे ईश्वर ऐकतो आहे त्या महात्म्यांचे. अशा या महात्म्यांसारखी सर्वांची बुद्धी शुद्ध व्हावी हीच ईश्वराजवळ प्रार्थना.

**पुंडलिक वरदे हारी विठ्ठल**
**श्री ज्ञानदेव तुकाराम**

**।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।।**